# चला सहलीला

-सुरेश परांजपे



म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू-प्रवास
सं. क्र. : ७33

REFBK-0026466

अभिषेक एन्टरप्राइज

# चला सहलीला

(महाराष्ट्रातील २५ छोटया सहलींबाबत मार्गदर्शन)

लेखक
सुरेश परांजपे

REFBK-0026466
REFBK-0026466

अभिषेक एन्टरप्राइझ्
१२६५, सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशन क्र. ९

प्रकाशक :
मंगेश रमेश वाडेकर
अभिषेक एन्टरप्राइझ्
१२६५, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०. फोन - ४२१०६१.

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रकाशन दिनांक : १६ मे १९९१

किंमत : रुपये ४०/- फक्त

टाईपसेटिंग :
कामत प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स
१/४, सुदामा स्मृति,
हनुमान नगर, नांदिवली रोड,
डोंबिवली (पूर्व).

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे - ३०.

वितरण व्यवस्था :
ज्ञानदा ग्रंथ वितरण
कृष्ण निवास, मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१.

# प्रस्तावना

मुलांना सहलीस नेणे हे कुणाचे काम आहे?

शाळेचे? वर्गशिक्षकाचे? का पालकांचे?

का वरील तिघांची वाट न पाहता मुलांनी स्वतःच सहल आखावी?

जो सहलींवर मनापासून प्रेम करतो त्याला हे प्रश्न पडत नाहीत. तो चार जणांना गोळा करतो, हौसेने सहल आखतो आणि जबाबदारीने ती पार पाडतो. तुम्हीही असे करावे म्हणून प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे.

यात पंचवीस छोट्या सहलींची माहिती आहे. प्रत्येक सहल एक दिवसात पुरी होऊ शकते. यापैकी निम्म्या सहली मुंबईजवळच्या आहेत. ती स्थळे ठाणे व रायगड जिल्ह्यातील आहेत. इतर स्थळांमध्ये पुणे, नाशिक, सातारा, औरंगाबाद, कोल्हापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन-तीन स्थळांचा समावेश केलेला आहे. त्या त्या जिल्ह्यातील मध्यवर्ती शहरापासून त्या सहली एक दिवसात होऊ शकतात.

यात धरणे, तलाव, उद्याने, देवालये, किल्ले, लेणी, अभयारण्ये, थंड हवेची ठिकाणे अशा विविध प्रकारच्या स्थळांचा समावेश आहे. प्रत्येक माणसाला आपल्या आवडीची काही स्थळे यात नक्कीच सापडतील. बहुतेक स्थळांची नावे वाचकाला नवीन वाटतील. जी स्थळे सहलींसाठी आधीच प्रसिध्द आहेत, ज्यांची भरपूर माहिती छापली गेलेली आहे, जिथे पर्यटकांची नेहमीच गर्दी असते अशा ठिकाणांऐवजी अपरिचित परंतु निसर्गसौंदर्याने युक्त अशी नवी ठिकाणे आम्ही सुचवीत आहोत.

प्रवासात अडचणी खूप येतात. गाड्या उशिरा येतात. त्या गर्दीने खच्चून भरलेल्या असतात. लोकांची अरेरावी सहन करावी लागते.

सहलीच्या ठिकाणी खाण्यापिण्याची चांगली सोय नसते. पर्यटनखात्याच्या गुळगुळीत माहिती–पत्रकानुसार जरी पर्यटक–निवासाची व भोजनगृहाची सोय कागदोपत्री असली तरी प्रत्यक्षात सगळा दुष्काळ असतो. मूठ दाबल्याशिवाय कोणतेही काम होत नाही. पण हेच जर घराबाहेरचे जीवन असेल तर त्यालाही सामोरे गेले पाहिजे. अडचणींना डरून कसे चालेल? प्रत्येक सहल माणसाला नवा अनुभव देते आणि त्याची जीवनदृष्टी अधिक विशाल आणि उदार बनवते. अनुभव असा आहे की काही काळानंतर सहलीतले कटू अनुभव आपोआप विसरले जातात, चांगल्या स्मृती शिल्लक राहतात इतकेच नव्हे तर त्यांची गोडी उत्तरोत्तर वाढते.

पन्नास–साठ विद्यार्थ्यांची मोठी सहल केवळ शाळाच काढू शकते. परंतु आठ–दहा विद्यार्थ्यांना जवळच्या ठिकाणी वैयक्तिक जबाबदारीवर नेणे एखाद्या शिक्षकाला सहज शक्य असते. सुटीच्या दिवशी दोन–तीन कुटुंबांनी एकत्र येऊन आपल्या मुलांसाठी सहल काढावी. मुले मोठी झाली, नववी–दहावीत गेली की ती सात–आठ जण एकत्र जमून स्वतःच सहलीस जाऊ शकतात. तेव्हा शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांनी जे आपणास सहज जमू शकेल ते स्वतःहून केले पाहिजे. प्रस्तुत पुस्तक असा आत्मविश्वास निर्माण करील असा लेखकास विश्वास वाटतो.

विलेपार्ले, ३१ जानेवारी १९९१

– सुरेश परांजपे

# पुस्तकातील स्थळांची प्रकारानुसार वर्गवारी

| | |
|---|---|
| तलाव, धरण | राधानगरी, कास, अप्पर वैतरणा, बामणोली (कोयना), गाडेश्वर, पवना, भिवपुरी, गौताळा, वांद्री, साखरे, दादरा, पाताळगंगा (चावणे, सावने). |
| समुद्र किनारा | किहीम, केळवे–माहीम, अर्नाळा. |
| देऊळ | कनकेश्वर, यवतेश्वर, भुलेश्वर, वैजनाथ, भंडारा, पाताळगंगा (आपटा), केळवे–माहीम (शितळादेवी), मार्लेश्वर, टिकलेश्वर, गाडेश्वर, नगरहवेली (वृंदावन). |
| उद्यान | दादरा, नगरहवेली (सेल्वास, खानवेल) |
| अभयारण्य, वनस्थळी | दाजीपूर, गौताळा, आंबोली, मार्लेश्वर, कास. |
| किल्ला | धोडप, अंतूर, भवनगड, केळवे–माहीम (जंजिरा), अर्नाळा (जलदुर्ग), भुलेश्वर (दौलतमंगळ), तिकोना, तळा, पेठ, गगनबावडा, आंबोली (महादेवगड). |
| लेणी, गुंफा | आंबिवली, कुडे, बेडसे, मार्लेश्वर, गौताळा, भंडारा, आंबोली (हिरण्यकेशी), नाणेघाट, गगनबावडा. |
| घाटमार्ग | नाणेघाट, माळशेजघाट, कुसुरघाट, आंबोलीघाट. |
| थंड हवेचे ठिकाण | आंबोली, अप्पर वैतरणा, दाजीपूर, माळशेजघाट, कास. |
| इतर | सातिवली (गरम पाण्याची कुंडे), भिवपुरी (वीजघर), पाताळगंगा (नदीचे खोरे). |


# पुस्तकातील स्थळांची जिल्हानिहाय विभागणी

| | |
|---|---|
| ठाणे | अर्नाळा, केळवे–माहीम, भवनगड, नाणेघाट, वांद्री धरण, सातिवलीची उन्हेरी, साखरे तलाव, दादरा – नगरहवेली (ठाणे जिल्ह्याजवळचा केंद्रशासित प्रदेश). |
| रायगड | किहीम, कनकेश्वर, पाताळगंगा, तळ्याचा किल्ला, कुड्याची लेणी, पेठचा किल्ला, आंबिवलीची लेणी, वैजनाथ, भिवपुरी, कुसुरघाट, गाडेश्वर, मालडुंगा. |
| पुणे | पवना धरण, बेडसे लेणी, तिकोना किल्ला, भंडारा डोंगर, भुलेश्वर, माळशेज घाट. |
| नाशिक | किल्ले धोडप, अप्पर वैतरणा. |
| सातारा | यवतेश्वर, कास तलाव, बामणोली. |
| कोल्हापूर | राधानगरी, दाजीपूर, गगनबावडा. |
| रत्नागिरी | मार्लेश्वर, टिकलेश्वर. |
| सिंधुदुर्ग | आंबोली. |
| औरंगाबाद | गौताळा अभयारण्य, अंतूरचा किल्ला. |

# मुंबईजवळची स्थळे

अर्नाळा, दादरा–नगरहवेली, केळवे–माहीम, वैजनाथ, भिवपुरी, कुसुरघाट, नाणेघाट, माळशेजघाट, पेठचा किल्ला, आंबिवली लेणी, भवनगड, गाडेश्वर–मालडुंगा, किहीम, कनकेश्वर, पाताळगंगा, वांद्री धरण, सातिवलीची उन्हेरी, साखरे तलाव.

# पुस्तकातील पर्यटनस्थळे



# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| * | सहलीपूर्वी | ९ |
| * | सहलीमध्ये | २३ |
| * | सहलीनंतर | १४९ |
| क्र. | स्थळ | |
| १ | दादरा–नगर हवेली | २५ |
| २ | किहीम–कनकेश्वर | २९ |
| ३ | अर्नाळा | ३४ |
| ४ | पवना धरण, बेडसे लेणी व तिकोना किल्ला | ३७ |
| ५ | पाताळगंगा–उगमापासून मुखापर्यंत | ४३ |
| ६ | अंतूरचा किल्ला | ५४ |
| ७ | माळशेज घाट | ५९ |
| ८ | गगनबावडा | ६३ |
| ९ | गाडेश्वर आणि मालडुंगा | ६७ |
| १० | पेठचा किल्ला आणि आंबिवलीची लेणी | ७२ |
| ११ | मार्लेश्वर आणि टिकलेश्वर | ७८ |
| १२ | नाणेघाट | ८४ |
| १३ | साखरे तलाव | ८९ |
| १४ | गौताळा अभयारण्य | ९१ |
| १५ | मुलेश्वर | ९६ |
| १६ | तळ्याचा किल्ला आणि कुड्याची लेणी | १०० |
| १७ | अप्पर वैतरणा | १०५ |
| १८ | भंडारा डोंगर | १०९ |
| १९ | राधानगरी आणि दाजीपूर | ११३ |
| २० | किल्ले घोडप | ११९ |
| २१ | केळवे–माहीम आणि भवनगड | १२५ |
| २२ | यवतेश्वर, कास तलाव आणि बामणोली | १३१ |
| २३ | वैजनाथ, भिवपुरी आणि कुसुरघाट | १३५ |
| २४ | वांद्री धरण आणि सातिवलीची उन्हेरी | १३९ |
| २५ | आंबोली | १४२ |

# सहलीपूर्वी

दा. ६३३ २६७६६ ३ मराठी

सहलीस निघण्यापूर्वी अनेक बाजूंनी तयारी करावी लागते. ही तयारी जितकी विचारपूर्वक आणि जितकी बारकाईने केली जाईल तितकी सहल अधिक यशस्वी होते. त्यासाठी महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत.

**सहलीसाठी येणाऱ्यांची संख्या**

अमूक सहलीस येणार का? असे विचारल्यावर सुरुवातीस खूप जण हो म्हणतात. नंतर गळती सुरू होते. दहा जणांनी येतो म्हटले असेल तरी प्रत्यक्ष चार जणच उपस्थित होतात. प्रत्येकाच्या काही ना काही अडचणी निघतात. यावर सहलीच्या अपेक्षित खर्चाची रक्कम प्रत्येकाकडून आगाऊ वसूल करणे हा व्यावहारिक उपाय आहे. ज्यांनी वर्गणी दिली आहे त्यांच्याच तिकिटांचे आरक्षण करावे. जी माणसे वर्गणी देऊ देऊ म्हणतात त्यांचे काही खरे नाही असे पक्के समजावे. रोखठोक न वागल्यास स्वतःच्या खिशातून पैसे भरण्याचा प्रसंग येतो.

सहलकऱ्यांची संख्या जितकी जास्त तितके त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे कठीण होऊन बसते. वेळापत्रक पाळले जात नाही. शिस्त ढेपाळते. प्रासंगिक करारावर बस ठरवून जायचे असेल तर बसचा खर्च जास्त माणसांवर वाटून जाण्यासाठी बस पूर्ण भरेल इतकी माणसे घ्यावी लागतात. मोठ्या बसमध्ये ५५ माणसे बसतात. आपोआपच ही कमाल मर्यादा ठरते. पण सार्वजनिक वाहनाने म्हणजे रेल्वेने अथवा एस.टी. ने जायचे असल्यास जास्त माणसे गोळा करू नयेत. पंधरा–वीस जणांचा गट आटोपशीर ठरतो.

मोटारीने जायचे असेल तर दोन गाड्या हव्यात. एक गाडी

बिघडल्यास दुसरीची मदत होते. कौटुंबिक सहल असली तरी एकच कुटुंब असू नये; बरोबर दुसरे कुटुंब असावे. त्यामुळे सहलीची मजा वाढते. गटात एकुलते एक मूल अथवा एकच स्त्री नसावी. दोन-तीन समवयस्क मुले असावीत म्हणजे ती एकमेकात रमतात. स्त्रीला गप्पा मारण्यासाठी तसेच बायकी अडचणींसाठी दुसऱ्या स्त्रीची मदत होते. असा कौटुंबिक गट आठ-दहा जणांचा असावा.

स्वयंचलित दुचाकी वाहनांनी जायचे असल्यास वाहने चार-पाचच असावीत. जास्त वाहनांचा काहीच उपयोग नसतो. एक तर सर्व वाहने एकमेकांबरोबर राहू शकत नाहीत; ती मागे-पुढे होतात आणि दुसरे असे की एखादे वाहन जरी बिघडले तरी सर्वांचा खोळंबा आणि विरस होतो. प्रत्येक वाहन-चालकाबरोबर त्याच्यामागे बसणारा साथीदार हवा. शक्यतो त्या साथीदारासही वाहन चालविता यायला हवे. सायकलीने जायचे असेल तरीही वरील कारणांमुळेच दहा-बारा जणांपेक्षा मोठा गट नसावा.

सहलीत बरेच मोठे अंतर पायी चालावयाचे असेल किंवा पदभ्रमण हाच उद्देश असेल तर गटात सहा ते आठ माणसे असावीत. चोर-दारुड्यांशी गाठ पडल्यास अथवा गावकऱ्यांशी वादावादीचा प्रसंग उद्‌भवल्यास तो प्रसंग निभावून नेण्यासाठी सात-आठ जणांची गरज असते. गटात हुरहुन्नरी माणसे असावीत. कुणी चुलीवर उत्तम स्वयंपाक करणारा असावा तर कुणी नकला करून इतरांना हसवणारा असावा. कुणी पैशाचा नीट हिशेब ठेवावा तर कुणी सहलीची दैनंदिनी लिहावी. कुणी परक्याला दहशत वाटावी इतका आडदांड असावा तर कुणी शांत डोक्याचा व मध्यस्थी करणारा असावा.

सहलीत तीन पेक्षा कमी माणसे नसावीत. अगदी एकट्याने प्रवास करूच नये. सहल हा चारचौघांनी एकत्र लुटण्याचा आनंद आहे. तरीही काही एककल्ली माणसे एकटी फिरताना आढळतात. ती स्वतःचा आनंद

मिळवतात पण तसे करताना ती घरच्या माणसांना काळजीत टाकतात. अगदी एकट्यापेक्षा दोघांनी जाणे बरे. तरीही त्या दोघांना एकमेकांशी गप्पा मारण्याचा लवकरच कंटाळा येतो. कुठून कसे जावे किंवा कुठे किती वेळ थांबावे यावर दोघांचा मतभेद होतो. डोंगरात चढता-उतरताना दोघांपैकी एक जखमी झाल्यास अथवा त्याची प्रकृती बिघडल्यास त्याला एकटेच टाकून मदत मिळवण्यासाठी जाण्याची दुसऱ्यावर पाळी येते. या कारणांसाठी कमीत कमी तीन जण जमले तरच सहलीस जावे; अन्यथा सहल पुढे ढकलावी.

### वाहन

स्वत:च्या वाहनाने जाणे केव्हाही सोयिस्कर होय. त्यामुळे सहलीचा खर्च वाढतो हे खरे पण वेळ वाचतो हेही खरे. थोड्या वेळात जास्त ठिकाणे पाहून होतात. वाहन हवे तेथे थांबविता येते.

स्वत:चे वाहन नेण्याचे काही तोटेही आहेत. एक म्हणजे वाहन-चालकास प्रवासाचा शीण इतरांपेक्षा जास्त होतो. मोटर-सायकलवरून जायचे असेल तर ऊन आणि वारा खावा लागतो. दुसरे असे की 'वाहन कुठे नादुरुस्त झाले तर?' या शंकेचा भुंगा चालकाचे डोके पोखरतो. खरोखरच ते नादुरुस्त झाले तर सगळी धावपळ त्यालाच करावी लागते. 'वाटेत पेट्रोल मिळाले नाही तर काय?' हा प्रश्नही भेडसावत असतो. पुढे रस्ता नसल्याने वाहन कुठेतरी ठेवून उर्वरित अंतर पायी जाण्याची वेळ आल्यास वाहन-मालकाचे एक लक्ष आपल्या वाहनाच्या सुरक्षिततेकडे लागलेले असते. अशा गोष्टींमुळे इतरांना जितका सहलीचा आनंद मुक्त मनाने घेता येतो तितका वाहन-मालकास घेता येत नाही. तिसरी गोष्ट अशी की एखाद्या किल्ल्यावर जाताना वाहन पायथ्याशी ठेवावे लागते आणि मग परतीचा पर्यायी मार्ग कितीही चांगला आणि

प्रेक्षणीय असला तरी केवळ वाहन मागे सोडल्याने गेलो त्याच मार्गाने परतावे लागते.

एस.टी.ची बस नैमित्तिक करारावर मिळत असेल तर फारच उत्तम. पण सर्वसाधारणपणे लोकांचा असा अनुभव आहे की, अशी बस मिळविण्यासाठी जो पत्रव्यवहार करावा लागतो, जे अनेक फॉर्म्स भरून द्यावे लागतात, एस.टी.च्या कार्यालयात खेटे घालावे लागतात, अनामत रक्कम आगाऊ भरावी लागते आणि सहल संपल्यावर उर्वरित रकमेचा परतावा मिळविण्यासाठी जी यातायात करावी लागते त्यामुळे सहल-संयोजकाचा जीव मेटाकुटीस येतो. तो नाउमेद होतो. 'नको ती बस' असे त्याला होऊन जाते. खाजगी बस भाड्याने घेण्याचा अनुभवही फार चांगला येतो अशातला प्रकार नाही. बहुतेक वेळा अशी बस निघायच्या ठरल्या वेळेपेक्षा खूप उशिरा उगवते. बसची अवस्था अतिशय खराब असते. ती वाटेतच कुठेतरी बंद पडते आणि सहल-संयोजकास कपाळावर हात मारण्याची पाळी येते.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणजे रेल्वे आणि एस.टी. सेवा दिवसेंदिवस वाढत्या गर्दीमुळे कोलमडत चालली आहे. आगाऊ आरक्षण करून देखील बसच्या दरवाज्यातून केवळ आत घुसण्यासाठी इतरांबरोबर झगडावे लागते; मग जागा मिळविण्यासाठी करावे लागणारे भांडण वेगळेच. बुध्दजयंती, आंबेडकर पुण्यतिथी, शिवसेनेचा विजयादशमी मेळावा अशा प्रसंगी लोकांची जी अतोनात गर्दी होते आणि संख्याबळावर गुंडगिरी चालते तिचा अनुभव अतिशय खिन्न करणारा असतो. अशा वेळी तिकीट कलेक्टर आपले तोंडही दाखवीत नाही आणि रेल्वे पोलीसही जाग्यावर नसतात.

सारांश, वाहन कोणतेही असो, आपल्याला काही ना काही त्रास होणार हे गृहीत धरावे आणि तसा त्रास सहन करायची मानसिक सिध्दता

ठेवावी. प्रवासात त्रास होईल म्हणून आपण घाबरू लागलो तर कुठे कधी सहलीला जायलाच नको. जो त्रास आपल्या वाट्याला येईल तोही एक जीवनानुभव समजून कडू औषधासारखा गिळावा. वाईट अनुभवांनीही आपले जीवन समृद्धच होत असते. आणि त्या त्या वेळी जरी त्रास झाला तरी पुढे काही दिवसांनी त्या प्रसंगांची देखील आपल्याला गंमत वाटू लागते. इतरांना ते प्रसंग वर्णन करून सांगताना आपल्याला हसू येते.

### खाद्यपदार्थ

एक दिवसाच्या सहलीत शक्यतोवर बाहेरचे पदार्थ खाऊ नयेत, सगळे पदार्थ घरुनच न्यावेत. बाहेरचे पदार्थ महाग असतात आणि त्यांनी पोट बिघडण्याची शक्यता असते. बाहेर खायची पाळी आल्यास केळी, पेरू, चिकू व संत्री यांपैकी जी फळे उपलब्ध असतील ती विकत घ्यावीत. ही फळे बरोबर नेता येत नाहीत कारण प्रवासात ती चिरडतात. मात्र सफरचंदासारखी टणक फळे बरोबर न्यावीत.

चिवडा, फरसाण आणि बिस्किटे जरूर न्यावीत. हे पदार्थ सर्वांना आवडतात आणि त्यांचे नीट वाटप करता येते परंतु हे पदार्थ पोटभरीचे नाहीत हे लक्षात ठेवावे. जेवणाचे समाधान मिळण्यासाठी बरोबर पोळी–भाजी किंवा पुरी–भाजीचा डबा न्यावा. लाडू, शिरा किंवा श्रीखंड यांच्यापैकी एखादा गोड पदार्थही असावा.

बाहेरच्या पाण्याची काही खात्री नसते. म्हणून प्रत्येकाने स्वत:बरोबर पाण्याची बाटली घ्यावी. बाटली काचेची नसावी, प्लॅस्टिकची असावी. कारण एक तर काचेची बाटली फुटल्यास ती धोकादायक ठरते आणि दुसरे म्हणजे काचेच्या बाटलीपेक्षा प्लॅस्टिकची बाटली वजनाला हलकी असते. प्लॅस्टिकची बाटलीसुध्दा पांढरी आणि पारदर्शकच असावी; रंगीत नको. कारण आपण कसले पाणी पितो आहोत हे डोळ्यांना दिसले

पाहिजे. पाणी खराब असेल, त्यात गाळ अथवा जंतू असतील तर पांढऱ्या, पारदर्शक बाटलीत ते लगेच दिसतात.

### सहलीच्या ठिकाणाची माहिती

ज्या ठिकाणी सहल न्यायची असेल त्या ठिकाणची जास्तीत जास्त माहिती जिथून शक्य असेल तिथून काढावी. पुस्तके, नकाशे, माहितगारांशी चर्चा आणि त्या ठिकाणी एकदा स्वत: प्रत्यक्ष जाऊन येणे हे माहिती मिळविण्याचे चार मार्ग आहेत.

पुस्तके – ग्रंथालयात प्रवासवर्णनपर पुस्तकांचा स्वतंत्र विभाग असतो. त्या विभागातील पुस्तके चाळून आपल्याला हवी असलेली माहिती मिळते का पहावे.

पर्यटन खात्याने महत्त्वाच्या पर्यटन स्थळांसंबंधी माहितीपत्रके प्रसिद्ध केलेली असतात, ती पत्रके चाळावीत. अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंगे वगैरे यात्रास्थळांविषयी तसेच प्रसिद्ध देवालयांसंबंधी पुस्तिका उपलब्ध असतात. यात्राकंपन्या आपण काढत असलेल्या सहलींची जाहिरात व्हावी म्हणून माहितीपत्रके छापतात.

इयत्ता तिसरीच्या भूगोलाच्या पुस्तकांमध्ये त्या त्या जिल्ह्यांची माहिती, जिल्ह्यांचे नकाशे आणि जिल्ह्यातील पर्यटनस्थळांची थोडक्यात माहिती दिलेली असते.

सरकारने प्रत्येक जिल्ह्याचे गॅझेटियर प्रसिद्ध केले आहे. गॅझेटियरमध्ये जिल्ह्याचा नकाशा व जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळांची माहिती असते.

मासिके, साप्ताहिके आणि वर्तमानपत्रे वर्षातून एकदा पर्यटन–विशेषांक काढतात. ते विशेषांक विकत घेऊन जपून ठेवावेत. तसेच, वर्तमानपत्रांमध्ये वेळोवेळी पर्यटन–विषयक स्फुट लेख येत असतात

त्यांची कात्रणे काढून ठेवावीत.

गिर्यारोहण आणि पदभ्रमण या विषयांवर अलिकडे बरेच लेख छापून येत असतात. त्या विषयांवर काही पुस्तकेही प्रसिद्ध झाली आहेत. गड-कोट-किल्ल्यांवर स्वतंत्र पुस्तके आहेत. गिर्यारोहण आणि पदभ्रमण संस्था आपल्या आगामी मोहिमांची चक्रमुद्रित परिपत्रके सभासदांना पाठवीत असतात. त्यांतून काही माहिती मिळते.

नकाशे – पर्यटन खात्याकडे प्रत्येक राज्यातील पर्यटन स्थळांचे नकाशे असतात. काही डायऱ्यांमध्ये महत्त्वाच्या शहरांचे नकाशे असतात. टूरिस्ट गाइडमध्ये नकाशे असतात. फूटपाथवर सुद्धा पुष्कळ रंगीत नकाशे मिळतात.

पुण्याच्या गव्हर्नमेंट फोटो झिंको प्रेसमध्ये महाराष्ट्राचे जिल्हावार आणि तालुकावार नकाशे मिळतात. मोठ्या सहलींची, विशेषतः पदभ्रमणाची बारकाईने आखणी करण्यासाठी हे नकाशे उपयुक्त असतात.

मोटरिस्ट्सूसाठी 'रोड मॅप्स' प्रसिद्ध केलेले असतात, ते मिळवावेत. रेल्वेच्या वेळापत्रकातील तसेच एस.टी.च्या वेळापत्रकातील नकाशे सुद्धा बघावेत.

माहितगाराशी चर्चा – आपण जिथे जाणार तिथे जे लोक आधी जाऊन आलेले आहेत त्यांच्याशी तसेच खुद्द त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांशी चर्चा करावी. त्यातून आपल्याला अद्ययावत माहिती मिळू शकते.

स्वतः जाऊन येणे – ज्या ठिकाणी आपण सगळ्यांना घेऊन जाणार तिथे आपण स्वतः आधी जाऊन येण्याइतका उत्तम मार्ग दुसरा नाही. त्यामुळे अगदी अद्ययावत माहिती तर मिळतेच पण संभाव्य अडचणींची आधी कल्पना येते. शिवाय, त्या ठिकाणच्या माणसांशी आधी ओळख झाल्याने पुढे सहलीच्या वेळी ती माणसे जास्त मदत करतात.

कोणत्याही स्थळाची माहिती काढताना ऐतिहासिक, भौगोलिक,

सामाजिक आणि तत्कालिक अशी चार प्रकारची माहिती काढावी.

**ऐतिहासिक माहिती** – इतिहासकाळात या ठिकाणी कोणती राजघराणी राज्य करीत होती? इथे कोणत्या लढाया झाल्या? कोण थोर पुरुष इथे जन्मास आले? येथे प्राचीन लेणी, गुंफा अथवा देवालये आहेत का? या प्रदेशाबद्दल काही पौराणिक कथा अथवा दंतकथा सांगण्यात येतात का? येथे जुन्या इमारती, वाडे, तलाव, विहिरी अस्तित्वात आहेत का? जवळपास कोणते किल्ले आहेत?

**भौगोलिक माहिती** – येथे कोणती नदी वाहते? प्रदेश मैदानी आहे का डोंगराळ आहे? जवळच्या डोंगराचे अथवा पर्वतरांगेचे नाव काय? त्या डोंगरात कोणती नदी उगम पावते? पाऊस किती पडतो? प्रदेश सुपीक आहे की नापीक? शेती जिरायती आहे की बागायती? येथे कोणते धरण आणि कालवा आहे? येथे आढणाऱ्या दगडाचे अथवा मातीचे वैशिष्ट्य काय? समुद्रकिनारा असेल तर तेथल्या वाळूचे वैशिष्ट्य काय? कोणती खनिजे येथे मिळतात?

**सामाजिक माहिती** – येथे कोणत्या जातीचे लोक राहतात? ते कोणती भाषा बोलतात? ते आदिवासी अथवा गिरिजन आहेत का? स्त्री–पुरुषांचा पेहराव कसा असतो? त्यांची अंगकाठी कशी असते? त्यांचे व्यवसाय कोणते? त्यांचे स्वभाव–वैशिष्ट्य कोणते? भांडकुदळ आहेत की मनमिळाऊ? पाहुण्यांचे स्वागत करतात का? चोरी, दरोडेखोरी अथवा भामटेगिरीसाठी तर कुप्रसिद्ध नाहीत? ते काय खातात–पितात? त्यांची राहणी कशी असते? त्यांच्या घरांचे काही वैशिष्ट्य आहे का? या भागाचे औद्योगिकरण झाले आहे का? येथे कोणते कारखाने अथवा लघुउद्योग आहेत? आठवड्याचा बाजार केव्हा भरतो? बाजारात कोणता खास माल विकावयास येतो?

**तत्कालिक माहिती** – येणाऱ्या–जाणाऱ्या बसेसच्या आणि

रेल्वेगाड्यांच्या वेळा कोणत्या? इतर वाहतुकीची साधने म्हणजे ट्रक, टेंपो अथवा जीप मिळू शकते का? रस्त्यांची अवस्था चांगली आहे का खराब आहे? पेट्रोलपंप जवळ आहे का? या भागाविषयी वर्तमानपत्रात अलिकडे काही बातमी आली आहे का? तेथे जातीय तणाव आहे का? भाग दंगलग्रस्त झाला आहे का?

पिण्याच्या पाण्याची काय सोय आहे? गावात हॉटेल अथवा खाणावळ आहे का? चहाचे दुकान आहे का? उतरण्यासाठी शाळा, धर्मशाळा अथवा देऊळ आहे का? किल्ल्यावर निवारा आहे का? सावलीसाठी झाड आहे का? रात्री मुक्काम करायची वेळ आल्यास कुठे आसरा घ्यावा? गावात दवाखाना आहे का?

गावातला सरपंच, पुढारी, शिक्षक, पुजारी, पाटील, तलाठी अथवा अन्य कोणत्याही इसमाची आधी ओळख मिळाली तर फार उत्तम. अशी ओळख काढायचा प्रयत्न करावा. त्या माणसास आपण येत असल्याचे पत्र पाठवावे. अशा माणसांना थोडे महत्त्व दिले तर ती आपणहून मदत करतात.

## स्वत:बरोबर न्यावयाच्या वस्तू

कपडे – अंगावरील कपड्यांव्यतिरिक्त एक जास्तीचा सेट घ्यावा. सहलीत कपडे मळल्यास अथवा फाटल्यास हा सेट उपयोगी पडतो. पोहायचे असल्यास पंचा आणि अंतर्वस्त्रे न्यावीत. एखादा जास्तीचा हातरुमाल आणि फडके बरोबर ठेवावे. आसनावरची धूळ झटकण्यासाठी फडके लागते. उन्हापासून रक्षण करण्यासाठी डोक्यावर रुंद काठाची टोपी घालावी अथवा मोठा हातरुमाल बांधावा अथवा फोल्डिंग छत्री न्यावी. कपडे अंगभर असावेत. हाफ पॅंट अथवा हाफशर्ट नको; फुलपॅंट आणि फुलशर्ट घालावा. अन्यथा गवतातून व झुडुपांमधून चालताना अंगास काटे

व कुसळे बोचतात तसेच अंगास खाज सुटते. उन्हाळयात सुती कपडे व हिवाळ्यात गरम कपडे घालावेत.

पादत्राणे – हंटर शूज अथवा कॅनव्हासचे बूट घालावेत. चामड्याचे बूट नकोत कारण ते डोंगर उतरताना घसरतात. चपला नकोत कारण त्या हमखास तुटतात तसेच वाटचाल खूप असली तर चपलांमुळे पावलांचे स्नायू आंबतात.

पाठपिशवी – सूटकेस, ब्रीफ केस अथवा हातात धरायची कोणतीही बॅग नेऊ नये कारण वाटचालीत तिचा त्रास होतो. हाताचा स्नायू दुखावतो. खांद्यावरची पिशवी चालेल. पाठीवरची पिशवी सर्वात उत्तम. तिच्यामुळे आपले हात मोकळे राहतात. पाठपिशवीस अनेक कप्पे असणे चांगले कारण त्यामुळे हवी तीच वस्तू विशिष्ट कप्प्यातून चटकन काढता येते. कप्पे नसतील तर हवी असलेली एखादी बारीक वस्तू हाताने कितीही धांडोळले तरी मिळत नाही आणि एका वस्तूसाठी सबंध पिशवी उलथी–पालथी करायची वेळ येते. पाठपिशवीत वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये वस्तूंची नीट रचना करणे ही एक कला आहे आणि ती अनुभवानेच अंगी येते.

इतर वस्तू – ✯ कॅमेरा, घड्याळ, पैशाचे पाकीट, पाण्याची बाटली, गॉगल, कंगवा.

✯ ट्रान्झिस्टर नेऊ नये कारण त्याने नैसर्गिक वातावरणाचा व शांततेचा भंग होतो.

✯ एखादी काठी घरुनच बरोबर न्यावी अथवा सहलीच्या ठिकाणी मिळवावी. डोंगर चढता–उतरताना तर ती उपयोगी पडतेच; शिवाय हातात काठी असली म्हणजे कुत्र्यांची अन् म्हशींची भीती वाटत नाही!

✯ फळ कापण्यासाठी चाकू. गुहेत अथवा देवळाच्या गाभाऱ्यात उजेड टाकण्यासाठी टॉर्च. तोंडात चघळण्यासाठी गोळ्या अथवा लवंग,

वेलदोडा, आवळकाठी, सुपारी. नोंदवही आणि पेन.

औषधे – डोकेदुखी, अंगदुखी व सर्दी–तापावरच्या वेदनाशामक गोळ्या. जखमेवर लावायचे मलम, कापूस, बँडेज, चिकटपट्टी. बस लागून ओकारी होऊ नये म्हणून विशिष्ट गोळ्या. चक्कर आल्यास हुंगण्यासाठी कांदा.

खाद्यपदार्थ – पोळी–भाजी, लाडू–चिवडा, बिस्किटे, फळे. (या विषयाची सविस्तर चर्चा आधी केली आहे.)

वरील यादी फक्त १ दिवसाच्या छोट्या सहलीसाठी आहे. सहलीच्या ठिकाणी मुक्काम करायचा झाल्यास वरील यादीत अंथरुण–पांघरुण, टूथपेस्ट, साबण वगैरे वस्तूंची भर पडेल.

### सहलींसाठी योग्य काळ

वर्षाचे बारा महिने सारखे नसतात. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन ऋतू काही महिन्यांत तीव्र तर काही महिन्यांत सौम्य असतात. सहली काढण्यासाठी सौम्य हिवाळ्याचा काळ सर्वात योग्य असतो. असा काळ म्हणजे नोव्हेंबरच्या आरंभापासून डिसेंबरच्या मध्यापर्यंतचा कालावधी होय. म्हणजे, दिवाळीपासून नाताळपर्यंतचे दिवस सहलींसाठी चांगले असतात. पावसाळा संपून फार दिवस लोटले नसल्याने सृष्टी अजून हिरवीगार असते आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य नसते. थंड हवेमुळे अंगात उत्साह आणि मनात प्रसन्नता असते. मुलांच्या परीक्षांचे दिवस अजून लांब असतात. नोकरी करणाऱ्यांना शिल्लक राहिलेल्या रजा संपविता येतात. अशा सर्व दृष्टिकोनांतून हा कालखंड योग्य असतो.

जानेवारीत हिवाळा तीव्र होतो. गार वारे सुटतात. नुसती थंड हवा त्रासदायक नसते पण वाऱ्याचा त्रास होतो. फेब्रुवारी महिन्यात हिवाळा पुन्हा सौम्य होतो. त्याचा फायदा घेऊन एखादी सहल काढता येते. पण

यावेळी सृष्टिसौंदर्य ओसरलेले असते. वृक्षांची पाने झडलेली असतात. गवत पिवळे पडलेले असते.

मार्च आणि एप्रिल हे शाळा-कॉलेजच्या परीक्षांचे दिवस असतात. त्यामुळे उन्हाळा सौम्य असूनही कुणी सहलीस तयार होत नाहीत. परीक्षा जर एप्रिलच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात संपली तर लगेच सहल काढावी. परीक्षा संपल्याने मुले उत्साहात असतात. उन्हाळा अजून तीव्र झालेला नसतो. रेल्वे आणि एस.टी.ची गर्दी अजून वाढलेली नसते. मे महिन्यात गाड्यांना बेसुमार गर्दी होते. उष्मा वाढलेला असतो. पाण्याचे दुर्भिक्ष्य सर्वत्र जाणवते. त्यामुळे मे महिना सुटीचा असूनदेखील आणि मुले फिरण्यास उत्सुक असूनही सहलीस जाणे तापदायक ठरते. उन्हाच्या फटक्यामुळे आजार ओढवण्याची शक्यता असते.

जून महिन्यात शाळा-कॉलेजेस सुरू होतात. पावसाळा सुरू होतो. कुणीही सहल काढण्याच्या मूडमध्ये नसते. जुलै आणि ऑगस्ट हे भर पावसाळ्याचे महिने होत. सगळीकडे चिखल होतो. डोंगर निसरडे बनतात. नद्यानाल्यांना पूर येतात. वाहतूक ठिकठिकाणी खंडित होते. त्यामुळे सहल काढायला कुणी धजावत नाही. सप्टेंबर महिन्यात मात्र पाऊस ओसरतो. या महिन्यात रिमझिम पावसाची आणि श्रावणसरींची मौज लुटण्यासाठी खास सहल काढावी. सृष्टीने धारण केलेल्या हिरव्या रंगाच्या विविध छटा डोळ्यांना सुखवतात. शेते डोलत असतात. निर्झर वाहत असतात. वाटचाल करताना अजिबात थकवा येत नाही. अशा अनुकूल वातावरणामुळे सप्टेंबर महिन्यात काढलेली छोटी सहल आनंददायक ठरते.

ऑक्टोबर महिन्यात 'ऑक्टोबर-हीट' म्हणून प्रसिद्ध असलेला विचित्र उष्मा जाणवतो. ऋतुपालट होत असल्याने बारीक आजार उद्‌भवतात. मुलांच्या सहामाही परीक्षा असतात. पावसाळ्यात दुर्दशा झालेल्या कच्च्या रस्त्यांची अजून डागडुजी व्हायची असते. त्यामुळे बसेस

शेवटच्या गावापर्यंत जात नाहीत. रानात आणि डोंगरावर माजलेले उंच गवत अजून कापावयाचे असते. त्यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांची आणि कीटकांची भीती असते. या कारणांमुळे सृष्टिसौंदर्य उत्तम असूनदेखील ऑक्टोबर महिन्यात सहली कमी निघतात. मग नोव्हेंबर महिना येतो; सहलींचा नवा सीझन सुरू होतो.

याचा अर्थ असा नव्हे की फक्त नोव्हेंबर-डिसेंबर किंवा सप्टेंबर महिन्यातच सहली काढाव्यात. योग्य काळजी घेऊन इतर महिन्यांत, अगदी भर उन्हाळ्यातदेखील सहली काढता येतात. उन्हाळ्यात चांदण्यातली सहल काढावी. चैत्री पौर्णिमा किंवा वैशाखी पौर्णिमेच्या रात्री चंद्रप्रकाशात रस्त्याने निव्वळ चालण्यास देखील मजा येते. उन्हाळ्यात दुपारची वाटचाल टाळावी. दुपारी समुद्रकिनाऱ्यावरील सुरूच्या बनात अथवा अभयारण्यातील गर्द झाडीत विश्रांती घ्यावी. जवळचे असे ठिकाण निवडावे की जेथे घरून दुपारी चारच्या सुमारास निघून सूर्यास्ताच्या आत पोहोचता येईल. रात्री तेथे मुक्काम करावा. पहाटेच्या थंड वेळी आजूबाजूस फिरावे. सकाळी आठच्या सुमारास परतीचा प्रवास सुरू करून उन्हाचा कडाका वाढण्यापूर्वी घरी पोहोचावे. या रीतीने सहल आखली तर मे महिन्यातसुद्धा सहल चांगली होते.

## सहलीचे वेळापत्रक

सहलीचे वेळापत्रक अगदी बारकाईने आखावे. ते काटेकोरपणे पाळणे शक्य होत नाही हे खरे; तरीही हातात वेळापत्रक असले तरच आपण चुकल्यावेळी योग्य तो बदल करून पुढचा गोंधळ टाळू शकतो.

पहाटे किती वाजता शाळेत अथवा रेल्वेस्थानकावर जमायचे? गाडी किती वाजता सुटते? ती नियोजित स्थानकावर किती वाजता पोहोचते? तिथून पुढे जाण्यासाठी किती वाजता बस आहे? सकाळची न्याहारी कुठे व

केव्हा करायची? सहलीच्या स्थळी पोहोचल्यावर स्थलदर्शनासाठी किती तास मिळतील? दुपारचे जेवण कुठे, केव्हा घ्यायचे? विश्रांती आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी किती वेळ शिल्लक राहील? परतीचा प्रवास सुरू करण्यास जास्तीत जास्त किती उशीर चालेल? घरच्या माणसांना अथवा मुलांच्या पालकांना घरी परतण्याची वेळ कोणती सांगावी? आपण ठरल्यावेळी न परतल्यास त्यांनी किती वाजेपर्यंत वाट बघून कुणाला फोन करावा? – ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आधी ठरवलेली असली पाहिजेत. जर ठरलेली गाडी चुकली किंवा गाडीस उशीर झाला आणि त्यामुळे पुढची बस चुकली तर कार्यक्रमात काय बदल करायचा याची पर्यायी योजना आधीपासून आखावी लागते.

सहलीच्या आरंभी सर्वांचा उत्साह उतू जात असतो. मुले पहाटे कितीही लवकर उठण्यास खुषीने तयार असतात म्हणून घरून शक्य तितक्या लवकर निघावे. परतताना अगदी शेवटच्या बसवर अवलंबून राहू नये. ती नादुरुस्त झाली तर फार घोटाळा होतो. घरी परतायला आपल्याला जितका उशीर होईल तितकी घरची माणसे अधिक काळजीत पडतील हे ओळखून घरी लवकर परतावे.

* * *

# सहलीमध्ये

सहलीत भाग घेणाऱ्या लोकांनी सहलीच्या सुरुवातीसच एकमेकांची ओळख करून घ्यावी. आपण किती माणसे आहोत आणि कोणकोण आहोत हे प्रत्येकास ठाऊक असले पाहिजे. कुणी वाट चुकून मागे राहिल्यास ते इतरांच्या ताबडतोब लक्षात आले पाहिजे.

सहलीस आलेल्यांपैकी अनुभवी, ज्येष्ठ व्यक्तीस सहलप्रमुख नेमावे. सहलप्रमुखाने घेतलेले निर्णय सर्वांनी विनातक्रार पाळावेत. असे न केल्यास लवकरच बेशिस्त वर्तन आणि गोंधळ सुरू होतो. सहलप्रमुखाने सगळी कामे स्वत:कडे न घेता ती जबाबदार व्यक्तींना वाटून द्यावीत. पैशाचा सगळा व्यवहार कुणा एकाच्या हाती करावा म्हणजे नंतर हिशेब करणे सोपे जाते. (मात्र सगळे पैसे एकत्र ठेवू नयेत; ते चार जणांकडे ठेवावेत व लागतील तसे मागून घ्यावेत.) गोळ्या-बिस्किटे वाटण्याचे काम दुसऱ्याकडे द्यावे. तिसऱ्याकडे गावकऱ्यांकडून माहिती गोळा करण्याचे काम द्यावे. गाणी-नकला इत्यादी मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन चौथ्यावर सोपवावे. कामाच्या अशा वाटणीमुळे त्या त्या व्यक्तींना आपण महत्त्वाचे आहोत असे वाटते, कामे चांगली होतात, लोकांचा सहभाग वाढतो. सहलकऱ्यांची संख्या जर मोठी असली तर प्रत्येक आठ-दहा जणांमागे गटप्रमुख नेमावा.

वाटचाल करताना पुढल्या आणि मागल्या माणसांत जर फार अंतर पडू लागले तर कुठेतरी थांबून सर्वांनी पुन्हा एकत्र यावे. मागे पडणाऱ्या व्यक्तींबरोबर एखाद्या तरुण माणसास ठेवून त्याच्याकडे शिट्टी द्यावी. खुणेची शीळ अथवा खुणेचे शब्द ठरवावेत. त्यांचा वापर करुन आपले स्थान

आणि अडचण इतरांना कळवावी.

☆ नैसर्गिक विधीसाठी गटापासून दूर जाताना कुणाला तरी सोबत न्यावे किंवा आपण त्यासाठी मागे राहत असल्याचे इतरांना सांगावे.

☆ पाणी आणि खाद्यपदार्थ कधीही पूर्ण संपवू नयेत. बिस्किटाचा एक पुडा आणि बाटलीत पाण्याचे दोन घोट सहल संपेपर्यंत शिल्लक ठेवावेत.

☆ गावकरी आपल्याकडे कुतुहलाने पहात असतात. त्यांना नमस्कार करून 'रामराम' म्हणावे. लगेच ते आपल्याला अनुकूल होतात. त्यांच्याशी बोलताना विनोद करू नये तसेच त्यांच्याकडे पाहून आपापसात हसू नये. अशाने गावकरी नाराज होतात. आपण त्यांची थट्टा करत आहोत असा त्यांचा समज होणे हिताचे नसते.

☆ किल्ल्यावर हिंडताना कड्याच्या अगदी टोकास जाऊ नये. तिथले दगड ढासळण्याची तसेच जोरदार वाऱ्याने आपला तोल जाण्याची शक्यता असते.

☆ विहीर, तलाव अथवा समुद्रकिनारा पोहण्यासाठी अगदी निर्धोक आहे अशी स्थानिक माणसांकडून खात्री करुन घेतल्याखेरीज पोहण्यास उतरू नये.

☆ स्थानिक वाटाड्या आपल्याबरोबर घ्यावा. त्याची हरप्रकारे मदत होते.

☆ नोंदवहीत बारीक सारीक नोंदी ताबडतोब कराव्यात. नंतर त्या गोष्टी आठवत नाहीत.

☆ सहलीचे ठिकाण सोडताना तिथे आपल्यामुळे झालेला कचरा साफ करावा.

☆ उत्साहाच्या भरात आणि आपल्या संख्याबळाच्या जोरावर गाडीतील अन्य प्रवाशांना उपद्रव देऊ नये.

* * *

# १. दादरा–नगरहवेली

दादरा नगरहवेलीचा केंद्रशासित प्रदेश हा महाराष्ट्र आणि गुजराथ यांच्यामधल्या सीमेवर वसलेला आहे. निसर्गाचा त्याच्यावर वरदहस्त आहे. दाट झाडीतून जाणारे निवांत रस्ते, दमणगंगा नदीची वळणे, उत्कृष्टपणे जोपासलेली उद्याने आणि डोंगराळ भागात वसलेले आदिवासी पाडे हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. सेल्वास (ऊर्फ सिलूव्हासा) हे राजधानीचे ठिकाण मुंबईपासून दिडशे किलोमीटर अंतरावर आहे. तिथे अलिकडच्या काळात श्रीमंती हॉटेल्स निघाली आहेत. आठवड्याच्या सुटीचे दोन दिवस मौजमजेत घालविण्यासाठी मुंबईहून अनेक कुटुंबे हल्ली स्वतःच्या गाडीने सेल्वासला जातात. पालघर–डहाणू भागातल्या शाळांचे विद्यार्थी येथे एक दिवसाच्या सहलीसाठी सहज येऊ शकतील.

डहाणू, भिलाड आणि वापी ह्या पश्चिम रेल्वेच्या तीन स्थानकांवरून सेल्वासला जाणाऱ्या बसेस सुटतात. मुंबईहून येणाऱ्या पर्यटकांसाठी विरार रेल्वेस्थानकावरून सकाळी साडेसात वाजता सुटणारी शटल ट्रेन ही खास सोयिस्कर गाडी आहे. ती भिलाडला साडेनऊ वाजता पोचते. भिलाडहून १० वाजता निघणारी बस अर्ध्या तासात सेल्वासला पोचते. नंतर, आजूबाजूला भटकण्यासाठी सायंकाळी सहा वाजेपर्यंत भरपूर वेळ मिळतो. परतीच्या प्रवासासाठी भिलाड स्थानकावरून संध्याकाळी सात वाजता सुटणारी शटल ट्रेन पकडावी. ती रात्री सव्वानऊ वाजता विरारला पोहोचते.

दादरा–नगरहवेलीत दादरा, सेल्वास, खानवेल, मधुबन, वृंदावन (ऊर्फ बिंद्राबिन) आणि रांधा ही सहा ठिकाणे पाहण्यासारखी आहेत.

त्यापैकी दादरा, सेल्वास आणि खानवेल ह्या तीन ठिकाणी छान छान बागा आहेत. मधुबन येथे दमणगंगा नदीवर बांधलेले धरण आहे. वृंदावन येथे तडकेश्वर महादेवाचे मंदिर आहे. खानवेल आणि रांधा येथे वनवासी कल्याण आश्रम आहेत. ही सगळी स्थळे व्यवस्थित, सावकाश बघायची असतील तर त्यासाठी दोन-तीन दिवस लागतात. एक दिवसाच्या सहलीत वरीलपैकी दोन किंवा तीन स्थळेच बघता येतात.



वनगंगा सरोवर

दादरा हे गाव वापीपासून ९ कि.मी. अंतरावर आहे. दादरा-सेल्वास रस्त्यावर दादऱ्यापासून फक्त १ कि.मी. अंतरावर वनगंगा सरोवर आहे. सरोवरात नौकाविहाराची सोय आहे. सरोवराभोवती मोठा बगीचा आहे. सरोवरात पांढरी शुभ्र बदके आणि बगिच्यात मोर मुक्तपणे विहार करीत असतात. हिरवळीवर मुले बागडत असतात. हे लोकांचे सर्वात आवडते स्थळ आहे.

भिलाड-सेल्वास रस्त्यावर सेल्वासच्या दोन किलोमीटर अलिकडे वनधारा उद्यान आहे. हे उद्यान दमणगंगा नदीच्या काठावर आहे. येथे

नदीवर मोठा पूल बांधलेला आहे. जवळच रास रिझॉर्ट नावाचे प्रसिद्ध हॉटेल आहे. उद्यानात वनभोजनासाठी मोठ्या छत्रीसारखी कौलारू छपरे घातली आहेत.

नगरहवेलीचा मुख्य पर्यटक निवास खानवेल गावात आहे. खानवेल गावाजवळून साकरतोंड नदी वाहते. नदीकाठी वनविहार नावाचे प्रशस्त वनोद्यान आहे. त्यात पर्यटकांना राहण्यासाठी छोटे-छोटे बंगले आहेत. बंगल्यांसभोवार उंच उंच वृक्ष आहेत.

सेल्वासकडून खानवेलकडे जाताना एक फाटा मधुबन धरणाकडे जातो. हे नगरहवेलीतील मुख्य धरण असून ते दमणगंगा नदीवर बांधले आहे. धरणामागचा जलाशय बराच दूरवर पसरलेला आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी धरणापासून कालवे काढले आहेत. धरणाच्या पाण्यावर वीजनिर्मिती करण्यासाठी एक विद्युतगृह बांधले जात आहे.


सेल्वास-खानवेल रस्त्यावर खानवेलच्या दोन किलोमीटर अलिकडे वृंदावन गावापाशी तडकेश्वर महादेवाचे देऊळ आहे. देवळामागून साकरतोंड नदी वाहते. देवळाच्या आवारात एक छानशी फुलबाग आहे. आवारातच एका स्वामीजींचा मठ आहे.

सेल्वासपासून १९ कि.मी. अंतरावर रांधा नावाचे गाव डोंगराळ प्रदेशात वसले आहे. तेथली जनता आदिवासी आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी वनवासी कल्याण आश्रमातर्फे रांध्यात एक शाळा चालवली जाते. याच संस्थेतर्फे खानवेल येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. रांधा आणि खानवेल ह्या दोन्ही ठिकाणी चालणारे वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य मुद्दाम भेट देऊन बघावे असे आहे.

आता थोडा इतिहास बघू. अठराव्या शतकात दादरा-नगरहवेलीचा प्रदेश पेशव्यांकडे होता. पेशवे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये झालेल्या

तहानुसार हा प्रदेश १७७९ साली पोर्तुगिजांकडे गेला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावरसुद्धा गोवा–दीव–दमण प्रमाणे दादरा–नगरहवेली देखील पोर्तुगिजांच्याच ताब्यात राहिली. हा प्रदेश मुक्त करण्यासाठी जनतेचा लढा सुरू झाला. १९५४ सालच्या जुलै महिन्यात मुक्तिसैनिकांनी दादरा ताब्यात घेतले आणि ऑगस्ट महिन्यात सेल्वास व खानवेल येथे तिरंगी झेंडा फडकविला. दादरा–नगरहवेली स्वतंत्र झाली; पण पोर्तुगालने हेगच्या आंतरराष्ट्रीय कोर्टात धाव घेतल्याने ह्या प्रदेशाचे भारतात सामिलीकरण होणे सात वर्षे रखडले. अखेर ११ ऑगस्ट १९६१ या दिवशी हा केंद्रशासित प्रदेश झाला.


***



वनविहारातील विश्रांतिगृह

# २. किहीम-कनकेश्वर

किहीम हे अलिबागजवळचे एक लहानसे खेडेगाव आहे आणि कनकेश्वर हे त्या गावाजवळच्या डोंगरावरचे प्रसिद्ध देवस्थान आहे. अतिशय सुंदर समुद्रकिनारा हे किहीमचे वैशिष्ट्य आहे तर सुखद, आरोग्यदायक, थंड हवा हे कनकेश्वरचे वैशिष्ट्य आहे. दोन्ही ठिकाणे मुंबईजवळ पण समुद्रापलिकडे आहेत. लाँचमधून करावा लागणारा दीड तासाचा समुद्रप्रवास हे किहीम-कनकेश्वराच्या सहलीचे खास आकर्षण आहे. पनवेल, पेण आणि रोहा येथल्या शाळा ही सहल बसने एक दिवसात आटोपू शकतात.




कनकेश्वर मंदिर

किहीमजवळ रेवस हे बंदर आहे. मुंबईहून रेवसला जाणाऱ्या लाँचेस भाऊच्या धक्क्यावरून सुटतात. शक्यतोवर सकाळची पहिली लाँच

पकडावी. लॉंच धक्क्यावरून सुटल्यावर सुरुवातीस तिला मुंबई बंदरात नांगर टाकून उभ्या असलेल्या बोटींच्या भाऊगर्दीतून वाट काढत जावे लागते. त्यावेळी नाना देशांच्या, नाना प्रकारच्या प्रचंड बोटी बघून माणूस थक्क होतो. इकडे पाहू की तिकडे पाहू अशी लहान मुलांची अवस्था होते. जरा दूर गेल्यावर मुंबईतल्या गगनचुंबी इमारती, किनाऱ्यावरचे ताजमहाल हॉटेल आणि गेटवे ऑफ इंडियाची इमारत कोवळ्या उन्हात न्हाताना छान दिसतात. आणखी दूर गेल्यावर पश्चिमेकडे अथांग सागर क्षितिजापर्यंत पसरलेला दिसतो. पूर्वेकडे बघितल्यास घारापुरी बेट, उरणचे तेल-वायू आयोगाचे वायुपृथक्करण केंद्र, न्हावा-शेवा बंदर आणि हाजी मलंगपासून कर्नाळ्यापर्यंत पसरलेली डोंगररांग दिसते. बघता बघता रेवस बंदर येते.

रेवसहून किहीम, कनकेश्वर, थळ, अलिबाग वगैरे ठिकाणच्या बसेस सुटतात. कनकेश्वरची बस डोंगरपायथ्याशी असणाऱ्या मापगाव पर्यंत जाते. मापगावला उतरावे. तिथून डोंगरावर जाण्यासाठी दगडी पायऱ्यांची छानशी वाट आहे. ही वाट जुनी म्हणजे दोनशे वर्षांपूर्वी बांधलेली आहे. सुमारे साडेसातशे पायऱ्या चढाव्या लागतात. डोंगराचा माथा समुद्रसपाटीपासून ३८४ मीटर (साडेबाराशे फूट) उंच आहे. मात्र कनकेश्वराचे देऊळ अगदी माथ्यावर नसून ते थोड्या खालच्या म्हणजे तीनशे मीटर उंचीवरच्या पठारावर वसले आहे.

पायऱ्या चढताना दम लागतो. श्वास घेण्यासाठी थोडे थांबलो आणि मागे वळून पाहिले की पायथ्याची घरे चित्रातल्यासारखी दिसतात. पश्चिमेकडे समुद्र दिसतो. समुद्रात खांदेरी आणि उंदेरी ही दोन बेटे दिसतात. अलिकडे, किनाऱ्यालगत उंच धुराडी आणि लोखंडी स्तंभ दिसतात. तो थळ-वायशेतचा खतांचा कारखाना होय. दक्षिणेकडे दिसणाऱ्या डोंगरास रामदरणा असे नाव आहे. त्यावर शंकराचे देऊळ आहे.

नागोबाचा टप्पा, देवाची पायरी, जांभळीचा टेप आणि गायमांडी

असे टप्पे घेत घेत सुमारे पाऊण तासात माणूस डोंगरावर पोचतो. पायऱ्या संपतात आणि अर्ध्या तासाची आडवी वाटचाल सुरू होते. वाट आता झाडीतून जाते. 'झाडांची सावली आणि गार वाऱ्याच्या झुळुकांमुळे डोंगर चढताना झालेल्या श्रमांचा परिहार होतो. वाटेच्या उजवीकडे मारुतीची देवळी आणि पाण्याचे कुंड लागते. थोड्या वेळाने झाडी अचानक संपते. वाट मोकळ्यावर येते. एका प्रशस्त, अष्टकोनी तलावापाशी आपण उभे असतो अन् तलावापलिकडे एक उंच कळस असलेले मंदिर असते. हेच कनकेश्वर देवस्थान.

देवळापेक्षा देवळाबाहेरची पुष्करणी आपले चित्त वेधून घेते. पाणी खोल दिसते. पाण्यापर्यंत पोचण्यासाठी खूप पायऱ्या उतराव्या लागतात. ह्या दगडी पायऱ्यांची रचना खूप कलापूर्ण वाटते. काठावर चौफेर दगडी रुंद कट्टा आहे. पौर्णिमेच्या चांदण्यात ह्या कट्ट्यावर बसून गप्पा मारण्यासारखे सुख दुसरीकडे कुठे नसेल.

पुष्करणीकडे देवळाची पाठ आहे. देवळाचे तोंड विरुद्ध बाजूस म्हणजे पश्चिमेकडे आहे. प्रवेशद्वारापाशी डाव्या-उजव्या हातांस दोन सिंहमूर्ती आहेत. हे तुकतुकीत अंगकांतीचे सिंह सायंकाळच्या तिरप्या उन्हात खरेखुरे भासतात. देवळाचा चौकोनी सभामंडप चांगला लांब-रुंद आहे.

देवळाच्या परिसरात अनेक धर्मशाळा आणि पुजारी-गुरवांची घरे आहेत. चहापाण्यासाठी हॉटेल आहे. पुजारी किंवा गुरवाकडे जेवणाची सोय होऊ शकते. मुख्य देवळाशिवाय डोंगरावर इतरत्र अनेक देव-देवतांच्या घुमट्या आहेत. त्यापैकी गणपतीचे देऊळ मोठे आहे. ते मुख्य देवळाच्या जवळच आहे. गणपतीच्या देवळाजवळून जी वाट उत्तरेकडे जाते ती गोमुख कुंडावर जाते. तिथे स्नान करण्याची जागा आहे. मुख्य देवळापासून झिराड गावाकडे उतरणाऱ्या वाटेवर पात्रुबाई ऊर्फ भगवती मंदिर आहे.

डोंगरावरच्या सर्वात उंच भागी वाघेश्वराचे देऊळ आहे. तिथून पुढे जाणारी वाट नारंगी गावात उतरते. बहिरोळकडे जाणाऱ्या वाटेवर उमरावणे नावाचे स्थळ आहे. तिथे भुयारी विहीर आहे. तिच्यावर पाणी खेचण्यासाठी पंप बसवलेला आहे. जवळ पाण्याची टाकी आहे.

कनकेश्वराची यात्रा त्रिपुरी पौर्णिमेस भरते. पूर्वी त्रिपुरीच्या रात्री देवळाच्या कळसावर दीप लावीत असत. आता कळसावर विजेचा दिवा रोजच लागत असल्याने त्रिपुरीचा दीप देवळासमोरच्या दीपमाळेवर लावतात.



किहीमच्या तळ्याकाठचे शिवमंदिर

कनकेश्वर पाहून झाल्यावर पुन्हा मापगावला उतरावे. तिथून बसने किहीमला जावे. मापगावपासून जवळच्या वाटेने किहीमला चालत जाण्यास एक तास लागतो. किहीममध्ये शिरण्यापूर्वी रस्त्याच्या डावीकडे कमळे असलेले एक मोठे तळे दिसते. त्या तळ्याकाठी शंकराचे देऊळ आहे. खुद्द गावात पहाण्यासारखे खास काही नाही. प्रेक्षणीय आहे तो किहीमचा समुद्रकिनारा. मात्र तेथे घालवण्यासाठी एक पूर्ण सायंकाळ आपल्याजवळ

हवी. विख्यात पक्षीतज्ज्ञ सलीम अली येथे राहत होते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने किहीमच्या किनाऱ्यावर विश्रामधाम बांधले आहे. तिथे पर्यटकांना राहण्यासाठी खास तंबू उभारले आहेत. हल्ली सुट्टीच्या दिवशी किहीमच्या किनाऱ्यावर लोकांची गर्दी असते. जवळच्या चोंढी नाक्यावर अलिबाग तसेच रेवसकडे जाण्यासाठी रिक्षा मिळतात. चोंढी नाक्याजवळ अनेक हॉटेल्स उभी राहिली आहेत.

* * *



किल्ले उंदेरी

मराठी ग्रं
बा. क्र.

# ३. अर्नाळा

अर्नाळा हा मुंबईजवळचा एक जलदुर्ग आहे. तो एका बेटावर बांधलेला आहे. अशा किल्ल्यास जंजिरा अथवा पाणकोट म्हणतात. बेट कसे असते हे पाहण्याची मुलांना उत्सुकता असते. सिंदबादच्या सफरी किंवा रॉबिन्सन क्रूसोची गोष्ट वाचून ही उत्सुकता निर्माण होते. तसेच शिवाजी महाराजांच्या गोष्टी ऐकून किल्ला कसा दिसतो हे पहाण्याचीही मुलांना जिज्ञासा असते. अर्नाळ्याच्या सहलीत या दोन्ही गोष्टी एकत्र बघायला मिळतात. त्याशिवाय होडीतल्या प्रवासाची मौज अनुभवायला मिळते ती वेगळीच!

अर्नाळ्याची सहल मुंबईहून एक दिवसात पुरी होते. अर्नाळ्याला जाण्यासाठी पश्चिम रेल्वेवरील विरार स्थानकावर उतरावे लागते. विरार हे चर्चगेटहून सुटणाऱ्या लोकलगाड्यांचे शेवटचे स्थानक आहे. विरारवर सकाळी आठ वाजता पोहोचण्याच्या बेताने मुंबईहून निघावे म्हणजे पुढे अर्नाळ्यावर घालविण्यासाठी भरपूर वेळ मिळतो. विरारहून अर्नाळा फक्त आठ किलोमीटर अंतरावर आहे. विरारहून थोड्या थोड्या वेळाने अर्नाळ्यासाठी बस सुटते. बस बोळींज आणि आगाशीमार्गे अर्नाळापाड्यापर्यंत जाते. अर्नाळापाडा हे समुद्रकिनाऱ्यावरचे मच्छिमारांचे गाव आहे. तेथून अर्नाळा बेटावर जाण्यासाठी फेरी–बोट असते. बेट किनाऱ्यापासून फक्त एक किलोमीटर दूर आहे. त्यामुळे होडीचा प्रवास अवघ्या दहा–बारा मिनिटात संपतो. पहिली होडी सूर्योदयाच्या वेळी सुटते आणि शेवटची होडी सूर्यास्ताच्या वेळी सुटते.

होडीतून अर्नाळ्याकडे जात असतानाच बेटावरचे एक मंदिर नजरेत

भरते. अर्थातच, बेटावर उतरल्यावर प्रथम आपली पावले त्या मंदिराकडे वळतात. मंदिर कालिमातेचे आहे. देवळाचा नवेपणा, त्याची रंगसंगती आणि उंच शिखर या गोष्टींमुळे प्रथमदर्शनीच देऊळ आवडते. देवळाचे आवार प्रशस्त आहे. देवीचे दर्शन घेऊन पुढे जाऊ लागल्यावर किल्ल्याच्या तटबंदीत दोन भक्कम बुरूज द्वारपालासारखे उभे असलेले दिसतात. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार त्या दोन बुरुजांमध्ये आहे. प्रवेशद्वारामागे उंचवट्यावर रोवलेल्या ध्वजस्तंभावर झेंडा फडकताना दिसतो. हे दृश्य पुण्याच्या शनिवारवाड्याची आठवण करून देते.




अर्नाळा किल्ल्याचे प्रवेशद्वार

दरवाज्यातून आत शिरल्यावर तटावर चढण्यासाठी पायऱ्या दिसतात. त्या चढून वर जावे. तट रुंद असून चांगल्या अवस्थेत आहे. तटावरुन चालत संपूर्ण प्रदक्षिणा करावी म्हणजे बेटाच्या सर्व बाजू दिसतात. किल्ल्याचा आकार चौकोनी आहे. आपण आत शिरतो ते प्रवेशद्वार किल्ल्याच्या उत्तर तटात आहे. दक्षिणेकडच्या तटात एक चोर–दरवाजा आहे. दक्षिणेकडे जरा दूर एक गढीवजा सुटा बुरूज दिसतो. किल्ल्याच्या

पूर्वेकडे अर्नाळा गावची वस्ती आहे. पूर्वेकडे मुख्य किनाऱ्यावर दीपगृह दिसते. बेटाचा पश्चिम भाग निर्जन आहे. त्या पलिकडे अथांग समुद्र दिसतो.

किल्ल्यातले मुख्य ठिकाण म्हणजे शंकराचे देऊळ होय. ते स्वच्छ आणि प्रशस्त आहे. त्याच्या चारी बाजूंना बसण्यासाठी ओटा आहे. देवळासमोर पाण्याची अष्टकोनी पुष्करणी आहे. जवळच गोड्या पाण्याची विहीर आहे. हे स्थळ भोजनासाठी आणि विश्रांतीसाठी चांगले आहे. त्याशिवाय किल्ल्यात एक मशीद आणि झाडीत लपलेले गणपतीचे देऊळ आहे. ही सर्व स्थळे दीड–दोन तासात पाहून होतात आणि मग मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी खूप वेळ मिळतो.

* * *




अर्नाळा किल्ल्याचा आतला भाग

# ४. पवना धरण, बेडसे लेणी व तिकोना किल्ला

पुणे जिल्ह्यातील प्रेक्षणीय स्थळांमध्ये लोहगड-विसापूर किल्ले आणि कार्ले-भाजे लेणी यांची बरीच प्रसिद्धी आहे. त्या मानाने तिकोना किल्ला व बेडसे लेणी यांच्याकडे फारशा पर्यटकांचे पाय वळत नाहीत. वास्तविक पाहता लोहगड-विसापूरपासून तिकोना जवळ आहे. तसेच भाजे आणि बेडसे लेणी जवळ जवळ आहेत. लोहगड-विसापूर व कार्ले-भाजे यांच्याकडे जाण्यासाठी जिथे उतरावे लागते ते मळवली स्थानक आणि पवना, बेडसे, तिकोन्याकडे जाण्यासाठी जिथे उतरावे लागते ते कामशेत स्थानक ही दोन एकमेकांशेजारची स्थानके आहेत. असे असूनही ह्या दुसऱ्या सहलीकडे लोकांचे लक्ष जात नाही कारण त्या ठिकाणांची पुरेशी माहिती लोकांसमोर अजून आलेली नाही.

पवन-मावळ हे बारा मावळांपैकी एक मावळ आहे. पवन-मावळ म्हणजे पवना नदीचे खोरे होय. पवना नदी लोणावळ्याच्या दक्षिणेस सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर उगम पावते व पूर्वेकडे वाहत जाऊन दापोडी रेल्वेस्थानकाजवळ मुळा नदीस मिळते. पवनेकाठचे सर्वात प्रसिद्ध गाव चिंचवड होय. चिंचवडची प्रसिद्ध मोरया गोसावींची समाधी अगदी पवनातीरी आहे. पवनेच्या उगमापासच्या डोंगराळ प्रदेशात उत्तरेकडे लोहगड-विसापूरचे किल्ले आणि दक्षिणेकडे तुंग-तिकोन्याचे किल्ले यांच्यामधून नदीचा प्रवाह आपली वाट काढतो. याच ठिकाणी नदीवर मोठे धरण बांधण्यात आले आहे. धरणापासून पुढे सरकल्यावर नदीच्या डावीकडे, विसापूरपासून पूर्वेकडे लांबलेल्या डोंगररांगेत बेडशाची लेणी आहेत. तळेगावपासून पौडकडे जाणाऱ्या बसच्या मार्गावर प्रथम बेडसे लेणी

लागतात, मग पवना धरण लागते आणि त्यानंतर तिकोना किल्ला लागतो. पुण्यापासून तळेगावमार्गे तिकोन्याचा किल्ला सत्तर किलोमीटर दूर आहे. पौड–कोळवण मार्गे पुणे ते तिकोना अंतर पंचावन्न किलोमीटर भरते. स्वत:च्या वाहनाने अथवा प्रासंगिक करारावर घेतलेल्या बसने प्रवास केल्यास पवना धरण, बेडसे व तिकोना ही तिन्ही स्थळे एका दिवसात पाहता येतात. मात्र त्यासाठी पुणे–पौड–कोळवण–तिकोना–पवना धरण–बेडसे–तळेगाव–पुणे असा वर्तुळाकार मार्ग घ्यावा.




पुण्याहून पहाटे शक्य तितक्या लवकर निघावे म्हणजे तिकोना किल्ल्यावर चढताना ऊन लागत नाही. पौड–कोळवण वरून जाणाऱ्या रस्त्याची अवस्था फारशी चांगली नसल्याने प्रवासास वेळ लागतो. पुण्याहून सकाळी सहा वाजता निघाल्यास तिकोन्याच्या पायथ्याशी आपण नऊ वाजता पोचतो. गडावर चढून, हिंडून, पुन्हा पायथ्याशी उतरण्यास चार तास लागतात. पायथ्याशी तिकोनापेठ नावाचे गाव आहे. तिथल्या शाळेच्या किंवा एखाद्या घराच्या निवाऱ्यास बसून दुपारी एक ते दोन या वेळात

भोजन उरकावे. मग पवना धरणावर जावे. ते बघून होईपर्यंत दुपारचे चार वाजतात. बेडशाची लेणी बघण्यास सायंकाळी पाच ते सहा हा एक तासाचा अवधी द्यावा. मग तळेगावमार्गे रात्री नऊ वाजेपर्यंत पुण्यास परतावे.

रेल्वे आणि एस.टी. बसने प्रवास करायचा झाल्यास बेडसे लेणी आणि पवना धरण ही दोनच स्थळे एक दिवसात पाहता येतात. तिकोन्यासाठी दुसरा दिवस लागतो. किंवा तिकोन्यासाठी स्वतंत्र सहल आखावी लागते. अर्थात तिकोन्याच्या सहलीत जाता येता बसमधून पवना धरणाचे दर्शन आपोआपच होते. पवना धरणाकडे जाणारा रस्ता मुंबई–पुणे महामार्गावरील कामशेत गावाजवळून निघतो. पवना धरण कामशेतपासून १५ कि.मी. दूर आहे. धरणाजवळ काले कॉलनी नावाची वसाहत धरणाच्या बांधकामाच्या वेळेपासून वसली आहे. काले कॉलनीसाठी कामशेतहून बसेस सुटतात. तळेगाव, लोणावळा, तसेच मुंबईहून पौडकडे जाणाऱ्या बसेससुध्दा कामशेतहून पवना धरणाकडे जाणाऱ्या रस्त्यानेच पुढे पौडला जातात. तेव्हा, ह्या सहलीसाठी कामशेत रेल्वेस्थानक सोयीचे आहे. पुण्याहून सकाळी साडेसहा वाजता सुटणाऱ्या लोणावळा लोकलने निघावे. ही गाडी कामशेतवर साडेसात वाजता येते. मुंबईहून येणाऱ्या पर्यटकांनी बोरीबंदरहून रात्री सव्वाअकरा वाजता सुटणाऱ्या पुणे पॅसेंजरने निघावे. ही गाडी पहाटे साडेतीनवाजता कामशेतला पोचते. (आणि दिवस उजाडेपर्यंत वेळ कसा घालवावा असा प्रश्न पडतो. थंडीच्या दिवसात होणारे हाल तर विचारूच नका!) सहल संपल्यावर पुण्यास परतण्यासाठी कामशेतवर संध्याकाळी सव्वासहा तसेच रात्री आठ वाजता लोकल्स आहेत. मुंबईस परतणाऱ्यांनी प्रथम लोकलने लोणावळ्यास यावे व तिथून मिळेल त्या गाडीने अथवा बसने मुंबईला जावे.

पवना धरणाकडे जाणारी पहिली बस कामशेतहून सकाळी

पावणेसात वाजता सुटते. अवघ्या वीस मिनिटात ती करुंज गावापाशी पोचते. बेडसे लेण्यांसाठी येथे उतरावे. करुंजहून बेडसे गाव अगदी जवळ आहे. बेडसे गाव लेण्यांच्या डोंगराच्या अगदी पायथ्यालगत वसले आहे. लेण्यांची उंची फार नाही. पायथ्यापासून पंधरा–वीस मिनिटांत आपण चढण चढून लेण्यांपाशी पोचतो. गुंफांची तोंडे पूर्वेकडे आहेत. त्यामुळे सकाळच्या प्रहरी गुंफांमध्ये स्वच्छ, कोवळा, ऊबदार सूर्यप्रकाश शिरतो. सोनेरी किरणांमध्ये लेण्यांतील कोरीव नक्षीकाम जास्तच खुलून दिसते. शिल्पे सजीव होतात. लेण्यांचे फोटो काढण्यासाठी ही वेळ उत्कृष्ट होय.

बेडशाच्या मुख्य लेण्यात प्रवेश करताना त्याच्या दर्शनी भागातले चार प्रचंड खांब आपले लक्ष वेधून घेतात. खांबांवरचा भाग कमळासारखा कोरला असून त्यावर बैल आणि घोडा किंवा हत्ती आणि घोडा अशी दोन–दोन तोंडे असलेले प्राणी आहेत. त्या द्विमुखी प्राण्यांवर स्त्री–पुरुषांची जोडी विराजमान झालेली दिसते. गुहेत डावी–उजवीकडे प्रत्येकी तेरा खांब आहेत. हे खांब अष्टकोनी असून त्यांची उंची साडेतीन मीटर व जाडी अर्धा मीटर भरते. खांबांवर कमानी आहेत. गुहेच्या आतल्या टोकाशी अडीच मीटर व्यासाचा व सहा मीटर उंचीचा स्तूप आहे. हे पूजेचे व प्रार्थनेचे स्थळ असल्याने या गुंफेस चैत्य म्हणतात. बौध्द भिक्षूंच्या निवासासाठी दुसरीकडे मोठी गुंफा आहे. तिला विहार म्हणतात. विहारात ११ खोल्या आहेत. विहाराच्या उजवीकडे असणाऱ्या खोलीस गावकरी 'तालीम' म्हणतात.

चैत्य आणि विहाराशिवाय बेडशाच्या लेण्यांत आणखी तीन खोल्या आणि दोन मीटर व्यास व तेवढीच उंची असणारा स्तूप आहे. गुंफांबाहेर स्वच्छ पाण्याची एकूण सात कुंडे आहेत. पाणी गोड आहे. इथेच न्याहारी करावी. डोंगर उतरून पुन्हा गावात शिरल्यावर तिथले देऊळ बघावे. देवळात गणपती व मारुतीच्या मूर्ती असून एक शिवलिंग व नंदीही आहे.

बेडशापासून पवना धरण आठ–नऊ किलोमीटर दूर आहे. हे धरण सन १९७५ च्या सुमारास बांधून झाले. धरणाची भिंत सुमारे १ किलोमीटर लांबीची आहे. धरणावर उभे राहिल्यावर समोर विस्तीर्ण जलाशय पसरलेला दिसतो. पाण्याच्या एवढ्या प्रचंड साठ्यास अडवण्याचे धारिष्ट धरणाच्या ह्या भिंतीने केले तरी कसे? असे कौतुक वाटते. तलावापलिकडे तुंग किल्ल्याचे निमुळते शिखर आकाशाला टेकलेले दिसते. त्याचे पाण्यातील प्रतिबिंब पाताळाला टेकलेले दिसते. तुंग किल्ल्यावर जायचे असल्यास लाँचने तलावापलिकडे केवरे गावास जावे लागते. पण ती एक स्वतंत्रच सहल आहे. त्यासाठी लाँचच्या वेळा सांभाळाव्या लागतात.

पवना धरणापासून तिकोन्याचा पायथा सहा–सात किलोमीटर दूर आहे. पौडकडे जाणारी बस धरणानंतर एक लहानसा घाट चढून वरच्या पठारावर जाते. बसमधून गेवंडे वसाहतीच्या थांब्यावर उतरावे. तिथून पायवाटेने तिकोना पेठ गावापर्यंत चालण्यास वीस मिनिटे लागतात. ही वाट गडाच्या कुशीतील झाडीमधून जात असल्याने झाडीतून चालताना सुख वाटते. तिकोनापेठ हे गाव गडाच्या अगदी बगलेत वसले आहे. गडाच्या तटबंदीचा व बुरुजांचा प्रत्येक दगड गावातून स्पष्ट दिसतो. गडावर दोन वाटा जातात. एक वाट गावातील शाळेसमोरून सरळ उभी चढते. ती दमछाक करणारी आहे. तिच्यावरून चढण्यापेक्षा गड उतरताना तिकडून यावे. चढण्यासाठी दुसरी लांबची पण सोपी वाट धरावी. ती वाट प्रथम तिकोना व त्याच्या शेजारचा मांडवी डोंगर यांच्यामधल्या खिंडीत चढते व तिथून डोंगराच्या तिरप्या धारेवरून किल्ल्यावर जाते. या वाटेवरील एका प्रचंड शिळेवर मारुतीची शेंदूरचर्चित सुबक मूर्ती कोरलेली आहे. पुढे, गडाच्या दरवाज्याजवळ एक मोठी गुहा आणि पाण्याचे टाके आहे. गडाच्या माथ्यावर इमारतीचा, देवळाचा अथवा झाडाचा असा कोणताही निवारा नसल्याने बहुतेक लोक गड बघून झाल्यावर याच पाण्याच्या टाक्यापाशी

परतून, खाणेपिणे उरकून, गुहेत थोडी विश्रांती घेतात. इथून माथ्यावर जातान वाटेत शंकराचे एक लहानसे देऊळ लागते.

तिकोन्यावरून चारी दिशांना दृष्टी फेकली असता फार सुरेख दृश्ये दिसतात. पवना तलावापलिकडे तुंग किल्ला व मोरगिरीचा उंच डोंगर दिसतो. उत्तरेकडे लोहगड-विसापूरचे किल्ले दिसतात. दक्षिणेकडे मुळशी तलाव दिसतो. दूर आग्नेय दिशेस सिंहगड व त्याच्या उजवीकडे राजगड-तोरणा दिसतात.

तिकोन्याहून पौडकडे जाताना काशिक गावाच्या अलिकडे एक इतिहासकालीन विहीर बघण्यासारखी आहे. विहीर मोठी, चौकोनी, दगडी बांधणीची असून तिला पायऱ्या आहेत व एका भिंतीमधल्या कोनाड्यात देवतेची मूर्ती आहे.

* * *



किल्ले तिकोना



बेडसे लेणे


# ५. पाताळगंगा – उगमापासून मुखापर्यंत

पाताळगंगा ही रायगड जिल्ह्यातली एक लहानशी नदी आहे. ती खोपोलीजवळ सह्यपर्वतात उगम पावते आणि धरमतरच्या खाडीपाशी अरबी समुद्रास मिळते. उगमापासून मुखापर्यंत तिची लांबी जेमतेम पन्नास किलोमीटर भरेल. पण एवढ्या लहानशा प्रवासातदेखील तिच्या काठी अनेक प्रेक्षणीय स्थळे असल्याचे आढळते. पाताळगंगेच्या तीरावरुन प्रवास केल्यास सहलीपरी सहल तर होतेच; शिवाय नदीचा उगम कसा होतो, लोक तिच्या पाण्याचा उपयोग कसकसा करून घेतात, तिच्या काठी गावे कशी वसतात, उद्योगधंद्यांची कशी वाढ होते, नदी उंचसखल प्रदेशातून आपला मार्ग कसा काढते आणि शेवटी मुखापाशी गाळाचे प्रदेश कसे निर्माण करते ह्या सर्व गोष्टींचे आपल्याला प्रत्यक्ष ज्ञान मिळते. भूगोल प्रत्यक्ष वाचायला मिळतो. एका अर्थी ही शैक्षणिक सहल आहे.

ही सहल खोपोली, पेण व पनवेल भागातील रहिवाशांना एक दिवसात सहज उरकता येते. मुंबईकरांना आणि ठाणेकरांना देखील ही सहल एक दिवसात करता येते. सहलीची सुरुवात खोपोलीपासून करावी आणि शेवट पेण–पनवेल रस्त्यावरील खारपाड्याच्या पुलापाशी करावा. खोपोलीचे विद्युतगृह , मढचा गणपती, पाताळगंगा औद्योगिक संकुल, चावणे बंधारा, सावने धरण, आपट्याची देवळे, आपट्याचा रेल्वेपूल आणि खारपाड्याचा वैशिष्ट्यपूर्ण कमानींचा पूल ही या सहलीतली प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. स्वत:च्या वाहनाने किंवा खाजगी बसने गेल्यास वरील सर्व ठिकाणे पाहता येतात. एस.टी. बसेस वर अवलंबून राहिल्यास काही ठिकाणे सोडावी लागतात.



चावणे बंधारा


पाताळगंगा खोरे
प्रमाण कि.मी.
० २ ४ ६
उ
पनवेल
कर्नाळा
रासायनी
स्टे.
आपटा
चावणे बंधारा
सावने धरण
माणिकगड
खारपाडा
साई
खाडी
पाताळगंगा
औद्योगिक वसाहत
सजरोली
मढ
शीळ
खोपोली
पेण

प्रथम, पाताळगंगा नदी उगम कशी पावते ते पाहण्यासाठी बोरघाटात जावे. बोरघाट म्हणजे खोपोली आणि खंडाळा यांच्यामधला घाट होय. हा मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गावर मुंबईपासून नव्वद किलोमीटर अंतरावर आहे. खोपोलीच्या पुढे घाटाची काही वळणे चढून गेल्यावर पायथ्याच्या प्रदेशाचे विहंगम दृश्य दिसते. पावसाळ्यात मुद्दाम जावे. त्यावेळी डोंगरातून फुटणारे झरे आणि कड्यांवरून उड्या घेणारे धबधबे दिसतात. पुढे ते पाणी ओहोळांमधून वाहू लागते. ओहोळांचे ओढे बनतात आणि ठिकठिकाणचे ओढे एकत्र येऊन पाताळगंगा नदीचा जन्म होतो. नदीचा हा जन्म बोरघाटातून प्रत्यक्ष बघायला मिळतो.

खोपोली हे पाताळगंगेकाठचे पहिले गाव होय. खोपोलीतला पेशवेकालीन तलाव व तलावाकाठचे देऊळ बघण्यासारखे आहे. खोपोलीत टाटा इलेक्ट्रिक कंपनीचे विद्युत्‌गृह आहे. टाटांनी घाटमाथ्यावर बांधलेल्या तलावांचे पाणी मोठमोठ्या नळांमधून विद्युत्‌गृहात आणले जाते व त्या पाण्याच्या जोरावर पाणचक्की फिरवून वीजनिर्मिती केली जाते. नंतर हे पाणी पाताळगंगेत सोडले जाते. म्हणजे, वीजनिर्मिती पाताळगंगेच्या पाण्यावर होत नसून ती घाटमाथ्यावरून म्हणजे देशावरून कोकणात वळवून आणलेल्या पाण्यावर होते. पाताळगंगेला हे पाणी बोनस रूपात मिळते. त्यामुळे पाताळगंगा ही बारमाही वाहणारी नदी बनली आहे. कोकणातील इतर बहुतांश नद्या बारमाही नाहीत. त्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. विद्युत्‌गृहाचे पाणी पाताळगंगेत बाराही महिने जात असल्याने नदीकाठच्या शेतकऱ्यांना उन्हाळी भातशेती करणे शक्य असते. काही ठिकाणी अशी उन्हाळी भातशेती दिसते. परंतु शेतीपेक्षा मुख्यत: औद्योगिक कारखान्यांसाठी पाताळगंगेचे पाणी वापरले जाते.

पाताळगंगेच्या काठी खोपोलीपासून रासायनीपर्यंत एक लांबलचक औद्योगिक पट्टा निर्माण झाला आहे. त्यात अनेक कारखाने आहेत. त्यांना

धावती भेट द्यायची असल्यास खोपालीजवळच्या शीळ फाट्यावरुन प्रथम पेणच्या रस्त्यास लागावे. मग उजवीकडे सावरोलीच्या फाट्यावर वळावे. हा रस्ता हायको कंपनीच्या खरसुंडी येथील कारखान्यावरून थेट रासायनीपर्यंत जातो. या रस्त्यावर रिलायन्स आणि बॉम्बे डाइंग सारख्या प्रसिध्द कंपन्यांचे कारखाने आहेत. कारखान्यांना लागणारे पाणी पाताळगंगेतून उचलण्यासाठी नदीवर ठिकठिकाणी छोटे बंधारे घातले आहेत. कारखान्यांचे सांडपाणी शेवटी नदीसच मिळते. सांडपाण्यावर प्रक्रिया करूनदेखील नदीचे पाणी पुष्कळदा प्रदूषित होते.

वरील औद्योगिक क्षेत्राकडे जाणारा मुख्य रस्ता हा मुंबई–पुणे रस्त्यावरील पनवेल व चौकच्या दरम्यान असणाऱ्या दांडफाट्यावरून निघतो. पुढे या रस्त्यास दोन फाटे फुटतात. डावीकडचा फाटा पाताळगंगा ओलांडून पलिकडे रिलायन्स, बॉम्बे डाइंगच्या कारखान्यांकडे वळतो. उजवीकडचा रस्ता हिंदुस्थान ऑर्‌गॅनिक केमिकल्सच्या प्रकल्पाकडे जातो. याच प्रकल्पास रासायनी म्हणतात. दांडफाट्यापासून रासायनी ६ कि.मी. दूर आहे. शक्य असल्यास आधी परवानगी काढून वरील कारखाने पहावेत. म्हणजे औद्योगीकरण काय असते याची नीट कल्पना येईल.

खोपोलीपासून रासायनीपर्यंत पाताळगंगेच्या काठी एक मढचा गणपती वगळता इतर प्रसिध्द देवस्थाने नाहीत. मढचा गणपती हा अष्टविनायकांमधला आहे. तिथे गणेशजयंतीस म्हणजे माघ शुक्ल चतुर्थीस मोठा उत्सव असतो. मुंबई–पुणे रस्त्यावर खालापूर आणि खोपोली यांच्या दरम्यान मढचा फाटा आहे. तिथून मढ फक्त दोन किलोमीटर अंतरावर आहे. गावात राहण्या–जेवण्याची सोय पुजारी अथवा भटजींच्या घरी होऊ शकते. देवळाजवळ तळे आहे. उत्सवाच्या दिवशी देवाची पालखी रात्री देवळातून निघते व तळ्याला प्रदक्षिणा घालून परत येते.

पाताळगंगेकाठची मुख्य देवालये रासायनीच्या पुढे आपटा

गावाजवळ आहेत. उगमापासून वायव्य दिशेकडे तोंड करुन वाहणारी पाताळगंगा रासायनीच्या अलिकडे आपला रोख बदलते आणि एक मोठे वळण घेऊन नैऋत्यवाहिनी बनते. आपट्याजवळ ती पश्चिमवाहिनी होते. रासायनीपासून आपट्यापर्यंत ६ किलोमीटरचा रस्ता पायी चालायला चांगला आहे. रस्त्याला फारशी वर्दळ नसते. उजवीकडे कर्नाळा किल्ल्याची सोबत असते. कर्नाळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्यावरचा उंच सुळका. हाताचे एक बोट वर धरावे तसा हा सुळका दिसतो. कर्नाळ्याभोवती झाडी बरीच आहे. पण ती रस्त्यापर्यंत येत नाही. रस्त्यावर सावली नाही. त्यामुळे रासायनी ते आपटा ही वाटचाल वर्षाऋतूत जशी सुखकर वाटते तशी इतर ऋतूंत वाटत नाही. (कर्नाळ्याच्या दुसऱ्या बाजूने जाणारा पनवेल-पेण रस्ता मात्र कर्नाळा अभयारण्याच्या दाट झाडीतून जातो.)

आपटा रेल्वे स्थानक हे एक मजेशीर स्थळ आहे. त्याची प्रकृती नेहमीच्या रेल्वे स्थानकांपेक्षा अगदी भिन्न आहे. तेथे माणसांची वर्दळ अजिबात नसते. स्टेशनमास्तर आणि बावटेवाला अशी मोजून दोनच माणसे इथे असतात. सिनेमातील रेल्वेदृश्यांच्या चित्रीकरणासाठी कधी कधी फिल्मी मंडळी इथे येतात. त्यांनी स्वत:बरोबर ह्या रेल्वेस्थानकासही केलेल्या रंगरंगोटीमुळे हे स्थानक नेहमी अप-टु-डेट, टापटिपीचे दिसते. इथल्या बाकड्यांवर निवांत बसायला मजा वाटते. स्टेशनाबाहेर लाडूबाईचे देऊळ आहे. त्यात देवीची रंगीत मूर्ती व २-३ जुनी शिल्पे आहेत.

स्टेशनपासून जवळच पाताळगंगा नदीवर बंधारा बांधलेला आहे. त्याला चावणे बंधारा म्हणतात. (चावणे गाव नदीपलिकडे आहे.) ह्या बंधाऱ्याने अडविलेले नदीचे पाणी अनेक गावांना पुरविले जाते. इथल्या पंपिंग स्टेशनजवळ झाडी चांगली आहे. नदीचे सान्निध्य आणि वृक्षांची सावली या दोन अनुकूल गोष्टींमुळे हे स्थळ वनभोजनासाठी छान आहे. पावसाळ्यात नदीचे फुगलेले पात्र आणि बंधाऱ्यावरून घनगंभीर आवाज

करीत उडी घेणारा पाण्याचा ओघ यांचे दृश्य प्रेक्षणीय असते. पावसाळ्यानंतर पाणी कमी झाले की बंधाऱ्यावरून पलिकडे जायचा मार्ग मोकळा होतो. बंधाऱ्यावरून लोंकांची ये-जा सुरू होते. बंधाऱ्यापलिकडे सावने गावाकडे जाणारा रस्ता लागतो. सावन्याकडून येणारी एक छोटी नदी पाताळगंगेला मिळते. त्या नदीवर सावने गावामागे एक धरण बांधलेले आहे. ते धरणसुध्दा बघण्यासारखे आहे. धरणामागे माणिकगड नावाचा किल्ला आहे. धरणाच्या भिंतीवर उभे राहिल्यावर पाण्यापलिकडे उंचच उंच माणिकगड दिसतो. त्याचे दर्शन दबदबा आणि दरारा निर्माण करते. जर वारा पडलेला असेल आणि जलाशय शांत असेल तर पाण्यात माणिकगडाचे प्रतिबिंब दिसते.

सावने धरणापर्यंत वाहनाने जायचे असेल तर मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाड्यापासून पाताळगंगा औद्योगिक संकुलाकडे नदीच्या उजव्या तीराने जाणारा रस्ता पकडावा. हा १२ किलोमीटर लांबीचा रस्ता अजून कच्चा आहे. त्याचे डांबरीकरण झालेले नाही. हा रस्ता काही वेळ आपटा-रोहा लोहमार्गास समांतर धावतो. नंतर त्याला सावन्याकडे जाणारा फाटा फुटतो.

आपट्याजवळ पाताळगंगा नदीवर बांधलेला रेल्वेचा पूल बघण्यासारखा आहे. दोन्हीकडे डोंगर अन् खालून वाहणारी नदी. पूल अरुंद आहे अन् त्याला कठडे नाहीत. पावसाळ्यात वादळ येत असता ह्या पुलावर जाणे धोक्याचे अन् धाडसाचे आहे. माणून वाऱ्याबरोबर पाचोळ्यासारखा उडून जाईल! मोठा थरारक अनुभव असतो.

आपटा हे पाताळगंगेकाठी वसलेले एक जुने गाव आहे. गावातील गल्लीबोळ, वाडे, देवळे आणि तलाव पेशवाईच्या खाणाखुणा अंगावर बाळगून आहेत. गावातला तलाव मोठा आहे. त्याला पायऱ्यांचा घाट बांधलेला आहे, तलावाकाठी गणपतीचे, मारुतीचे व शंकराचे अशी तीन

देवळे आहेत. देवळांचे व त्यांच्या उंच कळसांचे तलावात पडलेले प्रतिबिंब मनोहारी दिसते. शिवमंदिराच्या कौलारू सभामंडपातील लाकडी खांबांवर कलाकुसरीचे नक्षीकाम अजून टिकले आहे.




आपटयाचा तलाव आणि मंदिरे

आपटा गावावरून जाणारा रस्ता हा एका बाजूस मुंबई–पुणे महामार्ग तर दुसऱ्या बाजूस मुंबई–गोवा महामार्ग यांना जोडणारा दुवा आहे. गोवा रस्त्यावर कर्नाळा अभयारण्यानंतर, मुंबईपासून ६५ कि.मी. अंतरावर आपटा फाटा लागतो. तेथून आपटा फक्त पाच किलोमीटरवर आहे. एवढ्या छोट्या अंतरात तीन सुरेख देवळे आहेत. दत्तमंदिर, शिवमंदिर आणि साईबाबा मंदिर. पहिले दत्तमंदिर हायवेपासून फक्त एक किलोमीटर अंतरावर आहे. त्याच्या प्रवेशद्वारापाशी मेघडंबरीखाली गणपतीची सुरेख मूर्ती बसवलेली आहे. तिच्यावर सप्तमुखी नागफडा आहे. इथून मंदिरापर्यंत लहानशी सडक जाते. मंदिराचा परिसर झाडीने युक्त आहे. जवळून पाताळगंगा वाहते.

दत्तमंदिर बघून पुढे गेल्यावर लगेच शिवमंदिर आहे. ते सुरेख

रंगरंगोटी केलेले, फिल्मी ढंगाचे दिसते. ते सिनेकलावंतांनी बांधले. मंदिरावर कळसाच्या ऐवजी भव्य शिवलिंग आहे. मंदिराभोवती रम्य फुलबाग आहे. हे मंदिर अलिकडे पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. प्रवेशद्वारापासून मंदिरापर्यंत जाणारी फरसबंदी वाट, तिच्या दोन्ही बाजूस ओळीने मांडलेल्या, शोभिवंत फुलांच्या, तांबड्या मातीच्या कुंड्या, गवत कापून व्यवस्थित निगा राखलेली हिरवी लॉन्स, मंदिरातल्या संगमरवरी फरश्या व भिंती, सगळीकडे राखलेली स्वच्छता आणि साधलेली रंगसंगती ह्या सर्व गोष्टी वाखाणण्याजोग्या आहेत.

शिवमंदिर आणि आपटा गाव यांच्यादरम्यान एका खाजगी मालकीच्या जागेत लहानसे साईबाबा मंदिर आहे. ते छोट्याशा उंचवट्यावर बांधले आहे. आजूबाजूस झाडी आहे. मंदिरातल्या घंटीचा किणकिणता नाद इथल्या शांत परिसरावर छोटे छोटे तरंग उमटवितो. इथून आपटा फक्त २ किलोमीटर दूर आहे.



आपटयाजवळचे शिवमंदिर

पाताळगंगेवरील सर्वात मोठा आणि जुना पूल खारपाड्याजवळ

आहे. पनवेल–पेण रस्त्यावर आपटा फाट्याच्या फक्त एक किलोमीटर पुढे ह्या पूल आहे. त्याच्या कमानी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अशा पुलास बो–स्ट्रिंग गर्डर ब्रिज म्हणतात. या पुलाखालून पुढे गेल्यावर लवकरच पाताळगंगा नदी खाडीचे रूप धारण करते व समुद्रास मिळते.

पाताळगंगेच्या मुखाजवळच्या प्रदेशाचे उंचावरून अवलोकन करण्यासाठी साई गावामागच्या डोंगरावर जावे. साईकडे जाणारा फाटा हा आपटा फाटा आणि खारपाड्याचा पूल यांच्या दरम्यान आहे. फाट्यापासून गाव तीन किलोमीटर दूर आहे. डोंगराची एक सलग रांग थेट पनवेलपासून साईपर्यंत लांबली आहे. या डोंगरावर चढले असता पश्चिमेकडे धरमतर खाडीचे आणि रेवस व करंजा बंदरांचे सुरेख दर्शन घडते. पाताळगंगेबरोबर भोगावती आणि अंबा ह्या आणखी दोन नद्या इथे समुद्रास मिळतात.

आतापर्यंत आपण पाताळगंगेच्या उगमापासून मुखापर्यंत फेरफटका मारला. आपली ही सहल संपण्यापूर्वी जाता जाता आणखी तीन स्थळे बघावयास हरकत नाही. ताऱ्याचे युसुफ मेहरअली सेंटर, कर्नाळ्याचे अभयारण्य आणि शिरढोणचे वासुदेव बळवंतांचे स्मारक. तिन्ही स्थळे गोवा रस्त्यावर जवळजवळ आहेत. तारा हे गाव आपटा फाट्यापासून जवळ आहे. तिथे युसुफ मेहरअली संस्थेत ग्रामोन्नतीचे समाजकार्य गावकऱ्यांच्या सहकार्याने चालते. कर्नाळा येथे पक्षी–अभयारण्य आहे. तिथे राहण्यासाठी वनखात्याचे विश्रामधाम आहे. कर्नाळा किल्ला हा स्वतंत्र विषय आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी एक दिवसाची वेगळी सहल आखावी लागते. कर्नाळ्याहून पनवेलकडे जाताना वाटेत शिरढोण गाव लागते. हे वासुदेव बळवंतांचे गाव. तिथे ह्या क्रांतिवीराचे स्मारक उभारलेले आहे. तिथे जतन करून ठेवलेली खास वस्तू म्हणजे वासुदेव बळवंत त्यांच्या लहानपणी फिरण्यासाठी वापरत असलेली बोकडाची गाडी. गावात वासुदेव बळवंतांचा वाडा आहे. वाड्याजवळ मोठा तलाव आणि तलावाकाठी वासुदेव

बळवंतांच्या किल्लेदार आजोबांनी बांधलेले हनुमान मंदिर आहे. गावामागून कोकण–रेल्वे जाते.

कोकण रेल्वेचा प्रवास कुणी सहसा करीत नाहीत. परंतु पातळगंगेच्या सहलीखातर हा प्रवास मुद्दाम करावा. पनवेल ते आपटा हा छोटा रेल्वेप्रवास त्याच्या आगळेपणामुळे छोट्यांना आवडतो अन् मोठ्यांनाही आवडतो.

* * *

# ६. अंतूरचा किल्ला

मराठवाड्याचा पठारी प्रदेश आणि खानदेशचे सपाट मैदान यांना विभागणारी जी अजिंठ्याची डोंगररांग आहे त्या रांगेच्या एका सोंडेवर अंतूरचा किल्ला उभा आहे. त्याच्या दक्षिणेस औरंगाबाद जिल्हा आहे तर उत्तरेस जळगाव जिल्हा आहे. हा किल्ला मुसलमानी खानदानीचा वाटतो. पश्चिम महाराष्ट्रातल्या गडकोटांवर जसे शिवशाहीचे संस्कार झाले तसे संस्कार अंतूरच्या किल्ल्यावर झाले नाहीत. तुलना करायची झाल्यास अंतूरच्या किल्ल्याची तुलना देवगिरी ऊर्फ दौलताबादच्या किल्ल्याशी होऊ शकेल. दौलताबादचा किल्ला जितका प्रेक्षणीय आहे तितकाच अंतूरचा किल्लाही प्रेक्षणीय आहे. त्याच्यावर दरवाजे, बुरूज, तटबंदी, तलाव, टाकी, पडकोट, भुयारे, तळघरे, देऊळ, मशीद, पीर, कबरी अशा सर्व गोष्टी आहेत. तो औरंगाबादपासून फार दूरही नाही. असे असूनही अजिंठा–वेरूळला भेट देणारे पर्यटक जसे दौलताबादचा किल्ला आवर्जून बघतात तसे अंतूरचा किल्ला बघत नाहीत. याचे कारण म्हणजे दौलताबादचा किल्ला जसा इतिहासात गाजला तसा अंतूरचा किल्ला गाजला नाही. अंतूर नावाच्या मराठा अधिपतीने इसवी सन १४५० च्या सुमारास हा किल्ला बांधला. परंतु पुढे शंभर वर्षांनी अंतूरच्या वंशजांकडून तो मुसलमानांनी घेतला. किल्ल्यातील अनेक शिलालेखांवरून तो सोळाव्या व सतराव्या शतकात अहमदनगरच्या निजामशहाकडे असल्याचा पुरावा मिळतो. बराच काळ मुसलमानी अमलाखाली राहिल्यामुळे त्याच्यावरचे सुरुवातीचे हिंदू संस्कार पुसले गेले असावेत.

औरंगाबादपासून कन्नड–नागापूरमार्गे अंतूरचा किल्ला नव्वद

किलोमीटर दूर आहे. कन्नड हे तालुक्याचे गाव आहे. नागापूर हे गाव किल्ल्याजवळ आहे. कन्नडहून नागापूरला एस.टी. बस जाते. कन्नडहून गौताळा अभयारण्यातून नागापूरला जाणारा रस्ता थोडा जवळचा आहे; पण तो रस्ता कच्चा असल्याने वेळ जास्त लागतो. औरंगाबादहून सिल्लोडमार्गे नागापूरला जाणारा रस्ता अधिक लांबचा आहे. सिल्लोड हे सुध्दा तालुक्याचे ठिकाण आहे. सिल्लोडहून चाळीसगावला जाणारी एस.टी. नागापूरवरून जाते. सिल्लोड–चाळीसगाव रस्त्याच्या मध्यावर नागापूर असून त्याचे दोन्हीकडून अंतर सुमारे पंचेचाळीस किलोमीटर भरते. चाळीसगावहून सुटणारी बस नागदमार्गे म्हैसघाट चढून नागापूरला जाते. नागापूरपासून थेट किल्ल्यापर्यंत सात किलोमीटर कच्चा रस्ता तयार झाला आहे. त्यावरून जीप जाऊ शकते. चाळीसगाव आणि औरंगाबाद दोन्हीकडचे लोक अंतूरची सहल एक दिवसात करू शकतात.

अंतूरच्या किल्ल्यावर अगदी पायथ्यापासून पायी चढून जायची हौस असल्यास चाळीसगावहून एक जवळचा मार्ग आहे. प्रथम चाळीसगावहून बसने वीस किलोमीटर अंतरावरच्या नागद गावात जावे. नागदहून सव्वा तासाची वाट चालून बोपेवाडीस जावे. बोपेवाडी अगदी गडाच्या पायथ्याशी वसली आहे. तिथून गडावर चढण्यास दोन तास लागतात. पायथ्यापासून गडाची उंची सुमारे पाचशे मीटर भरते. (समुद्रसपाटीपासून गड आठशे मीटर उंचीवर आहे). बोपेवाडीहून चढून येणारी पाऊलवाट गडाच्या दरवाज्याजवळ नागापूरहून येणाऱ्या जीपच्या वाटेस मिळते. बहुतेक लोक बोपेवाडीहून चढून येण्यापेक्षा नागापूरहून सपाटीवरच्या रस्त्याने येणे पसंत करतात.

खुद्द नागापूर हे देखील एक प्रेक्षणीय गाव आहे. ते पूर्णा नदीच्या काठचे, सुबत्ता नांदत असलेले, एक जुने गाव आहे. तेथे नदीच्या घाटाजवळ पूर्णेश्वराचे प्राचीन देवालय आहे. देवळाला चारी बाजूने तट

घातलेला आहे. देवळाच्या आवारात काही समाध्या व वृंदावने आहेत. गावापासून थोड्या अंतरावर नागेश्वराचे देऊळ आहे. नागापूरपासून पश्चिमेस ७ कि.मी. अंतरावर पूरनवाडी गाव आहे. तेथे पूर्णा नदीचा उगम होतो. उगमापाशी एका वृक्षाखाली पडके देऊळ, विहीर आणि पाण्याचे कुंड आहे. इथून पूर्णा नदी दक्षिण-पूर्वेकडे वाहात जाऊन नांदेडजवळ गोदावरीस मिळते. पूरनवाडी आणि नागापूर यांच्या दरम्यान चिमणापूर गावाजवळ नदीवर लहानसे धरण बांधले आहे.

नागापूरहून अंतूरगडाकडे जात असता एका चढणीवर, रस्त्यापासून जरा दूर, उजव्या हातास, उजाड रानात एक दगडी खांब रोवलेला आढळतो. त्याला रणखांब म्हणतात. त्याच्यावर उर्दू भाषेत शिलालेख कोरलेला आहे. असे म्हणतात की, गैबंज शिवाली नामक बाबाचे धड रणखांबापाशी पडले व करंगळी नागापुरात पडली. खांबाची लांबी-रुंदी प्रत्येकी चाळीस सेंटिमीटर व उंची १.८ मीटर आहे. येथून जवळच एका झाडाखाली मारुतीची मूर्ती आहे. चढ संपल्यावर, सपाटीवर पाण्याचा तलाव आहे. येथून पुढे दोन किलोमीटर वाट चालल्यावर डोंगराची धार ओलांडून आपण पलिकडल्या अंगास जातो व ताबडतोब अंतूरचा किल्ला दृष्टीस पडतो. त्याच्या व आपल्यामध्ये घोड्याच्या नालासारखी दरी दिसते. दरीपलिकडे अंतूरगड एखाद्या सोंगटीसारखा दिसतो. दुरूनच डोळ्यात भरणारे गडाचे वैशिष्ट्य म्हणजे गडाच्या दक्षिण टोकापाशी उभा तासून काढलेला काळा कभिन्न कडा. गडाच्या इतर तिन्ही बाजूंस निसर्गतःच निर्माण झालेले खोल कडे आहेत. दक्षिण बाजूस नैसर्गिक कडा नव्हता. त्याबाजूस किल्ला उर्वरित डोंगराशी जोडला गेला होता. म्हणून, गडाच्या सुरक्षिततेसाठी दक्षिण बाजूस खिंडार पाडून व कडा तासून किल्ला उर्वरित डोंगरापासून विभक्त केला गेला.

गडाच्या पूर्वेकडच्या कुशीत साठ-सत्तर पायऱ्या चढून गेल्यावर

पहिला दरवाजा लागतो. पुढे आणखी दोन दरवाजे आहेत. त्यांची रचना पन्हाळगडावरील प्रसिध्द तीन–दरवाजांसारखी आहे. दरवाज्यामागच्या




अंतूरचा किल्ला

कोठीत एका साधूने आपला ससार थाटला आहे. पुढे लहानसा चढ चढून गेल्यावर विस्तीर्ण तलाव दिसतो. तलावाच्या काठावर घुमट असलेली कोठी आहे. तिच्यामागे तळघर आहे. गडाच्या उत्तर–पूर्व भागात धान्य अथवा दारुगोळा साठवण्याच्या मोठ्या कोठ्या आहेत. गडाचा सर्वात उंच भाग उत्तरेस आहे. तिथे उंचवट्यावर ईदगासारखा दिसणारा चौथरा बांधलेला आहे. ती निशाणकाठीची जागा असावी. चौथऱ्यास पायऱ्या आहेत. त्या चढून गेल्यावर आपण सर्वोच्च जागी उभे असतो. तेथून चौफेर दृष्टी टाकली असता उत्तरेकडे खानदेशचे मैदान एखाद्या नकाशासारखे पसरलेले दिसते. इतर तीन बाजूंना सातमाळा रांगेतले डोंगर व दऱ्या दिसतात. चौथऱ्यावरून खाली उतरून किल्ल्याच्या विरुध्द टोकाकडे जात असता एक पडकोट म्हणजे आडवी भिंत लागते. तिच्यातील दरवाज्यातून पलिकडे गेल्यावर दक्षिण बुरुजात एक दर्गा दिसतो. त्या बाजूची तटबंदी दुहेरी आहे

व त्यात एक चोरदरवाजा लपला आहे. गडावर मुक्काम करायची वेळ आल्यास वरील दर्गा हीच एक निवाऱ्याची जागा आहे.

मराठवाड्यातील एक नमुनेदार गड म्हणून अंतूरचा किल्ला लक्षात राहतो.

* * *




(अंतरे किलोमीटरमध्ये)


# ७. माळशेज घाट

बोरघाट आणि थळघाट या इंग्रजी अमदानीत बांधलेल्या दोन जुन्या घाटांच्या मध्ये अलिकडच्या काळात माळशेजघाट हा नवा रस्ता बांधण्यात आला. त्यामुळे जुन्नर आणि नगरकडचा भाग मुंबईस जवळ आला. माळशेजघाट मुंबईपासून दीडशे किलोमीटर दूर आहे. तो पुण्यापासून सव्वाशे किलोमीटर आणि नाशिकपासून दीडशे किलोमीटर अंतरावर आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने तेथे पर्यटक निवास बांधला आहे. तेथे दिवसेंदिवस पर्यटकांची वर्दळ वाढते आहे.

माळशेज घाटाचा माथा समुद्रसपाटीपासून सुमारे सहाशे मीटर उंचावर आहे. घाटमाथ्यावर विस्तीर्ण पठार आहे. पठाराची पश्चिमेकडची सीमा ही दरीच्या अगदी काठाशी आहे. तिथून पायथ्याच्या प्रदेशाचे विहंगम दृश्य दिसते. दरीत उगम पावणारी काळू नदी मुरबाडच्या दिशेने वाहात जाते. मोटारीचा रस्ता तिच्या डाव्या तीरावरून जातो. या रस्त्याची घाटातली वळणे, त्या वळणांवर अधून-मधून दिसणारी वाहने आणि त्या वाहनांचा ऐकू येणारा एकसुरी आवाज यामुळे इथून उठूच नये असे वाटते. या पॉइंटवरून सूर्यास्त छान दिसतो.

घाटमाथ्यावर पुष्पावती नदी उगम पावते व ओतूरच्या दिशेने वहात जाते. पुष्पावतीच्या उगमापाशी खिरेश्वर गावाजवळ प्राचीन शिवमंदिर आहे. हे मंदिर माळशेजच्या पर्यटकनिवासापासून आठ किलोमीटर दूर आहे. तिथे जाण्यासाठी प्रथम रस्त्याने २ कि.मी. चालून खुबी-फाट्यावर जावे. फाट्यापासून खुबी गावामार्गे खिरेश्वरपर्यंत कच्चा रस्ता आहे. वाटेत एक आश्रमशाळा लागते. तिथे आदिवासी मुले शिकतात. जाता जाता ही शाळा

जरूर बघावी.



हरिश्चंद्रेश्वर



खिरेश्वर

खिरेश्वराचे देऊळ गावाच्या अलिकडे डाव्या बाजूच्या भातखाचरांमध्ये दिसते. त्याला नागेश्वर असेही म्हणतात. दगडी बांधणीच्या मूळ देवळासमोर कौलारू छपराचा नवा सभामंडप बांधला आहे. देवळाच्या जुन्या छतावर सुंदर मूर्ती कोरलेल्या आढळतात. देवळामागे जो प्रचंड डोंगर दिसतो तोच हरिश्चंद्रगड होय. माळशेजघाटाची सबंध उत्तर बाजू या डोंगराने व्यापली आहे. जणू माळशेजघाटावर हरिश्चंद्रगड पहारा करतोय.

हरिश्चंद्रगडाची वाट खिरेश्वर गावातून जाते. ही वाट गडाच्या उजवीकडे दिसणाऱ्या खिंडीत चढते. खिंडीला तोलारखिंड असे नांव आहे. तोलारखिंडीतून गडावर चढायचा मार्ग अवघड आहे. हा मार्ग उभ्या कड्याच्या अंगावरून वर चढतो. शालेय विद्यार्थ्यांसाठी तसेच डोंगर चढायचा सराव नसणाऱ्या प्रौढांसाठी ही वाट योग्य नाही. गडावर जाण्यासाठी पाचनई गावाकडून सोपी वाट आहे. पण ते गाव गडाच्या

विरुध्द अंगास आहे. थोडक्यात – गडावरील गुंफा, देवळे व कोकणकड्यामुळे जरी हा किल्ला निश्चितपणे प्रेक्षणीय असला तरी तो स्वतंत्र सहलीचा विषय आहे हे ध्यानात ठेवावे. माळशेजघाटाच्या एक दिवसाच्या सहलीत हा किल्ला बसू शकत नाही.

एक दिवसात माळशेजघाट बघून परतू इच्छिणाऱ्या लोकांनी कल्याणच्या बस स्थानकावर सकाळी लवकर जमावे. साडेसहा ते सातच्या दरम्यास तेथून नगर, मंचर आणि पोखरी ह्या तीन बसेस सुटतात. त्या अडीच–पावणेतीन तासांत माळशेजघाटात पोचतात. घाटमाथ्यावर बसचा थांबा आहे. तेथून पर्यटक निवास जवळच आहे. परंतु सहलीचा आनंद लुटायचा असेल तर थेट घाटमाथ्यापर्यंत बसने न जाता घाटाच्या पायथ्याशी उतरावे व तेथून चालत घाट चढावा. घाटाच्या पायथ्याशी सावर्णे नावाचे गाव आहे. तिथून माथ्यापर्यंत बारा किलोमीटर चढण आहे. एवढे अंतर कापायला तीन ते चार तास लागतात. थंडीच्या दिवसात सकाळी नऊ ते दुपारी बारा–एक वाजेपर्यंत हा वळणा–वळणाचा घाटरस्ता मित्रांच्या साथी–संगतीत चढायला फार मजा येते. श्रावण महिन्यातल्या रिमझिम पावसात देखील अशीच मजा येते. घाटाच्या शेवटी एक मोठे वळण आणि बोगदा आहे.

सावर्ण्यापासून माळशेजपर्यंत पायी जाण्यासाठी आणखी एक घाटवाट आहे. ती सावर्ण्याजवळच्या थिटवी गावातून घाटमाथ्यावर जाते. सध्याचा डांबरी रस्ता होण्यापूर्वी हीच वाट लोकांच्या वापरात होती. तिला जुना माळशेजघाट म्हणतात. या जुन्या घाटाची चढण थिटवीपासून सुरु होते. सावर्ण्यापासून थिटवी चार किलोमीटर दूर आहे. थिटवी हे गाव तीन बाजूंनी डोंगरांनी वेढले गेले आहे. नव्या घाटरस्त्यापेक्षा जुन्या घाटाची चढण अधिक दमछाक करणारी आहे. त्यामुळे त्या मार्गाने चढण्यापेक्षा परतताना उतरणे जास्त सोयीचे आहे. आपल्या आवडीनुसार व शारीरिक कुवतीनुसार

पर्याय निवडावा. म्हणजे डांबरी रस्त्याने घाटमाथ्यावर जाऊन पाऊलवाटेने थिटवीस उतरावे किंवा पाऊलवाटेने चढून मोटाररस्त्याने उतरावे. श्रम आणखी कमी करायचे असतील तर घाट बसनेच चढावा आणि उतरताना पायी यावे. मात्र, घाटातून एकदा तरी पायी गेल्याशिवाय सहलीची पुरी मजा येत नाही, हे नक्की.

कल्याणहून घाटाकडे जात असता, मुरबाड मागे पडल्यावर, सरळगाव व टोकवडे यांच्या दरम्यान सह्याद्री पर्वताच्या लांबलचक पसरलेल्या रांगेचा देखावा फार सुरेख दिसतो. डावीकडे कुलंग गडापासून उजवीकडे सिध्दगडापर्यंत पसरलेल्या त्या रांगेत आजापर्वत, हरिश्चंद्रगड, नानाचा अंगठा, जीवधन आणि ढाकोबा ही पर्वतशिखरे ओळखू येतात. पुढे मरोशी गावाजवळ भिंतीसारखा किंवा फणीसारखा चपटा, सरळसोट उभ्या कड्याचा डोंगर दिसतो. त्याला भैरवगड असे नाव आहे.

पुणे किंवा नाशिक येथून माळशेजघाटाकडे येणारे पर्यटक पुणे–नाशिक महामार्गावरील आळेफाट्यावरून माळशेजकडे येतात. काहीजण जुन्नरमार्गे येतात. जुन्नरजवळ शिवनेरी किल्ला आणि लेण्याद्रीचा गणपती ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. जुन्नरपासून माळशेजघाट फक्त तीस किलोमीटर दूर आहे.

* * *

# ८. गगनबावडा

गगनबावडा हा कोल्हापूरजवळचा एक देखणा किल्ला आहे. त्याला गगनगड किंवा गगनगिरी अशी आणखी दोन नावे आहेत. काही ठिकाणी त्याचा उल्लेख नुसता 'बावडा' असा केलेला सापडतो. गडाजवळ गगनबावडा आणि भुईबावडा अशी दोन गावे आहेत. त्यापैकी गगनबावडा गाव घाटमाथ्यावर, गडाजवळ वसले आहे; तर भुईबावडा गाव गडाच्या पायथ्याशी कोकणात वसले आहे. या दोन गावांना जोडणाऱ्या घाटरस्त्यास बावडाघाट म्हणतात. हा घाट कोल्हापूर ते राजापूर रस्त्यावर लागतो.

गगनबावड्यापासून आणखी एक घाटरस्ता कोकणात उतरतो. त्याला करूळघाट म्हणतात. त्याच्या पायथ्याशी करूळ गाव आहे. रस्ता करूळ वरून वैभववाडीमार्गे तळेरा गावापाशी मुंबई–गोवा महामार्गास मिळतो. या रस्त्यांमुळे कोल्हापूर, राजापूर आणि कणकवली भागातील शाळांचे विद्यार्थी गगनबावड्याची सहल एक दिवसात करू शकतात. गगनबावडा कोल्हापूरपासून ५३ कि.मी., राजापूरपासून ४३ कि.मी. आणि कणकवलीपासून ४८ कि.मी. अंतरावर आहे. जाण्यायेण्याच्या प्रवासात व्यतीत होणारे चार तास वगळता गडावर हिंडून सर्व स्थळे बघण्यासाठी भरपूर वेळ मिळतो.

गडावर बघण्यासारखी ठिकाणे पुष्कळ आहेत. गगनगिरी महाराजांचा मठ, गैबीसाहेब दर्गा, प्राचीन काळची लेणी, गुहा, पाण्याची टाकी, बुरूज, तटबंदी, दरवाजे, निशाणकाठीची जागा वगैरे गोष्टी बघता बघता तीन–चार तास सहज निघून जातात. गावातून किल्ल्यावर येण्या–जाण्यासाठी एक–एक तास लागतो. याचा विचार करता, आपली

बस सकाळी नऊ वाजण्यापूर्वी गगनबावडा गावात पोहोचू शकेल अशा बेताने घरून निघावे. म्हणजे, १० वाजेपर्यंत आपण गडावर पोहोचू शकतो. पुढे दोन तास गडावर हिंडावे. दुपारी १२ ते २ या वेळात जेवण करून थोडी विश्रांती घ्यावी. उन्हाचा चटका कमी झाल्यावर गडावरील राहिलेली ठिकाणे पहावी आणि चार वाजता परतीच्या प्रवासास लागावे.

गगनबावडा हे गाव लहान आहे. गावात श्रीरामाचे मोठे देऊळ आहे. ते रामचंद्र नीलकंठ अमात्य (ऊर्फ पंतअमात्य) यांनी रामदासस्वामींच्या सांगण्यावरून बांधले. पंतअमात्य हे शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानांपैकी एक होत. बावडा हे त्यांचे जहागिरीचे गाव होय. ते समुद्रसपाटीपासून सुमारे सहाशे मीटर उंचीवर, पश्चिमघाटाच्या माथ्यावर वसले आहे. तेथे जिल्हापरिषदेने विश्रामधाम बांधले आहे.

कोणताही किल्ला बघण्यासाठी डोंगर चढावा लागतो. पण या नियमास बावडागडाचा अपवाद आहे. येथे प्रथम एक डोंगर उतरावा लागतो आणि मग दुसरा डोंगर चढावा लागतो. याचे कारण, बावडा किल्ला घाटमाथ्यापासून सुटा पडला आहे. किल्ला आणि घाटमाथा यांच्यामध्ये असणाऱ्या खिंडीत आधी शे-सव्वाशे मीटर उतरावे लागते; मग गड चढावा लागतो.

बावडा गावातून किल्ल्याकडे जाणाऱ्या वाटेवर इठलाई देवीचे देऊळ आहे. देवळानंतर उतार सुरू होतो. उताराच्या पहिल्याच वळणावर उजव्या हातास दगडी तटावर एक छोटी देवळी आहे. तिथून दरीपलिकडे, समोर संपूर्ण किल्ला एका दृष्टीत मावतो. पाताळासारखी खोल दरी, तिच्यातून मेरू पर्वतासारखा उभा ठाकलेला किल्ला आणि आपण उभे आहोत तिथून थेट किल्ल्यापर्यंत दिसणारी चिंचोळी पाऊलवाट यांच्या एकाच वेळी घडणाऱ्या दर्शनामुळे डोळे सुखावतात आणि पावले वाटचालीस उत्सुक होतात.

खिंडीपर्यंत अर्धा किलोमीटर लांबीच्या उतरणीवर ठिकठिकाणी पायऱ्या आहेत. खिंडीमध्ये डावी–उजवीकडून आणखी दोन वाटा येऊन मिळतात. डावीकडची वाट करूळहून येते. उजवीकडची वाट भुईबावड्याहून येते. सध्याचे डांबरी घाटरस्ते बांधण्यापूर्वी ह्या दोन घाटवाटा वापरात होत्या. मुख्य वाट खिंडीपासून वर, किल्ल्याच्या अंगावर चढू लागते. चढणीवर जागोजाग पायऱ्या आहेत. विश्रांतीचे टप्पे आहेत. एका टप्प्यावर रानगव्याचा पूर्णाकृती पुतळा दिसतो. रानगवा हा पवित्र प्राणी आहे अशी श्रध्दा इथल्या लोकांत आढळते. (गगनबावड्याच्या दक्षिणेस दाजीपूरचे गवा–अभयारण्य आहे.)

गव्याच्या पुतळ्यापासून पायऱ्यांची एक खडी चढण चढून गेल्यावर गडाचा दरवाजा लागतो. गडात प्रवेश करताच प्रथम समोर गगनगिरी महाराजांचा मठ दिसतो. उजवीकडे मठाचे कार्यालय, पत्र्याचे छप्पर असलेले एक मोठे सभागृह आणि भक्तांसाठी निवासी खोल्या आहेत. मठाचा मुख्य भाग एका प्रचंड गुहेमध्ये थाटला आहे. गुहेच्या तोंडाशी देवदेवतांची मोठी चित्रे शिळांवर रंगवली आहेत. गुहेच्या एका कडेच्या भागात टी.व्ही.चा बशीच्या आकाराचा अँटेना आहे. मठापासून डोंगराच्या उजव्या कडेने जाणाऱ्या वाटेवर पाण्याची दोन कुंडे, ध्यान–धारणार्थ बसावयाची एक गुहा आणि देवीचे देऊळ आहे. वाटेच्या शेवटी निसर्गस्थळी नावाची ८–१० निवासी खोल्यांची इमारत बांधलेली आहे.

मठाच्या वरच्या बाजूस भव्य संगमरवरी देऊळ आहे. त्याच्या गाभाऱ्यात घोड्यावर स्वार झालेल्या तेज:पुंज तरुण स्वामींचे तैलचित्र आहे. देवळाच्या सभामंडपावर अनेक देवदेवतांच्या व संतांच्या मूर्ती बसवलेल्या आहेत. देवळासमोरच्या पठारावर हेलिकॉप्टर उतरण्यासाठी एक हेलिपॅड बांधलेले दिसते. तिथे स्वामींच्या दर्शनार्थ येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उतरत असाव्यात.

हेलिपॅडच्या पलिकडे एक शंकराचे देऊळ आहे. तिथून वर चढणारी वाट थेट गडाच्या माथ्यावर जाते. दुसरी आडवी वाट वळसे घेत गडाला प्रदक्षिणा घालते. गडाच्या माथ्यावर गैबीच्या दर्ग्याची पांढरी वास्तू, सदरेचा दगडी चौथरा, एक झाड, पाण्याचे टाके आणि सर्वात उंच जागी निशाणकाठीचा बुरूज आहे. तिथून आसमंतातील प्रदेश छान न्याहाळता येतो. गडाला वळसा घालणाऱ्या वाटेवर जागोजाग पाण्याची टाकी आहेत. पश्चिमेकडे कड्याच्या पोटात सात दरवाज्यांचे मोठे लेणे आहे. पश्चिम टोकावरचा बुरूज दुहेरी तटबंदीचा आहे. गड बघून बावडा गावाकडे परतताना आपण गडाकडे मागे वळून बघतो तेव्हा माथ्यावरचा पांढरा दर्गा आणि गडाच्या अंगावर तिबेटच्या पोत्ताला पॅलेससारखा दिसणारा मठ असे चित्र मनावर कोरले जाते.



गगनबावडयाचे नवे रूप

* * *

# ९. गाडेश्वर आणि मालडुंगा

तुम्ही कधी माथेरानला गेला असलात तर सूर्यास्त पहाण्यासाठी नक्कीच सनसेट पॉईंटवर गेला असाल. त्या पॉईंटवरून खालच्या प्रदेशावर नजर टाकल्यावर एक मोठा तलाव आणि त्या तलावाच्या परिसरात वसलेल्या चार पाच लहान वाड्या तुम्हाला एखाद्या सुंदर चित्रातल्या दृश्याप्रमाणे दिसल्या असतील. आणि तुमच्या मनात नक्कीच विचार तरळला असेल की दुरून इतक्या सुरेख दिसणाऱ्या त्या प्रदेशात आपल्याला कधी जाता आले तर काय बहार होईल!

मित्रांनो, माथेरानच्या उत्तर-पूर्व पायथ्याशी असणाऱ्या त्या प्रदेशाचे नाव आहे मालडुंगा अन् तिथल्या तलावाचे नाव आहे गाडेश्वर. तिथे जाण्याचा मार्ग पनवेलहून आहे. पनवेलहून गाडेश्वर गाव चौदा किलोमीटर दूर आहे. गाडेश्वरपासून पाच किलोमीटर पुढे गेल्यावर मालडुंगा गाव लागते. खुद्द पनवेल शहर मुंबईपासून फक्त ४८ कि.मी. अंतरावर आहे. त्यामुळे मुंबईहून गाडेश्वर-मालडुंगा सहल एक दिवसात होते. ठाणे, कल्याण तसेच पेण, अलिबाग येथूनही एक दिवसात ही सहल होऊ शकते.

गाडेश्वरचा मूळ तलाव ब्रिटिशांच्या अमदानीत पनवेल गावास पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आला. अलिकडच्या काळात पनवेल गावाचे रुपांतर मोठ्या शहरात झाल्यावर पाण्याची वाढती मागणी पुरविण्यासाठी गाडेश्वरच्या मागे काही अंतरावर कोंडीची वाडी येथे मोठे धरण बांधण्यात आले. माथेरानहून जो दिसतो तो हा कोंडीच्या वाडीचा तलाव होय. पण त्यालाच गाडेश्वर तलाव म्हणतात. आपण सोयीसाठी मूळ तलावाला गाडेश्वरचा छोटा तलाव म्हणू आणि नव्या तलावाला गाडेश्वरचा

मोठा तलाव म्हणू.

वरील दोन्ही तलाव ज्या नदीवर बांधले आहेत त्या नदीचे नाव गाडी किंवा गाढी असे आहे. ही नदी माथेरानच्या डोंगररांगेत उगम पावते, पश्चिमेकडे वाहत जाते, पनवेल गावाला वळसा घालते व पनवेलच्या खाडीस मिळते. पनवेल ते खोपोली रस्त्यावर गाढी नदीचा पूल लागतो. हिच्याच उगमाजवळ मालडुंगा गाव आहे. मालडुंगा गाव माथेरान, पेब, नाखिंड आणि चंदेरी (किंवा चांदेरी) अशा चार उंच डोंगरांनी वेढले गेले आहे. गाडेश्वरच्या मोठ्या धरणाच्या भिंतीवर जर आपण सूर्यास्त.होण्याच्या तासभर अगोदर उभे राहिलो तर वरील चारही डोंगर सोनेरी प्रकाशात अतिशय देखणे दिसतात. जलाशयात त्यांचे प्रतिबिंब पडते.



गाडेश्वरचा मोठा तलाव

गाडेश्वर–मालडुंगा सहलीसाठी पनवेलच्या बसस्थानकावर सकाळी आठ वाजता जमावे. मुंबईहून यायचे झाल्यास मध्य-रेल्वेच्या दादर स्थानकाजवळील ‘सिडको’ बसेसच्या थांब्यावरून सकाळी साडेसहाच्या सुमारास पनवेलसाठी सुटणारी बस पकडावी म्हणजे आपण पनवेलला आठ

वाजता पोहोचू शकतो. पनवेलहून थेट मालडुंगा गावच्या दुदाणवाडीपर्यंत जरी बसचा रस्ता झालेला असला तरी तो रस्ता बराचसा कच्चा आहे. दर पावसाळ्यात त्याची दुर्दशा होते. बस शेवटपर्यंत जात नाही. या रस्त्यावर नेरे हे एकच मोठे गाव आहे. तेथपर्यंत डांबरी रस्ता आहे. पनवेलपासून नेऱ्यापर्यंत दिवसाला पुष्कळ बसेस जातात. नेऱ्याच्या पुढे वाजे नावाचे गाव आहे. पनवेलहून सकाळी आठ वाजता वाज्यासाठी बस सुटते. ती बस पकडावी म्हणजे ऊन चढण्यापूर्वी आपण गाडेश्वरला पोहोचू शकतो.

नेरे गावाबाहेर एका तलावाकाठी शंकराचे देऊळ आहे. तलावाला पायऱ्यांचा घाट बांधलेला आहे. देवळाच्या आवारात काही जीर्ण वृक्ष आणि जुनी शिल्पे दिसतात. नेऱ्यापासून थोड्या अंतरावर शांतिवन नावाचे कुष्ठधाम आहे. तिथे कुष्ठरोग-निवारणाचे जे कार्य उत्तमरित्या चालू आहे त्याची लोकांनी चांगली दखल घेतली आहे. शांतिवनास खूप लोक भेट देतात. दरवर्षी जानेवारी महिन्यात तेथे शांतिवन मित्रमेळावा भरतो.

वाजे गावापासून थोड्या अंतरावर, प्रबळगडाच्या पायथ्याशी वाजापूर नावाचे ऐतिहासिक गाव आहे. वाजापुराबाहेर देवीचे देऊळ भग्नावस्थेत दिसते. तेथे दिक्पाल व देवतांच्या कोरीव मूर्ती आणि सात-आठ शिल्पे आहेत. जवळ एक दर्गा आणि मारुतीची मूर्ती आढळते. गावामागच्या डोंगराच्या खिंडीत वाघेश्वराचे देऊळ आहे. वाजापूरहून प्रबळगडावर जाण्यासाठी वाट आहे. प्रबळगडाचे एक शिखर मुख्य डोंगरापासून सुटे पडलेले आहे. ह्या वैशिष्ट्यपूर्ण आकाराच्या शिखरामुळे प्रबळगड खूप दुरूनसुध्दा नजरेत भरतो. त्या शिखरास कलावतीचा महाल असे नाव आहे.

वाजे आणि गाडेश्वर यांच्या दरम्यान टोपीसारखे शिखर असणारा एक डोंगर दिसतो. वाज्याहून जवळच्या पाऊलवाटेने गाडेश्वराला जाण्यासाठी ह्या डोंगराची लांबलेली पण ठेंगणी धार ओलांडावी लागते. वाज्याहून गाडेश्वरला जाणारा बसचा रस्ता खूप लांबून वळसा घेऊन जातो.

जर गाडेश्वरची बस मिळाली नाही तर वाज्यापासून वरील शॉर्टकटने गाडेश्वरला जावे.

गाडेश्वरचे देऊळ दिसायला अगदी साधे आहे. देवळाच्या ओवरीत मारुती व गणपती आहेत. गाभाऱ्यात शिवलिंगामागे असलेली देवीची मूर्ती अगदी रेखीव आहे. आवारात सतीची शिळा व एका चौथऱ्यावर सिंहमुखे कोरलेली आढळतात. देवळाजवळ लहानशी धर्मशाळा आहे. नदीपलिकडे वॉटरवर्क्स म्हणजे पाणी–शुध्दिकरण यंत्रणा आहे. तेथे गाडेश्वरच्या छोट्या तलावाचे पाणी गाळून व शुध्द करून जलवाहिनीवाटे पनवेलकडे पाठविले जाते. येथे पनवेल नगरपालिकेचे विश्रामधाम आहे. विश्रामधामात उतरायचे असल्यास आधी परवानगी काढावी लागते. विश्रामधामा भोवती सुरेख झाडी आहे.




गाडेश्वर मंदिर

गाडेश्वरहून मोठ्या धरणापर्यंत चालत जाण्यास पाऊण तास लागतो. त्या धरणाजवळही छोट्याश्या झाडीत लहानसे विश्रामधाम आहे. तलावाच्या पाणलोट प्रदेशात मालडुंगा गावच्या अनेक लहानमोठ्या

आदिवासी वाड्या आणि वस्त्या आहेत. एखाद्या वस्तीवर जाऊन तिथल्या आदिवासींचे जीवन जरूर बघावे. वाघाच्या वाडीतून माथेरानचा सनसेट पॉईंट अगदी जवळ दिसतो अन् मनात ऊर्मी उठते की जिथून आपण गाडेश्वर–मालडुंग्याचे प्रत्यक्ष विहंगम दर्शन घेतले त्या पॉईंटवर सरळ चढून जावे.

भूप्रवास 633

* * *



# १०. पेठचा किल्ला आणि आंबिवलीची लेणी

रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यात पेठचा किल्ला आणि आंबिवलीची लेणी ही दोन ऐतिहासिक स्थळे आहेत. ती एकमेकांपासून जवळ आहेत. तिथे जाण्यासाठी मुंबई-पुणे लोहमार्गावरील कर्जत स्थानकावर उतरावे लागते. कर्जतहून आंबिवलीला जाण्यासाठी बसेस असतात. कर्जत ते आंबिवली हे अंतर फक्त चोवीस किलोमीटर आहे. मुंबईहून तसेच पुण्याहून पेठ-आंबिवलीची सहल एक दि गात करता येते.

मुंबईहून निघणाऱ्या लोकांनी बोरीबंदरहून सकाळी ६-४५ वाजता सुटणाऱ्या डेक्कन एक्सप्रेसने कर्जतला जावे. ती गाडी क तला पावणेनऊ वाजता पोहोचते. पुणेकरांनी सकाळी ६-०५ वाजता पुणे स्थानकावरुन सुटणारी सिंहगड एक्सप्रेस पकडावी. ती गाडी कर्जतला सव्वाआठ वाजता पोचते. परतीच्या प्रवासात पुण्याकडे जाण्यासाठी कर्जतहून रात्री पावणेआठ वाजता महालक्ष्मी एक्सप्रेस मिळते. त्याच सुमारास मुंबईकडे जाणारी लोकल गाडी सुटते.

कर्जत तालुक्याच्या पूर्व सीमेवर सह्याद्री पर्वत उभा आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडे लांबलेल्या दोन पदरांवर तुंगी आणि पेठ हे दोन किल्ले आहेत. ह्या दोन पदरांमध्ये चिलार नदी उगम पावते व पश्चिमेकडे वाहत जाऊन पुढे ती उल्हास नदीस मिळते. आंबिवली गाव तुंगी व पेठच्या पायथ्याशी, चिलार नदीकाठी वसले आहे. याच नदीच्या अगदी काठालगत प्राचीन लेणी आहेत. ती आंबिवलीपासून जामरुख गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आहेत. कर्जत-मुरबाड रस्त्याचा एक फाटा कोठिंबे मार्गे आंबिवली-जामरुखकडे जातो. कोठिंबे गावात वनवासी कल्याण आश्रम

आहे. आश्रमाचे कार्य मुद्दाम भेट देऊन बघण्याजोगे आहे. कोठिंबे–आंबिवली रस्त्याचा एक फाटा धामणी गावाकडे जातो. हे गाव पेठच्या किल्ल्याच्या पश्चिमेकडच्या पायथ्याशी वसले आहे. पेठच्या डोंगरात उगम पावणारी चिरी नदी धामणीजवळून वाहते. कर्जतहून सुटणारी धामणी, आंबिवली अथवा जामरुख यापैकी कुठचीही पाटी असणारी बस पकडावी. आंबिवली व धामणी दोन्हीकडून किल्ल्यावर जाण्यासाठी पाऊलवाटा आहेत.

पेठच्या किल्ल्यास कोटलीगड अथवा कोथळागड असेही म्हणतात. हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे साडेचारशे मीटर उंच आहे. त्यापैकी दोन–तृतीयांश चढण चढून झाल्यावर म्हणजे तीनशे मीटर उंचीवर लहानसे पठार आहे. त्या पठारावर गडाच्या बगलेत पेठ गाव वसले आहे. हे गाव खव्यासाठी प्रसिध्द आहे. इथे तयार होणारा खवा लोणावळ्यास पाठवतात. आंबिवलीहून डोंगर चढून पेठ गावात पोहोचण्यास एक ते सव्वा तास लागतो. पेठहून किल्ल्यावर चढण्यास आणखी अर्धा तास लागतो. पेठहून दोन वाटा आहेत. एक वाट डोंगराच्या सोंडेवरून चढते, दुसरी वाट डोंगराच्या पाठीवरून चढते. शक्यतोवर गावातला एखादा वाटाड्या आपल्याबरोबर घ्यावा.

गडाला तीन दरवाजे आहेत. त्यापैकी पहिला दरवाजा पूर्णपणे ढासळला आहे. हा दरवाजा उभ्या कड्याच्या पोटाशी आहे. कड्याच्या भोवताली पाण्याची अनेक टाकी खोदलेली दिसतात. कड्यात एक मोठी गुंफा आहे. तिला गावकरी देऊळ म्हणतात. पण तिची रचना बौध्द विहारासारखी दिसते. गुहेच्या तोंडाशी स्वच्छ पाण्याचे टाके आहे. तिथून उजवीकडे चढणाऱ्या पायऱ्या गडाच्या माथ्यावर जातात. समोर मुख्य सभामंडपाकडे जाणाऱ्या बोळकांडीसारख्या मार्गाच्या उजव्या हातास दोन खोल्या आहेत. त्यापैकी एका खोलीत जोगेश्वरी आणि बहिरोबा यांच्या

मूर्ती आहेत. त्यांच्यापुढे घोड्यांचे दोन पुतळे आहेत. मुख्य सभामंडपात प्रवेश करताच डावीकडच्या भिंतीत तीन खिडक्या दिसतात व उजवीकडे प्रशस्त ओटा दिसतो. ओट्यामागे दोन खोल्या आहेत. ओट्याच्या डावीकडे एकात एक अशी आणखी दोन दालने आहेत. त्यापैकी आतल्या दालनाच्या दरवाजापाशी स्त्रियांची दोन सुबक शिल्पे आहेत. मुख्य दालनात कोरीव काम केलेले तीन खांब आढळतात.

वर वर्णन केलेली प्रशस्त गुंफा हे जसे पेठच्या किल्ल्याचे एक वैशिष्ट्य आहे तसे या किल्ल्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या नसराळ्यासारख्या शिखराच्या अंतर्भागात खोदलेला दगडी जिना. हा जिना वळणा-वळणाचा असून त्यास शंभर पायऱ्या आहेत. इतर किल्ल्यांच्या पायऱ्या डोंगराच्या पाठीवर उघड्यावर खोदलेल्या असतात. त्याउलट पेठच्या किल्ल्याच्या पायऱ्या डोंगराच्या पोटातून लपत छपत वर चढतात. त्यामुळे या पायऱ्या चढत असता आपण एखाद्या गुप्त मार्गाने रहस्यमय ठिकाणी दडवलेल्या खजिन्याकडे चाललो आहोत असे वाटते. पायऱ्या खऱ्या न वाटता स्वप्नातल्या वाटतात. पेठच्या किल्ल्याकडे आपण जेव्हा दुरून पाहतो त्यावेळी त्याच्या शिखराचा नसराळ्यासारखा आकार मनात कुतूहल उत्पन्न करतो हे खरे, पण त्यावेळी त्या शिखराच्या पोटातून आपल्याला वर जायचे आहे अशी काही कल्पना नसते.


हा पायऱ्यांचा मार्ग वर वर्णन केलेली प्रशस्त गुंफा आणि तिच्या तोंडाशी असणारे टाके यांच्यामधून सुरू होतो. तिथे किल्ल्याचा दुसरा दरवाजा आहे. सत्तर पायऱ्या चढून गेल्यावर एक अवघड जागा लागते. तिथे सुरक्षिततेसाठी लोखंडी कठडा बसवला आहे. पुढे बावीस पायऱ्या चढल्यावर तिसरा दरवाजा लागतो. त्या दरवाज्यावर वाघ आणि गजमुख अशी दोन शिल्पे कोरलेली आहेत. तिथून शेवटच्या आठ पायऱ्या चढून आपण गडाच्या माथ्यावर पाऊल ठेवतो. हा माथा लहानसा आहे. तो अरुंद

आहे. त्याची लांबीही फार नाही. त्याला बुरूज-तटबंदी आहे. पाण्याचे एक टाके तिथे आहे. लहान-सहान झुडुपे आहेत पण सावली देणारा एकही वृक्ष नाही.

खुद्द गडमाथ्यावर पाहण्यासारखे काही नसले तरी तिथे उभे राहिल्यावर आजूबाजूचा प्रदेश प्रेक्षणीय दिसतो. गडाच्या पूर्व बाजूस आणि दक्षिण बाजूस सह्याद्रीची भिंत उभी आहे. सह्याद्रीचा घाटमाथा गडापेक्षा अधिक उंच आहे. त्यामुळे गडावरून घाटमाथ्यावरचा प्रदेश दिसत नाही. गडाखालचे पेठचे पठार सह्याद्रीच्या एका उतरत्या सोंडेबरोबर जोडले गेले आहे. त्या सोंडेवरून चढणाऱ्या एका पाऊलवाटेने पेठचे गावकरी घाटमाथ्यावर जातात. गडाच्या उत्तरेस दिसणाऱ्या सह्याद्रीच्या एका सुटावलेल्या पदरास पदरचा किल्ला अथवा कळावंतीचा माळ असे नाव आहे. त्यापलिकडे भीमाशंकरचा कोकणकडा दिसतो. त्या कड्यावरच्या सर्वात उंच भागास नागफडा म्हणतात. भीमाशंकरच्या पलिकडे सिध्दगड दिसतो. वायव्य दिशेस तुंगीचे पठार आहे. पठारावर तिरप्या टोपीसारखा शोभणारा तुंगीचा किल्ला जवळजवळ पेठच्या किल्ल्याइतकाच उंच आहे. तुंगी आणि पेठ यांच्यामध्ये चिलार नदीचे खोरे दिसते. पश्चिम दिशेस दूर माथेरानची डोंगररांग दिसते. त्या रांगेत पेब आणि चांदेरीचे किल्ले ओळखू येतात.

माथ्यावरून आसमंत न्याहाळून झाल्यावर गड उतरून पेठेत यावे. मिळाल्यास खवा विकत घ्यावा. मग आंबिवलीकडे उतरू लागावे. उतरणीवरून आंबिवलीचा पाण्याचा तलाव सुरेख दिसतो. त्या तलावावर जाऊन छान आंघोळ करावी. स्नानानंतर चहा हवा. गावात चहाचे हॉटेल नाही परंतु दोन दुकाने आहेत, तिथे चहाची सोय होऊ शकते. नंतर वेळ उरल्यास लेणी पाहण्यासाठी जावे. पुष्कळदा लेणी पाहण्यासाठी पुरेसा वेळ उरत नाही कारण गड उतरून गावात येईपर्यंत संध्याकाळचे पाच वाजलेले

असतात अन् कर्जतकडे जाणारी शेवटची बस सहा वाजता येणार असते. लेणी सावकाशीने पहायची असल्यास आदल्या दिवशी सायंकाळी कर्जतहून आंबिवलीस यावे. रात्री आंबिवलीत मुक्काम करावा. भल्या पहाटे उठून पेठच्या चढणीस लागावे. म्हणजे ऊन होण्यापूर्वी किल्ला बघून होतो. आंबिवलीत परतल्यावर दुपारचे जेवण करावे. मग थोडी विश्रांती झाल्यावर लेणी पाहून यावे. (कर्जतहून सकाळच्या बसने आल्यास पेठचा किल्ला उन्हात चढावा लागतो.)




आंबिवलीच्या लेण्यास गावातले लोक 'याड' किंवा 'पांडवाई' असे म्हणतात. वास्तविक तो बौध्दांचा विहार आहे. तो गावाबाहेर एक किलोमीटर दूर आहे. नदीच्या एका मोठ्या वाकणावर, नदीकाठच्या खडकात हा विहार खोदला आहे. विहाराबाहेर दगडी चौथरा आणि अंगण आहे. दर्शनी भागात चार खांब आहेत. त्यानंतर ओवरी लागते. मग १२ मीटर लांब, तितकाच रुंद आणि ३ मीटर उंचीचा प्रशस्त सभामंडप लागतो. सभामंडपाच्या डावीकडे, उजवीकडे आणि समोर अशा तीन बाजूंस

प्रत्येकी ४ खोल्या याप्रमाणे एकूण १२ खोल्या आहेत. त्यात बौध्द भिक्षू निवास करीत असत. आता समोरच्या चार खोल्यांमध्ये उंच दगडी चौथऱ्यांवर देवतांच्या मूर्ती बसवलेल्या आढळतात. त्यात मारुती आणि विठ्ठल–रखुमाई आहेत. दुसरी जोडी राधा–कृष्णाची वाटते. तिसरी जोडी लक्ष्मी–विष्णूची असावी असे वाटते. मूर्ती बसवलेल्या चौथऱ्यांवर कोरीव नक्षीकाम आढळते. विहार आतून थंड असतो. दुपारच्या वेळी तिथे विश्रांती घ्यावी किंवा नदीत मनसोक्त डुंबावे.


* * *

# ११. मार्लेश्वर आणि टिकलेश्वर

रत्नागिरी जिल्ह्यात, संगमेश्वर तालुक्यात, देवरुखजवळ मार्लेश्वर आणि टिकलेश्वर ही दोन प्रेक्षणीय स्थाने आहेत. मार्लेश्वराचे देऊळ डोंगरात एका प्रंचड गुहेत आहे; तर टिकलेश्वराचे देऊळ एका डोंगरशिखरावर आहे. खूप उंचीवरुन कोसळणारा धबधबा हे मार्लेश्वराचे खास आकर्षण होय. मार्लेश्वराकडे जाताना आपण सह्याद्री पर्वताच्या एका दरीत प्रवेश करीत असल्याने आपणाला चारी बाजूस पर्वताचे उंच उंच कडे दृष्टीस पडतात, तर टिकलेश्वर हे शिखरावरचे ठिकाण असल्याने तेथून सह्याद्रीची लांबच लांब पसरलेली पर्वतरांग दिसते. मार्लेश्वर देवरुखपासून १९ किलोमीटर दूर आहे; तर टिकलेश्वर देवरुखच्या अगदी जवळ, फक्त ५ किलोमीटर अंतरावर आहे.

देवरुख गाव संगमेश्वर ते साखरपा रस्त्यावर आहे. संगमेश्वर हे मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरचे गाव आहे. साखरपा हे रत्नागिरी–कोल्हापूर हमरस्त्यावर आंबाघाटाच्या पायथ्याशी वसलेले गाव आहे. रत्नागिरीहून संगमेश्वर मार्गे देवरुख ६२ किलोमीटर अंतरावर आहे. साखरप्यामार्गे सुध्दा रत्नागिरी–देवरुख अंतर जवळजवळ तेवढेच आहे. परंतु तुळसणी मार्गे रत्नागिरी–देवरुख अंतर वरील दोन मार्गांपेक्षा थोडे कमी म्हणजे ४८ किलोमीटर भरते. रत्नागिरीहून मार्लेश्वर–टिकलेश्वरची सहल एक दिवसात करता येते. चिपळूणहून सुध्दा ही सहल एक दिवसाचीच आहे. चिपळूणहून देवरुख ६३ किलोमीटर अंतरावर आहे.

मार्लेश्वरापेक्षा टिकलेश्वरावर चढण्यास वेळ आणि श्रम जास्त लागतात. म्हणून सकाळच्या थंड वेळी प्रथम टिकलेश्वरावर जावे आणि मग



धबधब्याखालचे तुषारस्नान छायाचित्रकार – सूर्यकांत पिळणकर

दुपारी मार्लेश्वरास जावे. मार्लेश्वरास झाडी पुष्कळ असल्याने तेथे दुपारच्या उन्हाचा त्रास होत नाही. देवरुखहून पायी टिकलेश्वराला जाऊन परतण्यास पाच तासांचा अवधी लागतो. देवरुखला सकाळचा चहा व नाश्ता घेऊन सात ते आठ वाजण्याच्या दरम्यान निघावे म्हणजे टिकलेश्वर बघून दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत देवरुखात परतता येते. देवरुखहून दुपारी निघून मार्लेश्वरास जाऊन संध्याकाळी परतणे ही गोष्ट स्वतःचे वाहन असेल किंवा खाजगी बस ठरवली असेल तरच शक्य आहे. एस.टी. बसवर अवलंबून राहिल्यास घोटाळा होतो. कारण खाजगी वाहन जसे थेट मार्लेश्वराच्या पायथ्यापर्यंत जाते तशी प्रत्येक एस.टी. बस जात नाही. दर सोमवारी तसेच यात्रेच्या दिवशी बस पायथ्यापर्यंत जाते. एरवी ती फक्त मारळ गावापर्यंत जाते. खुद्द मारळसाठी देवरुखहून दिवसाला दोनच बसेस सुटतात. इतर बसेस त्या मार्गावर आंगवली व बामनोलीस जातात. अशा बसने गेल्यास चालण्याचे अंतर खूप वाढते. म्हणून, ज्यांचे स्वतःचे वाहन नाही त्यांनी देवरुखहून सकाळी पावणेनऊला सुटणाऱ्या बसने आधी

मार्लेश्वरास जावे आणि मग देवरुखला परतल्यावर वेळ शिल्लक राहिल्यास टिकलेश्वरास जावे. अन्यथा, सहलीचा पूर्ण वेळ मार्लेश्वरासाठीच द्यावा. मारळहून देवरुखला परतण्यासाठी संध्याकाळी ५ वाजता बस असते.

टिकलेश्वराच्या पायथ्याशी तलावडे नावाचे गाव आहे. ते देवरुखपासून ४ कि.मी. अंतरावर आहे. तलावड्यापासून डोंगर चढून देवळापर्यंत पोचण्यास एक तास लागतो. या डोंगरास 'टिकल्याचा डोंगर' किंवा नुसते टिकल्या म्हणतात. तो सुमारे साडेतीनशे मीटर उंच आहे. डोंगरावर करवंदीच्या जाळ्या भरपूर आहेत. मे अथवा जून महिन्यात डोंगर चढताना भरपूर करवंदे मिळतात. शिखरावर शंकराचे देऊळ आणि दोन सत्पुरुषांच्या समाध्या आहेत. मूळ देवळासमोर थोडी मोकळी जागा असून त्यावर निवाऱ्यासाठी आता कॉंक्रीटचे छप्पर घातले आहे. शिखराच्या थोड्या खालच्या अंगाने, छोट्या पाऊलवाटेने शिखरास प्रदक्षिणा घालता येते. त्या वाटेवर काही गुहा आणि पाण्याची टाकी आहेत. पूर्वेकडची गुंफा एकांतवासासाठी व ध्यानधारणेसाठी उत्तम असून तिथे कुणी साधू राहतो. पश्चिमेकडचे पाण्याचे टाके स्वच्छ आहे. लोक त्यातलेच पाणी पितात.

टिकलेश्वराचे पांढरा रंग दिलेले देऊळ देवरुखच्या परिसरात कुठूनही दुरून ओळखू येते. तसेच टिकलेश्वरापाशी उभे राहिल्यावर चारही बाजूंस खूप दूरदूरचा प्रदेश दिसतो. पूर्वेकडे महिमनगड किल्ला दिसतो. त्यामागे सह्याद्रीची रांग दिसते. घाटमाथ्यावर मार्लेश्वराची खूण म्हणून उभारलेला ध्वज दिसतो. पूर्वेस सह्याद्रीच्या पायथ्याशी दिसणाऱ्या गावाचे नाव 'कुंडी'. तिथून घाटमाथ्यावर चांदेल गावाकडे चढणाऱ्या पाऊलवाटेस कुंडीचा घाट म्हणतात. घाटमाथ्यावरील गोठणे गावापासून एक डोंगरवाट मारळ गावाकडे उतरते. त्या वाटेने घाटावरील गावकरी मार्लेश्वराच्या दर्शनास येतात.

मारळ हे गाव बाव नदीकाठी आहे. बाव नदी मार्लेश्वराच्या

डोंगरात उगम पावते व पश्चिमेकडे वाहत जाऊन शास्त्री नदीस मिळते. देवरूख -मारळ रस्ता निव्याचा घाट उतरल्यावर बाव नदीच्या काठाकाठाने जातो. मारळ गावापासून मार्लेश्वर(ऊर्फ मारळेश्वर)चा पायथा ४ किलोमीटर दूर आहे. पायथ्यापाशी एका साधूची मठी आहे. चढणीवर जागोजाग पायऱ्या आहेत. एका बाजूस उंच कडा, दुसऱ्या बाजूस खोल दरी, दरीतून वाहणारा ओढा, सर्वत्र दाट झाडी आणि निरव शांतता असे फार छान वातावरण अनुभवास येते. पंधरा-वीस मिनिटे चढण चढल्यावर मार्लेश्वराची गुहा येते. गुहेचे दार ठेंगणे असल्याने वाकून आत शिरावे लागते. गुहेची लांबी-रुंदी आठ-नऊ मीटर असून जास्तीत जास्त उंची साडेचार मीटर असावी. गुहेत शिवलिंग आणि नदी यांच्याव्यतिरिक्त वीतभर उंचीची शिवपार्वतीची एक अतिशय रेखीव मूर्ती आहे. गुहेच्या भिंतीतल्या फटींमध्ये व बिळांमध्ये काही नागांचे वास्तव्य आहे. देवाचे नाग समजून लोक त्यांना मारत नाहीत; उलट त्यांच्यासाठी दूध व इतर खाद्यपदार्थ ठेवतात. त्यामुळे ते नाग माणसाळलेले आहेत. लोकांना त्यांच्यापासून भय नाही. लोक मार्लेश्वराची पूजा करून निघून गेल्यावर ते नाग बिळातून बाहेर पडून रिकाम्या गुहेत जमिनीवर हिंडतात. सकाळी गुहेत प्रथम शिरणाऱ्या भक्तास नागोबाचे दर्शन होते. माणसांची फार वर्दळ नसेल तर काही वेळा गुहेबाहेर सुध्दा नागाचे दर्शन होते.

गुहेसमोर ओढ्याच्या पात्रात एक खोल डोह तयार झाला आहे. डोहात पाणसाप वळवळताना दिसतो. निळ्या रंगाचा खंड्या पक्षी एखादी मासोळी गवसेल या आशेने डोहावर येतो.

मार्लेश्वराचा प्रसिध्द धबधबा गुहेपासून पाच-सात मिनिटांच्या अंतरावर आहे. तिकडच्या वाटेवर एखाद-दुसरी देवळी दिसते. ओढ्याच्या पात्रात मोठमोठ्या शिळा पडल्या आहेत. त्या शिळांमधून मार्ग काढावा लागतो. एखाद्या शिळेवर चढून पलिकडे उडी मारावी लागते. याप्रमाणे

अडचणीतून मार्ग काढत आपण धबधब्याच्या पायथ्याशी पोचतो. तिथे पाण्याचे एक मोठे कुंड निर्माण झाले आहे. पावसाळ्यात धबधबा फार मोठा असतो. त्यावेळी धबधब्यापाशी जाणे अशक्य असते. पण हिवाळ्यात धबधब्याचा जोर कमी झाला की मग पायथ्याच्या कुंडास वळसा घालून, वरून पडणाऱ्या धारेच्या अगदी खाली जाऊन उभे राहता येते. धबधब्याच्या धारेत आणि तुषारांत मनसोक्त स्नान करता येते. आजूबाजूचे उंच उंच कडे हिमालयासारखे भासतात. डोक्यावर पडणारी धार स्वर्गंगेसारखी वाटते. धबधब्याचा घनगंभीर आवाज ओंकारध्वनीसारखा वाटतो. सूर्य पश्चिमेला ढळलेला असेल तर समोरून येणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांमुळे पाण्याच्या तुषारांवर साधे इंद्रधनुष्य नव्हे तर पूर्ण वर्तुळाकार इंद्रवज्र दिसते. त्यात आपली स्वत:ची प्रतिमा पडल्याचा सृष्टिचमत्कार दिसतो. मन थक्क होते, भारावून जाते. जगाचे अस्तित्व काही क्षण विरते. एक अननुभूत दैवी आनंद प्रत्ययास येतो.

मार्लेश्वराहून देवरुखला परतल्यावर वेळ असल्यास खुद्द देवरुख गावसुध्दा हिंडून बघावे. तिथली मातृमंदिर ही संस्था बघण्यासारखी आहे. तिथे अनेक अंगांनी सामाजिक कार्य चालते. देवरुखचे महाविद्यालय बघावे. इतर महाविद्यालयांना सहसा नसते इतके विस्तीर्ण पटांगण त्या महाविद्यालयासमोर आहे. तालुका कार्यालय आणि पोलीस ठाण्याजवळ एका महाप्रचंड वृक्षाचा अवशिष्ट बुंधा दिसतो. देवरुखचे ग्रामवैभव असलेला हा वृक्ष १९८९ सालच्या पावसाळ्यातील वादळात उन्मळून पडला. एखादा वृक्ष किती महाकाय असू शकतो याची कल्पना त्या नुसत्या बुंध्यावरून येते. गावातून वाहणाऱ्या ओढ्याकाठी असलेले गणपतीचे देऊळ आणि गावाबाहेर साखरप्याच्या रस्त्यावर असलेले सोळजाईचे प्रशस्त देऊळ प्रेक्षणीय आहे. देवरुखच्या जुन्या वस्तीत जुन्या घरांच्या मागे मोठमोठ्या खाजगी बागा व आमराया बघायला मिळतात. त्यांच्यामध्ये उभी असलेली

आंबे, फणस, काजू, कोकम, जांभळे वगैरे नानाविध फळझाडे बघितल्यावर गावाची खरी श्रीमंती कशात असते याची जाणीव शहरी माणसाला होते. देवरुख हे पठारावर वसलेले, समुद्रसपाटीपासून सुमारे दीडशे मीटर उंची असलेले गाव आहे. तिथली हवा नेहमी अल्हाददायक असते.



***

मार्लेश्वर धबधबा

# १२. नाणेघाट

कोकणप्रांत आणि दख्खनचे पठार (देश) यांना जोडणाऱ्या वाटांमध्ये प्राचीनकाळी नाणेघाटाचे फार महत्त्व होते. त्याकाळी उत्तरकोकणात सोपारा हे एक प्रमुख बंदर होते. पैठण ही देशावरची प्रमुख नगरी आणि बाजारपेठ होती. सोपारा आणि पैठण यांच्यामधले दळणवळण, म्हणजे मुख्यतः व्यापारी मालाची वाहतूक नाणेघाटातून चालत असे. बैलांच्या पाठीवर मालाच्या गोणी लादून ही वाहतूक होई. वाहतुकीच्या सोयीसाठी नाणेघाटात पक्क्या, दगडी पायऱ्या बांधण्यात आल्या. नाणेघाटाची बांधणी सातवाहनांच्या काळात झाली. नाणेघाटातील प्राचीन काळच्या खाणाखुणा आजही टिकून आहेत. शिवाजी महाराजांच्या काळात कल्याण-जुन्नर वाहतूक नाणेघाटातून चाले. जोपर्यंत कल्याणला बंदर म्हणून आणि जुन्नरला बाजारपेठ म्हणून महत्त्व होते तोपर्यंत नाणेघाटाचे महत्त्व टिकले.

कल्याण आणि जुन्नर भागातील शाळांना नाणेघाटाची सहल एक दिवसात करता येते. नाणेघाटाचा पायथा कल्याणपासून साठ किलोमीटर अंतरावर आहे. नाणेघाटाचा माथा जुन्नरपासून सुमारे पस्तीस किलोमीटर अंतरावर आहे. माणिकडोह धरण होण्यापूर्वी जुन्नरला नाणेघाट अधिक जवळ होता. आता बसचा रस्ता माणिकडोह धरणामागे अडवलेल्या विस्तृत जलाशयाच्या बाजूने वळणावळणाने घाटघर गावापर्यंत जातो. घाटघरपासून नाणेघाट तीन किलोमीटर दूर आहे.

नाणेघाटाच्या सहलीसाठी मुंबईहून येणाऱ्या सहलकऱ्यांनी घरून भल्या पहाटे निघून रेल्वेने कल्याणला यावे. कल्याणच्या बसस्थानकावरून ओतूर, नगर, बेल्हे, आळेफाटा, जुन्नर, सावर्णे, पोखरी, मरोशी, सरळगाव

यांच्यापैकी कोणतीही पाटी असलेल्या बसमध्ये चढावे. थोडक्यात, बस माळशेज घाटाकडे जाणारी हवी. सकाळी लवकर म्हणजे साडेसहा-सात वाजण्याच्या दरम्यान सुटणारी बस घ्यावी म्हणजे पुढे नाणेघाट चढताना उन्हाचा त्रास जाणवणार नाही. सरळगाव किंवा टोकवडे येथे जर बस थोडा वेळ थांबली तर रस्त्याकडेच्या हॉटेलात चहापाणी, नाश्ता उरकून घ्यावा. बसमधून वैशाखरे येथे उतरावे. हे नाणेघाटाच्या पायथ्याचे गाव आहे.

वैशाखरेपासून बसच्या रस्त्यावर अर्धा तास चालल्यावर साठाव्या किलोमीटरच्या दगडापाशी उजवीकडे झाडीत शिरणारा कच्चा रस्ता दिसतो. हा बैलगाडीचा रस्ता आहे; पण त्यावरून जीप काही अंतर जाऊ शकते. ह्या रस्त्याने थोडावेळ चालल्यावर एका उंचवट्यावर झोपडे दिसते. तिथून डावीकडे नाणेघाटाची वाट फुटते. घाटाची चढण सुरू होण्यापूर्वी लहानशा सपाटीवर बहिरोबाचे स्थान आहे. हा घाटाचा रक्षणकर्ता देव होय.

घाट चढू लागण्यापूर्वी दुरूनच 'नानाचा अंगठा' दिसतो. हा अंगठा म्हणजे डोंगरातला एक उभा सुळका आहे. त्याचा काळाकभिन्न कडा वस्तऱ्याने तासल्यासारखा तुळतुळीत दिसतो. त्याच्या डावीकडे त्याच्यासारखाच उभा तुळतुळीत कडा आहे. दोन्ही कड्यांच्या मध्ये एक खिंड नजरेस पडते. आपल्या उजव्या हाताचा तळवा समोर उभा धरल्यावर अंगठा आणि तर्जनी (पहिले बोट) यांच्यामध्ये जसा खोलगट भाग दिसतो तसा नानाचा अंगठा, डावीकडचा कडा व मधली खिंड यांचे दृश्य दिसते. आपल्याला त्या खिंडीत पोचायचे असते.

नाणेघाटाच्या पायऱ्या म्हणजे जिन्याच्या पायऱ्या नव्हेत. जुन्या काळात नदी पार करण्यासाठी जशी दगडांची फरशी नदीवर बसवलेली असायची तसे हे घाटाच्या पायऱ्यांचे दगड डोंगरचढणीवर घट्ट दाबलेले आहेत. इतक्या वर्षांच्या वाऱ्यापावसाच्या माऱ्याने अन् प्रवाशांच्या चढण्या-उतरण्याने ते झिजून गुळगुळीत बनले आहेत. चढताना नव्हे पण

उतरताना त्या गुळगुळीत दगडांवरून आपला पाय निसटू नये, मुरगळू नये म्हणून काळजी घ्यावी लागते.

घाटाची अर्धी चढण संपल्यावर वाटेच्या कडेला खोदलेले एक पाण्याचे टाके नजरेस पडते. त्या टाक्यातल्या थंडगार, स्वच्छ पाण्याने आपली तहान भागवावी. थोडा वेळ विश्रांती घेऊन पुन्हा चढू लागावे. खिंडीच्या अलिकडे वाट नळीसारखी चिंचोळी बनते. दोन्ही बाजूच्या कड्यांमधून वर निळ्या आकाशाचा पट्टा दिसतो. ह्या भागास नाणेघाटाची नळी किंवा नाळ म्हणतात. उजव्या हाताच्या कड्याच्या पोटात एक मोठी गुहा दिसते. ह्याच गुहेत नाणेघाटातला प्रसिध्द शिलालेख आहे. गुहेबाहेर मारुतीची मूर्ती आहे. पाण्याची काही कुंडे आहेत. रात्री मुक्काम करायचा झाल्यास ही गुहा राहण्यासाठी योग्य आहे.

गुहा तशीच उजवीकडे सोडून नळीची उरलेली चढण चढल्यावर आपण घाटाच्या माथ्यावर पोहोचतो. तिथे उजव्या हातास गणपतीची देवळी आणि डाव्या हातास एक मोठा दगडी रांजण दिसतो. त्याला जकातीचा रांजण म्हणतात. हल्ली ज्याप्रमाणे नव्या बांधलेल्या पुलापाशी वाहनचालकांकडून टोल वसूल करण्यासाठी टोलनाके असते किंवा मोठ्या शहरात आणल्या जाणाऱ्या मालावर जकात वसूल करण्यासाठी जकातनाके असते त्याप्रमाणे पूर्वी नाणेघाटापाशी हे जकातनाके असावे. व्यापाऱ्यांनी भरणा केलेली नाणी ह्या रांजणात साठवीत असावेत.

नाणेघाटावरून दिसणाऱ्या प्रदेशाचे विहंगमावलोकन करण्यासाठी नानाच्या अंगठ्यावर चढावे लागते. नानाचा अंगठा जरी घाटाखालून अजिंक्य वाटत असला तरी घाटमाथ्यापासून त्याची चढण मामुली आहे. गणपतीच्या देवळीपासून अवघ्या दहा मिनिटात 'अंगठ्या'वर पोचता येते. तिथे उभे राहून चौफेर नजर फेकली असता सर्वात प्रथम दृष्टीत भरतो तो जीवधनचा किल्ला. हा किल्ला नाणेघाटापासून अगदी जवळ आहे. मात्र,

त्याच्यावर जाण्याची वाट गडाच्या पलिकडच्या अंगास आहे. घाटघर गावातून वाटाड्या घेऊन मगच गडावर जावे. गडाच्या उजवीकडे गडापासून सुटावलेला, हाताच्या करंगळीसारखा, बारीक, उभट सुळका दिसतो. त्याला वांदरलिंगी म्हणतात. कुणी त्याला बाहुली म्हणतात. गावकऱ्यांमध्ये अशी दंतकथा प्रचलित आहे की शिवाजी महाराज सुरतेची लूट करून या बाजूने परतत असता लुटीपैकी काही ऐवज त्यांनी ह्या जीवधनच्या बाहुलीपाशी दडवला. बाहुली अजिंक्य दिसते खरी; पण तिच्याही माथ्यावर झेंडा रोवण्याची बहादुरी काही गिर्यारोहकांनी दाखवली आहे.

नानाच्या अंगठ्यावरून जवळ दिसणारा दुसरा डोंगर म्हणजे निमगिरी. पूर्वेकडे तोंड केल्यावर जीवधन उजवीकडे तर निमगिरी डावीकडे दिसतो. तोंडासमोर दूर हडसरचा किल्ला दिसतो. माळशेजचा घाट येथून दिसत नाही कारण तो निमगिरीच्या पलिकडल्या अंगास आहे. खूप वर्षांपूर्वी एका परदेशी विमानकंपनीचे विमान निमगिरीवर कोसळले होते. त्या अपघातात सर्व प्रवासी ठार झाले. गावकरी त्या अपघातावेळच्या आठवणी अजून सांगतात.

पश्चिम दिशेस माहुलीचा किल्ला दिसतो. बाल शिवाजीचे काही काळ ह्या किल्ल्यावर वास्तव्य होते. माहुलीच्या डावीकडे, दूर क्षितिजावर माथेरानची डोंगररांग दिसते. जवळ दक्षिणेकडे सर्वात उंच दिसणाऱ्या डोंगरमाथ्यास ढाकोबा म्हणतात. दूर नैऋत्येकडे सह्याद्रीपासून सुटावलेली दोन शिखरे दिसतात. त्यांना गोरख-मच्छिंद्र म्हणतात. उत्तर दिशेला दूरवर कळसूबाईच्या डोंगररांगेचा काही भाग दिसतो. इतका दूरदूरचा प्रदेश नानाच्या अंगठ्यावरून दिसतो कारण हा अंगठा देश आणि कोकण यांच्या सरहद्दीवर मान उंचावून उभा आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची सव्वाआठशे मीटर्स भरते.

नाणेघाटाजवळ कुकडी नदीचा उगम होतो. माणिकडोह धरण याच

नदीवर बांधले आहे. ते जुन्नरपासून सहा किलोमीटरवर आहे. धरण बघण्यासारखे आहे. त्याच्याजवळ पाटबंधारे खात्याचे विश्रामधाम आहे. कुकडी नदीस मिळणारा एक ओढा 'पूर' नावाच्या गावाकडून येतो. त्या गावाजवळ एक प्राचीन शिवमंदिर आहे. त्याला कुकडेश्वर म्हणतात. जुन्नरहून बसने नाणेघाटाकडे जाताना हे कुकडेश्वराचे देऊळ वाटेत लागते. देऊळ हेमाडपंती बांधणीचे आहे. त्याचे दगडी चिरे ढासळण्याच्या बेतात आहेत. देवळाच्या दोन घुमटांत सुंदर दगडी कमळे कोरलेली आहेत. कळस ढासळलाय. त्या जागी आता पत्र्याचे छप्पर आहे. देवळाबाहेर पाण्याचे कुंड आहे. लोक त्यात स्नान करतात. देवळामागच्या उंच डोंगरास 'शंभूचा डोंगर' म्हणतात. डोंगरात एक तीर्थ आहे. त्या तीर्थापाशी कुकडी नदीचा उगम आहे असे लोक मानतात.

कुकडेश्वराकडे जाण्यासाठी बसमधून ज्या बसथांब्यावर उतरावे लागते त्या थांब्यापासून एक वाट चावंड गावाकडे जाते. हे गाव चावंड किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. गडावर जायचे असल्यास गावातून वाटाड्या बरोबर घ्यावा. गडावर चावंडाबाईचे देऊळ, पाण्याची सात सुरेख टाकी आणि चार गुहा आहेत. तेथून पायथ्याशी पसरलेल्या माणिकडोह जलाशयाचे दृश्य फार सुरेख दिसते.



चावंडगडावरची सातटाकी

* * *

# १३. साखरे तलाव

पश्चिम रेल्वेवरील वाणगाव स्थानकाजवळ साखरे गावापाशी एक धरण बांधलेले आहे. धरणामुळे निर्माण झालेल्या जलाशयातील पाणी नळावाटे तारापूरच्या औद्योगिक वसाहतीस पुरविले जाते. हे साखऱ्याचे धरण आणि त्याच्या पाणलोट क्षेत्रामागे असलेले दाट जंगल बघण्यासारखे आहे. पालघर-डहाणू भागातील शाळा तसेच मुंबईकर मंडळी ही सहल १ दिवसात करू शकतात.

विरार रेल्वेस्थानकावरुन सकाळी ७-३५ वाजता सुटणारी शटल ट्रेन एक तासात वाणगावला पोहोचते. वाणगावहून साखऱ्याला जाण्यासाठी बस आहे; परंतु वाणगाव ते साखरे हे अंतर फक्त सात किलोमीटर असल्याने बससाठी खोळंबून राहायची गरज नाही. उन्हाळा वगळता इतर ऋतूत ही सात किलोमीटरची वाटचाल आनंददायक ठरते व दीड-पावणेदोन तासात पुरी होते. स्टेशनपासून रेल्वे-क्रॉसिंगपर्यंत लोहमार्गाला समांतर जाणारा रस्ता धरावा. या रस्त्यावर एका खाजगी जागेत 'राधारमण मंदिर' नावाचे देवालय आहे. स्थळ प्रसन्न आहे. तिथे गायत्रीची उपासना चालते.


रेल्वेफाटक ओलांडल्यावर रानशेतचा रस्ता धरावा. तारापूर-जव्हार बस याच रस्त्यावर धावते. पूर्व दिशेस दूर अशेरीचे उंच डोंगर दिसतात. खांबाळे आणि दाभळे ही गावे मागे टाकल्यावर गोवणे गाव लागते. तिथे, साखरे धरण ज्यांच्या अखत्यारीत आहे, त्या महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण बोर्डाने बांधलेली पाण्याची टाकी, पंपिंग स्टेशन आणि कर्मचारी वसाहत आहे. तिथून पुढे दोन किलोमीटर चालल्यावर आपण

धरणाशी पोचतो.

साखरे धरणाच्या बंधाऱ्याची लांबी सहाशे मीटर आहे. बंधाऱ्याच्या एका टोकास लहानशा उंचवट्यावर दोन खोल्यांचे विश्रामधाम आहे. त्याच्याभोवती झाडी आहे. वनभोजनासाठी हे स्थळ चांगले आहे. बंधाऱ्याच्या दुसऱ्या टोकाकडून एक पाऊलवाट एक-दीड किलोमीटर दूर असणाऱ्या आदिवासी पाड्याकडे जाते. त्या पाड्यावर जाऊन आदिवासींची घरे आणि त्यांचे जीवन जरूर पहावे.

धरणाच्या मागे डोंगराळ प्रदेश आहे. त्यात झाडी भरपूर आहे. साखरे-रानशेत रस्ता याच झाडीतून जातो. हा रस्ता वनविहारासाठी चांगला आहे. त्या एकांत, निर्जन, नि:स्तब्ध रस्त्यावरून चालत असता आपण एका अद्‌भुत सृष्टीत शिरलो आहोत असे वाटते. आपल्याच पावलांचा आवाज ऐकू येतो. झाडात लपलेल्या पक्ष्याची शीळ ऐकून अंगावर शिरशिरी येते. शक्य असल्यास थेट रानशेतपर्यंत ११ कि.मी. चालत जावे. रानशेत गाव डहाणू-चारोटी रस्त्यावर आहे. वाणगावला परतायचे असल्यास संध्याकाळी सव्वापाच वाजता साखरे गावापासून निघणारी बस पकडावी. साडेसहा वाजता फिरोजपूर-मुंबई जनता एक्सप्रेस वाणगावला येते. त्या गाडीने मुंबईस परतावे.

***



साखरे तलावातील बेट

# १४. गौताळा अभयारण्य

औरंगाबाद जिल्ह्याच्या कन्नड तालुक्यात गौताळा नावाचे अभयारण्य आहे. त्या अभयारण्यात झाडीने वेढलेल्या प्रदेशात स्वच्छ निळ्या पाण्याने भरलेले एक तळे आहे. तळ्याजवळच्या डोंगरावर एक अद्‌भुत गुंफा आहे. डोंगराच्या पायथ्याशी एक प्राचीन देवालय आहे. हा सगळाच प्रदेश थोडासा गूढ वाटतो. तिथे जाणाऱ्या प्रवाशास त्याच्याबद्दल अनामिक आकर्षण वाटू लागते.

गौताळा अभयारण्यात वनखात्याने १५ किलोमीटर लांबीचा एक रस्ता बांधला आहे. तो कच्चा आहे परंतु त्याच्यावर जीप धावू शकते. रस्त्याचे एक टोक कन्नड ह्या तालुक्याच्या गावापाशी आहे. रस्त्याचे दुसरे टोक म्हैसघाटाच्या माथ्यावर आहे. म्हैसघाट हा चाळीसगावहून सिल्लोडला जाताना चढाव्या लागणाऱ्या सातमाळा डोंगरात बांधलेला घाटरस्ता आहे. चाळीसगाव–सिल्लोड बस नागद, सायगव्हाण मार्गे म्हैसघाट चढते. घाट चढल्यावर अभयारण्याचे प्रवेशद्वार लागते. तिथे वनखात्याने एक चौकी ठेवली आहे. हे ठिकाण चाळीसगावपासून अडतीस किलोमीटर अंतरावर आहे.

बसच्या रस्त्यावर चौकीपासून थोड्या अंतरावर वनखात्याचे विश्रामधाम आहे. अभयारण्य पाहण्यास येणारी माणसे या विश्रामधामात उतरतात. (मात्र, त्याचे आरक्षण आधीपासून करायला हवे.) विश्रामधामामागे दरीच्या अगदी तोंडाशी एक व्ह्यू पॉईंट आहे. त्या पॉईंटवरून खालच्या विक्राळ दरीचे आणि डावी–उजवीकडच्या डोंगरकड्यांचे छान दर्शन घडते. विश्रामधामापासून बसच्या रस्त्यावर काही अंतरावर

पूरनवाडी नावाचे गाव आहे. तिथे पूर्णा नदीचा उगम आहे. (ही नदी पुढे गोदावरीस मिळते.)

म्हैसघाटावरच्या जंगलचौकीपासून अभयारण्यात शिरणाऱ्या रस्त्यावर पाच किलोमीटर चालल्यावर सीतान्हाणी नावाचे ठिकाण लागते. येथे एक दगडी बांधणीचे प्राचीन मंदिर मोडकळीस आलेल्या अवस्थेत उभे आहे. मंदिराच्या पायऱ्यांपाशी एक भग्न गणेशमूर्ती आहे. ती भंगलेली असूनदेखील लक्ष वेधून घेते. मंदिराबाहेर जर इतकी सुबक मूर्ति आहे तर आतली मूर्ति किती सुरेख असेल? असा विचार करत आत जावे तर आश्चर्य म्हणजे गाभाऱ्यात कोणताच देव दिसत नाही. इथला देव गेला कुठे? की कुण्या मूर्तिचोराने त्याला परदेशी रवाना केले? देव नसला तरी देवळातली दुसरी एक वस्तू लक्ष वेधून घेते. ती वस्तू म्हणजे जमिनीत खोल पुरलेला दगडी रांजण. रांजणाच्या तोंडातून आतले पाणी दिसते. ही कदाचित पूर्वीची पाणपोयी असावी. किंवा हा रांजण नसून नैसर्गिक झऱ्यावर बांधलेले पाण्याचे कुंड असावे.

सीतान्हाणीच्या मागे डोंगराच्या कड्यापाशी गेल्यावर खाली दरी दिसते. तिला भिलदरी म्हणतात. पूर्वी येथून भिलदरीत उतरण्यासाठी पाऊलवाट असावी अन् ती पुढे सायगव्हाणला जात असावी अशा खुणा दिसतात. कदाचित म्हैसघाटातला सध्याच्या मोटाररस्ता होण्यापूर्वी ही पाऊलवाट लोकांच्या वापरात असेल. गौतळा–घाट म्हणतात तो हा असावा.

सीतान्हाणीच्या एक किलोमीटर पुढे, रस्त्याकडेला, उजवीकडे मारुतीच्या दोन मूर्ति आहेत अन् रस्त्याच्या डावीकडे एक मोठा, चौरस आकाराचा तलाव आहे. तलावाचे काठ दगडांनी मुद्दाम बांधून काढलेले दिसतात. तलावाकाठी बरेच वृक्ष आहेत. एका वृक्षाखाली पिराचे स्थान दिसते. पूर्वी तिथे कदाचित दर्गा असेल. तिथून तलावातील पाण्यापर्यंत

दगडी पायऱ्यांचा घाट बांधलेला दिसतो. तलावाच्या दुसऱ्या बाजूस एक निरीक्षण-मनोरा उभारलेला आहे. दिवस मावळताना जर आपण त्या मनोऱ्यावर चढून बसलो अन् रात्रभर तिथे बसायची हिंमत दाखवली तर रात्री पाणवठ्यावर येणारे वन्य पशू आपल्याला कदाचित दिसतील.

असे म्हणतात की, दीडशे वर्षांपूर्वी इथे भिल्लांनी बंडाळी केली होती. ते बंड मोडून काढण्यासाठी इंग्रज सोल्जरांची एक तुकडी औटॅरम नावाच्या सेनाधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली इथे आली होती. त्या तुकडीने गौताळ्याच्या तलावाजवळ कित्येक महिने आपला तळ ठोकला होता.

गौताळ्याचा निसर्गरम्य तलाव हेच या अभयारण्यातले प्रमुख स्थळ आहे. औरंगाबादहून इथे येण्यासाठी प्रथम कन्नड गाठावे लागते. कन्नड हे गाव औरंगाबाद-चाळीसगाव रस्त्यावर औरंगाबादपासून ५६ किलोमीटर आणि चाळीसगावपासून ३१ किलोमीटर अंतरावर आहे. औरंगाबादकडून इथे येताना वाटेत खुल्दाबाद, वेरूळची लेणी आणि घृष्णेश्वराचे देऊळ लागते. चाळीसगावकडून येताना औटॅरम-घाट चढावा लागतो. बस या घाटातून धीरे धीरे चढत असते तेव्हा सातमाळा रांगेतील पर्वतीय दृश्ये फार सुरेख दिसतात.

कन्नड हे गाव त्या तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. तिथे बाजार भरतो. हा बाजार बघण्यासारखा असतो. बाजारात विविध प्रकारच्या वस्तू विक्रीस ठेवलेल्या दिसतात. चहा-फराळासाठी, तसेच भोजनासाठी गावात चांगली हॉटेल्स आहेत. इथे खाणेपिणे उरकून मगच अभयारण्यात शिरावे.

कन्नडपासून गौताळ्याचा तलाव नऊ किलोमीटर दूर आहे. वाटेत हिवरखेड नावाचे गाव लागते. गावाबाहेर छोटे धरण बांधलेले आहे. इथून पुढे वाहनातून जाण्यापेक्षा पायी जाणे चांगले. जीपच्या रस्त्यावरून चालण्यापेक्षा पाऊलवाटेने गेलेले अधिक चांगले. अंतर फार नाही; फक्त पाच किलोमीटर आहे. दाट जंगलातून, झाडांच्या सावलीतून, पाचोळ्याने

मऊ पडलेल्या जमिनीवरून, शांत, थंड, आल्हाददायक वातावरणात वाटचाल करीत असता आवाज ऐकू येतात ते विविध पक्ष्यांचे आणि आपल्याच पायतळी चुरल्या जाणाऱ्या पाचोळ्याचे व मोडणाऱ्या काटक्यांचे. तासाभरात आपण तलावापाशी पोचतो.

तलावाजवळच्या डोंगरावर एक मोठी गुहा आहे. तिला गौतमगुंफा म्हणतात. प्राचीन काळी गौतम ऋषींचे वास्तव्य या ठिकाणी होते अशी लोकांची श्रध्दा आहे. गुहेकडे जाणारी वाट तलावाजवळूनच आहे. तलावाच्या एका टोकाशी, जीपच्या रस्त्यावर जिथे मारुतीच्या दोन मूर्ति दिसतात तिथून पाऊलवाट डोंगरात चढू लागते. पंधरा मिनिटांच्या चढणीनंतर आपण गुहेपाशी पोचतो. गुहेसमोरची जागा स्वच्छ सपाट केलेली दिसते. वर गवताचे छप्पर घातलेले आहे. दरीची बाजू सुरक्षित करण्यासाठी मुद्दाम काही झाडे लावलेली दिसतात. ही जागा निर्मनुष्य नाही. एका साधूमहाराजांचे इथे वास्तव्य आहे.

गुहा मोठी आहे. बाहेरच्या भागात एका बाजूस स्वयंपाकाची जागा आहे, चूल आहे. दुसऱ्या बाजूस पडवी आहे. आला-गेला पाहुणा एखादी रात्र पडवीत मुक्काम करू शकतो. गुहेच्या अगदी अंतर्भागात म्हणजे गाभाऱ्यात देवदेवतांच्या सहा-सात मूर्ति आहेत. त्यात आठ हातांचा ब्रह्मदेव, सहा हातांचा दत्त, विठ्ठल-रुक्मिणी, एक शिवलिंग, देवी, मारुती आणि गौतमऋषी यांचा समावेश आहे. ह्या सर्व मूर्ति अलिकडच्या काळातल्या असाव्यात. प्राचीन शिल्पे गुहेत दिसत नाहीत. मात्र, गुंफेची रचना, तिच्या बाहेर असणारी पाण्याची टाकी आणि इतर खुणा यांवरून हे एखादे प्राचीन काळचे लेणे असावे असे वाटते.

गुहेबाहेर एका हातास कड्याच्या पोटात खोदलेल्या कपारीत पाण्याचे मोठे टाके आहे. दुसऱ्या हातास पाण्याची तीन कुंडे आहेत. कपारीतल्या टाक्याच्या भिंतीत एक पोकळी असून त्या पोकळीतून वर

चढून डोंगराच्या माथ्यावर जाण्यासाठी एक मार्ग काढलेला आहे. त्यावर काही पायऱ्या खोदलेल्या आहेत. ही वाट मोठी रोमहर्षक आहे. ती चढून जात असता आपण काहीतरी अद्‌भुत, धाडसी कृत्य करत आहोत असे वाटते.

डोंगरमाथ्यावर पोचल्यावर सृष्टीचा विलक्षण देखावा दिसतो. पश्चिमेकडे आणि पूर्वेकडे सातमाळ्याची शिखरे दिसतात. पण ही शिखरे निमुळती नाहीत; बहुतेक डोंगरमाथे सपाट आहेत. दक्षिणेकडे दूर हिवरखेड गावापर्यंत नजर पोचते. उत्तरेकडे दूरवर खानदेशचा सपाट भूभाग दिसतो. पायथ्याशी अभयारण्य पसरलेले दिसते. त्यातला तलाव नीलमण्यासारखा दिसतो. सीतान्हाणी आणि भिलदरी दिसते. झाडीतून जाणारा जीपचा मातीचा रस्ता केसात पाडलेल्या भांगासारखा रेखीव दिसतो.

गौताळा अभयारण्यास भेट देणारा पर्यटक पुन्हा कधीतरी इथे यायचेच असा मनाशी निश्चय करून घरी परततो.



गौताळा तलाव

* * *

# १५. भुलेश्वर

पुण्यापासून पन्नास किलोमीटर अंतरावर एका डोंगराच्या माथ्यावर भुलेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. पुणे शहराच्या दक्षिणेस जी लांबलचक डोंगररांग दिसते त्या डोंगररांगेच्या पूर्व टोकाजवळ भुलेश्वराचे स्थान आहे. सिंहगड हा प्रसिध्द किल्ला याच डोंगररांगेत पश्चिमेकडे आहे. या रांगेस अंबला डोंगरमाला असे नाव आहे. कात्रजच्या घाटाजवळ तिचे दोन फाटे होतात. एक फाटा पुरंदर किल्ल्याकडे जातो. त्या फाट्यास पुरंदर टेकड्या म्हणतात. दुसरा फाटा भुलेश्वरकडे जातो. त्यास भुलेश्वर डोंगररांग म्हणतात. भुलेश्वर डोंगररांगेच्या उत्तरेस मुळामुठा नदीचे खोरे आहे तर दक्षिणेस कऱ्हा नदीचे खोरे आहे. भुलेश्वरच्या देवळाच्या तटावर चढून चौफेर नजर टाकली की वरील सर्व प्रदेशाचे विहंगम दर्शन घडते.

भुलेश्वरची सहल पुण्याहून एक दिवसात करता येते. पुण्याहून भुलेश्वरला जाण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग सासवडवरून जातो. दुसरा मार्ग यवतकडून जातो. जाताना सासवडवरून जावे आणि परतताना यवतकडून यावे म्हणजे दोन्हीकडचा प्रदेश पाहता येतो. सकाळी शक्य तितक्या लवकर स्वारगेटच्या बस स्थानकावरून सासवडची बस धरावी. बस दिवेघाटातून जाते. दिवेघाट ओलांडताच डावीकडे मल्हारगड आणि उजवीकडे जाधवगढी दिसते. मल्हारगडास सोनोरीचा किल्ला असेही म्हणतात. त्याच्या पायथ्याशी सोनोरी गाव आहे. जाधवगढी हा जाधववाडी गावातील ऐतिहासिक प्रचंड वाडा आहे. त्याचे रूप एखाद्या भुईकोट किल्ल्यासारखे आहे. स्वत:चे वाहन असेल तर जाता जाता वरील दोन्ही स्थळे बघावीत.

सासवडहून दुपारी साडेबाराच्या सुमारास भुलेश्वरची बस आहे. ती पुणे–मिरज लोहमार्गावरील राजेवाडी स्थानकामार्गे माळशिरस गावापर्यंत जाते. (पुण्याहून साडेआठ वाजता निघणारी मिरज पॅसेंजर राजेवाडीस सव्वादहा वाजता पोचते. भुलेश्वर रांगेतील रेल्वेच्या अंबला–घाटाची शोभा बघायची असल्यास या गाडीने यावे.) माळशिरस हे छोटेसे गाव भुलेश्वरच्या अगदी पायथ्याजवळ आहे. (सोलापूर जिल्ह्यातले माळशिरस वेगळे.) पायथ्यापासून डोंगर फार उंच नाही. माथ्यावरील देऊळ आणि दूरसंचार मनोरा खूप दूरवरून ओळखू येतात. चढणीवर पायऱ्या, दरवाजा, तटबंदी, बुरूज वगैरे किल्ल्याची लक्षणे दिसतात. हा खरेच छोटासा किल्ला होता. त्याला दौलतमंगळ असे नाव होते.

भुलेश्वराचे देऊळ पुष्कळ मोठे आणि उंच आहे. देवळात पुष्कळ खांब आहेत. कोरीव काम आणि शिल्पे प्रेक्षणीय आहेत. देवळाजवळ पाण्याची दोन कुंडे अगदी एकमेकास लागून आहेत; तरीही त्यांतील पाण्याचा रंग वेगवेगळा दिसतो. स्वच्छ, नितळ पाण्याचे कुंड पिण्याच्या पाण्याचे असून दुधाळ रंगाचे कुंड स्नानाचे आहे. देवळाच्या अवतीभवती इतर देवतांच्या बऱ्याच घुमट्या दिसतात तसेच वृंदावने आणि समाध्या दिसतात. त्यापैकी एक समाधी पेशव्यांचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी यांची आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी इथे एक धर्मशाळा बांधली आहे. धर्मशाळेच्या पाठीमागे एक भुयार आहे. दुसरे भुयार दत्ताच्या देवळाखाली आहे.

भुलेश्वर या नावाची उपपत्ती अशी सांगतात की येथे पार्वतीने भिल्लीणीच्या रूपात येऊन शंकराला भुलवले म्हणून त्याला भुलेश्वर असे नाव पडले. लोक इथला एक चमत्कार सांगतात की, इथली शंकराची पिंडी बाजूस सरकवून पिंडीखालच्या शाळुंकेमधल्या खळग्यात जर भक्तिभावाने नैवेद्य ठेवला, पिंडी जागच्या जागी ठेवली व थोड्या वेळाने ती पुन्हा उचलली तर नैवेद्य नाहीसा झालेला आढळतो व त्या जागी भक्तासाठी

थोडासा प्रसाद शिल्लक असतो.

देवळाभोवती जो तट घातलेला आहे त्याच्या भिंतीवरून देवळास प्रदक्षिणा घालता येते. एका माणसाला नीट चालता येईल एवढी रुंद भिंत आहे. प्रदक्षिणा करता करता चारी बाजूचा प्रदेश बघावा. नैऋत्य दिशेस दूर पुरंदरचा किल्ला दिसतो. दक्षिणेस खंडोबाच्या जेजुरीची टेकडी आहे तसेच कऱ्हा नदीवर नाझरे गावाजवळ बांधलेले धरण आहे. दक्षिणेकडचा प्रदेश आणि उत्तरेकडचा प्रदेश यांच्या पातळीतील फरक लक्षात येतो. कऱ्हेचे खोरे मुळामुठेच्या खोऱ्यापेक्षा जास्त उंचीवर आहे. त्यामुळे डोंगराचा दक्षिणेकडचा पायथा जवळ दिसतो तर उत्तरेकडचा पायथा खूप खाली दिसतो. दक्षिणेकडचा भाग डोंगराळ आहे तर उत्तरेकडे सपाट मैदान आहे.


यवत गाव भुलेश्वरच्या उत्तरेस आठ किलोमीटर अंतरावर आहे. यवतपासून भुलेश्वरच्या उत्तर पायथ्यापर्यंत डांबरी सडक झालेली आहे. परंतु उत्तर आणि दक्षिण पायथे जोडणारी सडक नाही. त्यामुळे माळशिरसहून यवतला वाहन जात नाही. तुम्ही स्वतःच्या वाहनाने भुलेश्वरला गेलात तर जाता-येता एकच मार्ग धरावा लागतो. सार्वजनिक वाहनाने गेलात तर अर्थातच दुसऱ्या मार्गाने परतता येते.

भुलेश्वरहून यवतकडे उतरताना अर्ध्या डोंगरात कालिमातेचे व दत्ताचे देऊळ लागते. देऊळ एका घळीत आहे. तिथे डोंगरातून येणाऱ्या झऱ्याच्या मार्गात एक हौद बांधलेला आहे. हौदावरच्या गोमुखातून पाण्याची सतत धार पडते. या थंडगार पाण्याने पथिकाचा श्रम-परिहार होतो. येथून पायथ्यापर्यंत उतरण्यासाठी पंधरा-वीस मिनिटे लागतात. पुढे यवतपर्यंत चालत जाण्यासाठी आणखी एक तास लागतो. यवतला पोहोचल्यावर मागे वळून बघितल्यास दूरसंचार मनोऱ्यामुळे भुलेश्वरची खूण चटकन पटते.

यवत गाव पुणे-सोलापूर हमरस्त्यावर पुण्यापासून ४३ कि.मी. दूर

आहे. यवत रेल्वेस्थानक हे पुणे–दौंड लोहमार्गावर आहे. गावापासून रेल्वेस्थानक दीड किलोमीटर दूर आहे. पॅसेंजर गाडी पुणे–यवत अंतर एक तासात कापते. त्यामुळे पुण्याहून भुलेश्वरला जाणारे बहुतेक लोक यवतमार्गे जाणे पसंत करतात. पुण्याहून सकाळी ८ वाजता सुटणाऱ्या वाडी–रायचूर पॅसेंजरने यवतला जावे. यवतहून परतताना संध्याकाळी सव्वाचारची दौंड–पुणे पॅसेंजर किंवा सव्वापाचची रायचूर–पुणे पॅसेंजर पकडावी.

* * *



# १६. तळ्याचा किल्ला आणि कुड्याची लेणी

रायगड जिल्ह्यात माणगाव तालुक्यात तळा गावापाशी एक डोंगरी किल्ला आहे. त्याला तळ्याचा किल्ला किंवा तळेगड म्हणतात. तळ्यावरून थोडे पुढे गेल्यावर मांदाड खाडीच्या मुखाशी कुडे गावामागच्या डोंगरात प्राचीन गुंफा आहेत. त्यांना कुड्याची लेणी किंवा कुडे–मांदाडची लेणी असे नाव आहे. ही लेणी मुंबईपासून १६८ किलोमीटर अंतरावर आहेत. मुंबई–गोवा महामार्गावर पेण आणि महाड यांच्या दरम्यान असणाऱ्या इंदापूर पासून तळा–मांदाड फाटा फुटतो. पुण्यापासून खोपोली–पाली मार्गे ही लेणी १८० किलोमीटर दूर आहेत. मुंबई, पुण्याहून हे स्थळ जरा लांब वाटते. मात्र पेण, रोहा, महाड भागातल्या शाळांसाठी ही सहल एक दिवसाची आहे.

तळा हे एक जुने, ऐतिहासिक गाव आहे. दंडा–राजपुरीच्या खाडीत येणाऱ्या गलबतांवरील व्यापारी माल तळामार्गे ताम्हिनी घाटातून देशावर रवाना होई. दंडा–राज पुरीवर वर्चस्व राखणाऱ्या जंजिऱ्याच्या सिद्दीवर आपला वचक बसविण्यासाठी शिवकालापासून पेशवाईपर्यंत तळा, घोसाळा व चणेरा येथील किल्ल्यांचा मराठ्यांना उपयोग होई. या तीन किल्ल्यांमुळे सिद्दीची नाकेबंदी करता येई.

मुंबई–गोवा हमरस्त्यावरील इंदापूरपासून फक्त पंधरा किलोमीटरवर तळा गाव आजूबाजूच्या सखल प्रदेशापेक्षा थोड्या उंचावर वसले आहे. इंदापूरहून येणारी बस एक लहानसा घाट चढून तळ्याच्या पठारावर येते. गावात चार मोठी तळी आहेत. त्यापैकी नांदतळे नावाने ओळखला जाणारा तलाव खास बघण्यासारखा आहे. त्याच्या काठी एक प्रशस्त, दगडी मंदिर

आहे.

तळ्याचा किल्ला अगदी गावालगत आहे. गाव किल्ल्याच्या अगदी कुशीतच वसले आहे म्हणा ना! गावातून गडावर जाण्यास फक्त वीस मिनिटे पुरतात. गडाच्या वाटेवर महालकऱ्याची कचेरी म्हणून दाखवल्या जाणाऱ्या जुन्या इमारतीच्या आवारात आठ-दहा तोफा दिसतात. त्या तोफा चाकांवर चढविलेल्या अवस्थेत नाहीत; तर जमिनीत खुंटीसारख्या उभ्या पुरलेल्या आहेत. गडाच्या पडक्या दरवाज्याजवळ कातळात मारुती कोरलेला दिसतो. जवळच पाण्याचे टाके आहे. त्याच्या छताला खांबाचा आधार आहे.



तळ्याचा किल्ला

गडामध्ये आपला प्रवेश दक्षिण बुरूजाजवळ होतो. या बुरूजावर नेहमी निशाणकाठी लावलेली असते. जवळ एका देवळाचे अवशेष दिसतात. गडाला रुंदी कमी आहे. तो दक्षिणोत्तर पसरला आहे. दक्षिण भागात पाण्याची आठ टाकी आढळतात. मध्य भागात हवालदाराच्या वाड्याचे अवशेष आणि धान्याची कोठी दिसते. उत्तरेकडे गडाची माची

हत्तीच्या सोंडेसारखी लांबली आहे. माचीव्र भक्कम तटबंदी आहे. तिचे राजगडावरच्या दुहेरी तटबंदीच्या माचीशी साम्य दिसते. माचीच्या शेवटी पक्का बुरूज आहे. गडावर सावलीसाठी एकही झाड नाही आणि निवाऱ्यासाठी एकही छप्पर उरलेले नाही. मात्र गडाच्या घेऱ्यात बरीच झाडी आहे. पूर्वेकडे नजर टाकली असता दूर क्षितिजावर सह्याद्रीच्या लांबलचक रांगेत रायगडापासून धनगडापर्यंतचा भाग ओळखू येतो. तटबंदीवरून खाली पाहिले असता गडाच्या तीन बाजूंच्या पायथ्याशी गावातल्या वेगवेगळ्या आळ्या वसलेल्या दिसतो. कौलारू घरे आणि निळसर तळी चित्रासारखी दिसतात. इंदापूरकडून येणाऱ्या डांबरी सडकेवर धावणारी एस.टी.ची तांबडी बस तेवढी सजीव दिसते. चौथ्या बाजूस किल्ला एका डोंगररांगेस जोडला गेला आहे. त्या रांगेस भुरा डोंगर किंवा देवाचा डोंगर म्हणतात. हे डोंगर वायव्येकडे मांदाडच्या खाडीस जाऊन टेकतात.

तळ्याचा किल्ला बघून झाल्यावर कुड्याच्या लेण्यांकडे जाण्यास निघावे. ही लेणी तळ्यापासून १५ किलोमीटर दूर आहेत. तळ्याहून मांदाड किंवा रोवळा गावाकडे जाणारी बस घ्यावी. बस मांदाडपाशी ज्या डोंगरास वळसा घालून रोवळ्याकडे जाण्यास निघते त्याच डोंगरात लेणी आहेत. डोंगराच्या पश्चिम कड्याच्या पोटात, पायथ्यापासून सुमारे शंभर–सव्वाशे मीटर उंचीवर २५ लेण्यांची माळ आडवी पसरलेली दिसते. पायथ्याशी असणाऱ्या गावाचे नाव कुडे. गावातून डोंगर चढून लेण्यांपाशी पोचण्यास पंधरा–वीस मिनिटे पुरेशी होतात.

गुंफा दक्षिणोत्तर पसरल्या आहेत व त्यांची तोंडे पश्चिम दिशेकडे आहेत. गुंफांचे क्रमांक उत्तरेकडून सुरू होतात. क्रमांक एकच्या गुहेत स्तूप व मोठे सभागृह आहे. ही सगळी बौध्द लेणी आहेत. ज्या गुंफांमध्ये भिक्षू प्रार्थनेसाठी जमतात त्या गुंफांना चैत्य म्हणतात. ज्या गुंफांमध्ये भिक्षूंच्या निवासार्थ खोल्या खोदलेल्या असतात त्या गुंफांना विहार म्हणतात.

चैत्यामध्ये मागल्या टोकाशी भव्य शिवलिंगाच्या आकाराची जी वास्तू उभारलेली असते तिला डागोबा म्हणतात. भगवान बुध्दाच्या एखाद्या अवशेषावर उभारलेल्या वास्तूस स्तूप म्हणतात. स्तूप आणि डागोबा यांच्या रचनेत साम्य असते.



शिल्पसौंदर्य

कुड्याच्या लेण्यांमध्ये चार स्तूप आहेत. काही लेण्यांबाहेर पाण्याची टाकी खोदलेली आहेत. काही लेण्यांत मोठी सभागृहे आहेत. जवळ जवळ प्रत्येक लेण्यात शिलालेख कोरलेला आढळतो. पहिली चौदा लेणी एकाच आडव्या पातळीत खोदली आहेत. पुढली चार लेणी जरा वरच्या पातळीवर म्हणजे जणू वरच्या मजल्यावर आहेत. शेवटच्या सहा लेण्यांचा गट थोडा दूर खोदलेला आढळतो.

सहा क्रमांकाचे लेणे सर्वात भव्य आणि मुख्य लेणे होय. त्याच्या द्वारापाशी दगडात कोरलेला एक प्रचंड हत्ती आहे. आत प्रशस्त सभागृह आहे. भिंतीवर उठावदार रेखीव शिल्पे आहेत. विशेषत: दोन पुतळ्या कमनीय बांध्याच्या आहेत. गौतम बुध्दाचे पुतळे बरेच आहेत. त्यापैकी

एका पुतळ्याचा रंग तांबडा आहे. कदाचित ही शिल्पे मुळात रंगवलेली असावीत.

लेण्यांबाहेर उभे राहिल्यावर समोर पश्चिमेकडे राजपुरीची विस्तृत खाडी दिसते. तिचा उजवा फाटा मांदाडकडे व डावा फाटा म्हसळ्याकडे जातो. खाडीपलिकडे निळे डोंगर दिसतात. पायथ्याशी कुडे गावच्या वाड्या आणि वस्त्या दिसतात. उंच, पांढऱ्या शिडाची एखादी नाव समुद्राचे पाणी कापीत किनाऱ्याकडे येत असते.

* * *



तळे गावचे विहंगम दृश्य

# १७. अप्पर वैतरणा

वैतरणा हे नाव तसे प्रसिध्द आहे. पण अप्पर वैतरणा हा काय प्रकार आहे हे कुणाला फारसे ठाऊक नाही. वैतरणा ही एक नदी असून तिच्यावर बांधलेल्या तलावातून मुंबई शहरास पाणीपुरवठा होतो ही गोष्ट मुंबईत शाळकरी मुलांना देखील ठाऊक आहे कारण अनेक शाळा वैतरणा तलावावर आपल्या विद्यार्थ्यांची सहल नेतात. तो तलाव ठाणे जिल्ह्यात आहे. मात्र याच तलावाचा सख्खा मोठा भाऊ घाटमाथ्यावर नाशिक जिल्ह्यात आहे हे लोकांनी ऐकलेले नसते. घाटावरच्या त्या दुसऱ्या वैतरणा तलावास 'वरचा' या अर्थी इंग्रजीत अप्पर हे विशेषण लावतात. दोन्ही तलावांना सख्खे भाऊ म्हणण्याचे कारण असे की दोन्ही तलावांची आई एकच वैतरणा नदी आहे. ही नदी नाशिक जिल्ह्याच्या इगतपुरी तालुक्यात उगम पावते व घाट उतरून ठाणे जिल्ह्यातून वाट काढून अरबी समुद्रास मिळते. तिच्यावर ठाणे जिल्ह्यात १९५५ साली बांधलेले धरण मुंबईची वाढती तहान भागवण्यास हळूहळू अपुरे पडू लागले म्हणून तिच्यावर १९७२ साली इगतपुरी तालुक्यात दुसरे धरण बांधण्यात आले. तेच अप्पर वैतरणा धरण होय. अप्पर वैतरणा तलावाची पाणी साठवण्याची क्षमता खालच्या वैतरणा तलावापेक्षा जास्त आहे. तो पूरक तलाव आहे. त्यातून सोडलेले पाणी वैतरणा नदीच्याच पात्रातून वाहत जाऊन खालच्या तलावात साठते.

अप्पर वैतरणा तलाव समुद्रसपाटीपासून सहाशे मीटर उंचीवर आहे. तेथील हवा नेहमी थंड आणि आल्हाददायक असते. तलावाभोवती उंच उंच डोंगर असून त्यांचे माथे आकाशाला भिडलेले दिसतात. तलावाजवळ एक

सुरेख उद्यान आणि उद्यानात टुमदार विश्रामधाम आहे. विश्रामधामात दोन दिवस राहायचे असेल तर त्यासाठी भातसानगरच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनियरकडून आधी परवानगी काढावी लागते. विश्रामधामासमोरच्या बागेत उभे राहिल्यावर वर स्वच्छ निळे आकाश, खाली पसरलेला विस्तीर्ण जलाशय आणि त्याच्या पलिकडच्यां काठाशी दिसणारी ब्रह्मगिरी, अंजनेरी, हरिहर वगैरे गिरिशिखरे बघून मन प्रसन्न होते आणि मोकळ्या वाऱ्यावर फुलासारखे डोलू लागते.

नाशिकच्या शाळा–कॉलेजांसाठी अप्पर वैतरणा ही एक दिवसाची सहल आहे. नाशिकपासून घोटीमार्गे वैतरणा पंचावन्न किलोमीटर दूर आहे. दुसरा रस्ता त्रिंबकमार्गे जातो. त्या रस्त्याने नाशिक–वैतरणा अंतर ६८ कि.मी. आहे. दोन्हीकडचा प्रदेश बघण्यासाठी नाशिकहून जाताना एका रस्त्याने जावे व परतताना दुसऱ्या रस्त्याने यावे. सकाळी त्रिंबकमार्गे जाणे व संध्याकाळी घोटीमार्गे परतणे सोयीचे ठरते. कारण वैतरणेकडून घोटीस जाणारा रस्ता जास्त रहदारीचा व सुरक्षित आहे. घोटीवरून जाणाऱ्या नाशिक–मुंबई हमरस्त्यापासून वैतरणा केवळ १६ किलोमीटर अंतरावर आहे. वैतरणा ते त्र्यंबकेश्वर हा ४३ किलोमीटर लांबीचा रस्ता त्या मानाने थोडा कच्चा रस्ता आहे. तो जवळ जवळ निर्मनुष्य प्रदेशातून जातो. मात्र तो प्रदेश सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने नक्कीच जास्त प्रेक्षणीय आहे.

नाशिक–त्रिंबक रस्त्याच्या दक्षिणेस अंजनेरी डोंगररांग आहे. त्या रांगेत घरगड, अंजनेरी, त्रिंबक, हरिहर आणि भाजगड असे पाच किल्ले आहेत. अप्पर वैतरणेस जाताना हे पाचही किल्ले आपल्याला दिसतात. प्रथम, त्र्यंबकेश्वरच्या अलिकडे असणाऱ्या अंजनेरी गावापाशी दक्षिणेस पाहिले असता डावीकडे घरगड आणि उजवीकडे अंजनेरी दिसतो. अंजनेरी डोंगरावर जैनांची लेणी व गुंफा असून गावात प्राचीन मंदिरे आहेत. त्र्यंबकेश्वर जवळच्या ब्रह्मगिरीवर त्रिंबकचा किल्ला आहे. अंजनेरी आणि

ब्रह्मगिरी यांच्यामधल्या खिंडीतून वैतरणेचा रस्ता दक्षिणेस जातो. ही खिंड पार करत असता आपण नाशिक तालुक्यातून इगतपुरी तालुक्यात प्रवेश करतो. ब्रह्मगिरीस पायी प्रदक्षिणा घालणारे भक्तजन याच रस्त्याने धाडोशी गावापर्यंत जाऊन मग उजवीकडे वळून ब्रह्मगिरीच्या पश्चिमेकडच्या खिंडीत चढू लागतात.


धाडोशीपासून 'टाके हर्ष' गावापर्यंतचा रस्ता हरिहर ऊर्फ हर्षगडास वळसा घालत जातो. टाके हर्ष हर्षगडाच्या पायथ्याशी आहे. टाके हर्षपासून झारवड बुद्रुक गावाकडे जाणारा फाटा फुटतो. झारवड हे जुने गाव पूर्वीच्या घोटी-त्रिंबक रस्त्यावरचे मोठे गाव होते. ते आता वैतरणा तलावाने वेढले गेले आहे. झारवडच्या लोकांना चटकन वैतरणेस जाता यावे म्हणून तराफा चालवला जातो. या तराफ्यावरून जलप्रवास करणे हा एक खास अनुभव असतो. वैतरणेपासून झारवडपर्यंत एक लांबलचक केबल म्हणजे जाड तारखंड टाकलेला आहे. तराफा चालविणारा मनुष्य प्रत्यक्ष तराफा चालवीतच नाही; तो ही केबल हाताने खेचतो व क्रिया-प्रतिक्रियेच्या नियमानुसार तराफा पुढे पुढे ढकलला जातो. मोठी गंमत वाटते.

टाके हर्षपासून डहाळेवाडीपर्यंतचा रस्ता हर्षगड व भाजगड ऊर्फ भास्करगड यांच्या पायथ्याजवळून जातो. हर्षगड आणि भाजगड यांच्यामध्ये एका डोंगरशिखरावर एक प्रचंड शिळा कुणीतरी आणून ठेवल्यासारखी दिसते. त्या विचित्र शिळेस फणी म्हणतात. डहाळेवाडीनंतर देवगाव लागते. देवगावपासून एक रस्ता श्रीघाट ऊर्फ शिरघाट मार्गे खोडाळ्यास जातो. देवगाव मागे टाकल्यावर लवकरच वैतरणा धरणाची भिंत दिसू लागते. या भिंतीचे वैशिष्ट्य असे आहे की ती दोन स्वतंत्र भागांत बांधलेली आहे. डावीकडची भिंत आणि उजवीकडची भिंत यांच्यामध्ये एक टेकडी आहे. मुळात टेकडीच्या दोन बाजूंनी वैतरणा आणि अळवंडी अशा दोन नद्या वाहत होत्या. त्यामुळे दोन स्वतंत्र भिंती घालाव्या लागल्या.

वैतरणेच्या पाण्यावर वीजनिर्मिती करण्यासाठी वैतरणेच्या दरीत वीजघर बांधण्यात आले आहे. एका बोगद्यात असलेले हे वीजघर बघण्यासारखे आहे. मात्र त्यासाठी आधी परवानगी काढावी लागते. धरणापासून स्टाफ बस रोज ठराविक वेळा वीजघराकडे जाते.

वैतरणेहून घोटीस जाताना डावीकडे कावनाईचा किल्ला दिसतो. त्याच्या पायथ्याशी कावनाई गाव आहे. गावापर्यंत बसचा रस्ता जातो. गावात कामाक्षी देवीचे मंदिर आणि कपिलधारा तीर्थ आहे. कावनाईहून सांजेगावमार्गे जाणारा रस्ता वाढिवरे गावापाशी मुंबई–नाशिक हमरस्त्यास मिळतो. त्यावरून नाशिकला जाताना उजवीकडे प्रसिध्द पांडवलेण्यांचा डोंगर दिसतो. याप्रमाणे अप्पर वैतरणा सहलीत जाता येता कित्येक स्थळे दिसतात.

* * *



# १८. भंडारा डोंगर

मुंबईहून आगगाडीने पुण्याकडे जाताना गाडीने तळेगाव स्टेशन सोडले की डावीकडे म्हणजे उत्तर दिशेला एक डोंगर दिसू लागतो. तो काही फार उंच नाही. त्याची लांबलचक उतरती बाजू आगगाडीला समांतर धावते आणि जमिनीला टेकते. नीट निरखून पाहिले तर डोंगराच्या माथ्यावर थोडीशी झाडी दिसते आणि तिथे देऊळ असावेसे वाटते. हाच भंडाऱ्याचा डोंगर. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांची रचना याच डोंगरावर केली असे म्हणतात. हे तुकारामांचे एकांतवासाचे आवडते स्थळ होते. तुकारामांना शोधत त्यांची बायको जिजाई इथे येते आणि शिदोरी सोडून त्यांना भाकर तुकडा खाऊ घालते असा हृद्य प्रसंग संत तुकाराम चित्रपटात घातलेला होता.

तुकारामाचे गाव देहू. देहूजवळून इंद्रायणी नदी वाहते. नदीपलिकडे भंडारा डोंगर फक्त तीन किलोमीटर अंतरावर आहे. डोंगराच्या पायथ्यापासून माथ्यापर्यंत एक किलोमीटर लांबीचा पक्का डांबरी रस्ता आहे. मोटार, रिक्षा, स्कूटर ही वाहने थेट माथ्यावरच्या देवळापाशी जाऊ शकतात. तरीही देहू–आळंदी बघायला येणारी बहुतेक मंडळी भंडारा डोंगरावर जात नाहीत. कारण त्यांना या डोंगराची माहिती नसते. पुण्याहून देहू–आळंदीला नेहमी येणाऱ्या शाळांच्या सहलीतही भंडारा डोंगराचा समावेश नसतो. जी थोडी भाविक मंडळी भंडाऱ्यावर जातात ती सुध्दा फक्त माथ्यावरचे देऊळ पाहतात; डोंगरात इतरत्र हिंडत नाहीत. त्यामुळे याच डोंगरात प्राचीन काळातली काही लेणी आहेत ही गोष्ट फारच थोड्या लोकांना ठाऊक आहे. तुम्ही जेव्हा भंडाऱ्यावर जाल तेव्हा तुकारामाच्या

देवळाबरोबर ही लेणी देखील जरूर पहा.

भंडाऱ्यावर जाण्यासाठी सकाळची किंवा सायंकाळची थंड वेळ निवडावी. दुपारची रखरखीत वेळ टाळावी कारण हा डोंगर अगदी उघडा बोडका आहे. त्यावर झाडी अजिबात नाही. पुण्याहून देहू-आळंदीला येणाऱ्या मंडळींनी एक तर देहू-आळंदी करण्यापूर्वी सकाळी प्रथम भंडाऱ्यावर जावे किंवा सकाळी आळंदी व दुपारी देहू बघून सायंकाळी भंडाऱ्यावर जावे. देहूसाठी पुणे स्टेशनवरून तसेच देहूरोड स्टेशनपासून बसेस सुटतात. पण देहूपेक्षा तळेगाव रेल्वे स्थानकावरून भंडाऱ्याला जाणे जास्त सोयीचे आहे. तळेगाव-चाकण रस्ता भंडारा डोंगराच्या पायथ्याजवळून जातो. तळेगाव बस स्थानकावरून सुटणारी आणि चाकण मार्गे जाणारी भिमाशंकर, मंचर, राजगुरुनगर, जुन्नर वगैरे कोणतीही बस पकडावी आणि भंडारा डोंगराच्या थांब्यावर उतरावे. हा थांबा तळेगावपासून आठ किलोमीटर अंतरावर आहे. वाटेत इंदोरी गावाचा भुईकोट किल्ला आहे. जमल्यास तो ही पहावा. इंदोरीनंतर लगेच भंडाऱ्याचा थांबा येतो.

हा थांबा अगदी उघड्यावर आहे. इथे एस.टी.चा नेहमी असतो तसा निवारा नाही की चहाची टपरी नाही. आजूबाजूला गाव तर सोडाच पण चिटपाखरूही दिसत नाही. आपण बसमधून चुकीच्या ठिकाणी उतरलो की काय अशी शंका येऊ लागते. पण मग डोंगराकडे जाणारा रस्त्याचा फाटा आणि फाट्यापाशी लावलेली भंडारा डोंगराची पाटी दिसते व शंकानिरसन होते.

ह्या रस्त्याने पायथ्यापासून माथ्यापर्यंत चढण्यास अर्धा तास पुरतो. रस्त्याला फारशी चढण नाही आणि वळणेही फार नाहीत. माथ्यावरची पाच-सहा झाडे व तीन-चार बैठ्या इमारती दूरवरूनच दिसू लागतात. पावसाळ्याच्या दिवसांत ही वाटचाल फारच सुखद वाटते. रस्ता ओला असतो. गवत हिरवे असते. डोंगराखाली दिसणाऱ्या काळ्या मातकट

जमिनीच्या तुकडयांवर शेतीची कामे चालू असतात. गावातल्या घरांची तांबडी कौलारू छपरे पावसाने स्वच्छ धुतली गेल्याने उठून दिसतात.

भंडाऱ्यावरचे देऊळ विठ्ठल–रखुमाईचे आहे. मूळचे देऊळ लहान आहे. त्यापुढे बांधलेला सभामंडप मात्र मोठा आहे. सभामंडपात शिरताच तिथे जणू स्वत: तुकारामबोवाच भजन करीत बसले आहेत असा भास होतो कारण इथे बुवांचा पूर्णाकृती पुतळा बसवलेला आहे. पुतळा फार छान आहे. त्याची मुद्रा अतिशय प्रसन्न आणि सौम्य आहे. बुवांसमोर उभा राहून एखादा वारकरी विठ्ठलभक्त गळ्यात तंबोरी अडकवून व हातात चिपळ्या घेऊन भजन करीत असतो.

देवळाच्या एका अंगास धर्मशाळा आहे. मागच्या बाजूस एका ओवरीत शिवाजी महाराज तुकारामबोवांच्या पाया पडत आहेत असा देखावा उभा केलेला आहे. देवळासमोर आणखी एका धर्मशाळेचे बांधकाम चालू आहे. देवळापासून जरा दूर जिल्हा परिषदेने बांधलेले लहानसे विश्रामधाम आहे. देवळाबाहेर मोकळ्या जागी जाऊन चहूकडे नजर फेकली तर आसमंतातील प्रदेशाचे छान दर्शन घडते. विशेषत: पावसाळ्यातील दृश्य खरोखरीच अवर्णनीय असते. वारा जोरदार वाहात असतो. काळे ढग अंगावर चाल करून येत असतात. ढग विरळ झाले की सूर्याचा सुवर्णप्रकाश चहूकडे झळाळतो. पश्चिमेकडे इंद्रायणी नदीची वळणे आरशासारखी चकाकतात. डोंगरात उगम पावून इंद्रायणीकडे चाललेले पाण्याचे लहानमोठे ओहोळ रुपेरी तारेसारखे किंवा चांदीच्या वर्खासारखे चकाकतात.

भंडाऱ्याच्या डोंगरातील लेण्यांकडे जाणारी वाट डोंगराच्या पश्चिम बाजूस म्हणजे डांबरी रस्त्याच्या विरुध्द बाजूस आहे. त्या पायवाटेने अर्धा डोंगर उतरून गेल्यावर दोन गुंफा आणि एक डागोबा दिसतो. त्या गुंफा म्हणजे प्राचीन काळचे बौध्द विहार होत. डागोबा म्हणजे भव्य शिवलिंगासारखे दिसणारे बौध्दांचे पूजास्थल होय. दोन गुंफांपैकी मोठ्या

असणाऱ्या गुंफेत विठ्ठलमूर्ती आणि पादुका आहेत. इथे एखाद-दुसऱ्या साधकाचे वास्तव्य असते. माणसांची वर्दळ नसल्याने हे ठिकाण निवांत असते.

योग्य काळ (पावसाळा) आणि योग्य वेळ (थंड वेळ) साधता आली तर भंडारा डोंगराची ही एक दिवसाची सहल स्मरणीय होते.

* * *



भंडाऱ्यावरील तुकारामबोवा


# १९. राधानगरी आणि दाजीपूर

राधानगरी आणि दाजीपूर ही सहलीची दोन ठिकाणे कोल्हापूरजवळ आहेत. राधानगरीस भोगावती नदीवर बांधलेले धरण आहे तर दाजीपूरचे दाट जंगल गवा–अभयारण्य म्हणून प्रसिध्दीस आले आहे. राधानगरीच्या धरणामुळे अडवले गेलेले भोगावतीचे पाणी मागल्या बाजूस दाजीपूरपर्यंत लांब पसरते. ह्या लांबवर पसरलेल्या जलाशयास लक्ष्मी तलाव असे नाव आहे. राधानगरीहून दाजीपूरला जाणारा वळणावळणाचा आणि चढउताराचा रस्ता याच लक्ष्मी तलावाच्या काठाकाठाने जातो. या रस्त्यावरून बसने जात असता एका बाजूस सतत दिसणारे लक्ष्मी तलावाचे निळेशार पाणी आणि दुसऱ्या बाजूस झाडीने आच्छादलेले हिरवेगार डोंगर पाहून पर्यटकांच्या नजरा सुखावतात.

कोल्हापूर–देवगड रस्त्यावर राधानगरी हे गाव कोल्हापुरापासून ४५ किलोमीटर अंतरावर आहे. त्याच रस्त्यावर राधानगरीच्या पुढे ३० किलोमीटर अंतरावर दाजीपूर आहे. दाजीपूरनंतर फोंडाघाट लागतो. रस्ता फोंडाघाटातून कोकणात उतरतो. कोकणातील देवगड, राजापूर आणि मालवण ही गावे दाजीपूरपासून सत्तर–ऐंशी किलोमीटर अंतरात आहेत. म्हणजे, देशावरील कोल्हापूर व निपाणीपासून जशी राधानगरी–दाजीपूरची सहल एक दिवसात होऊ शकते तशीच फोंडाघाटाखालच्या कोकणातून देखील ही सहल एका दिवसात करता येते.

राधानगरीचे धरण हे महाराष्ट्रातले एक जुने धरण आहे. ते कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी बांधविले. धरणाची भिंत सुमारे पाऊण किलोमीटर लांब आहे. ह्या धरणाच्या पाण्यावर भोगावतीच्या खोऱ्यातला

ऊस पिकतो. कोल्हापूर जिल्ह्यात आज भरभराटीस आलेल्या साखर कारखान्यांची सुरुवात राधानगरीच्या धरणामुळे झाली. धरणाच्या पाण्यावर एक छोटे वीजनिर्मिती केंद्रही चालविले जाते.



राधानगरीचे धरण

राधानगरीला जाणाऱ्या बसेस कोल्हापूरच्या नव्या संभाजीनगर बस स्थानकावरून सुटतात. (पूर्वी त्या रंकाळा वेस स्थानकावरून सुटत असत व रंकाळा तलावाच्या काठाने गावाबाहेरच्या रस्त्यास लागत.) परीते-घोटवडे मार्गे बस गैबी खिंडीत येते. येथे निपाणीकडून येणारा रस्ता मिळतो. हा डोंगराळ भाग आहे. खिंडीत गैबीपीर हे धार्मिक स्थळ आहे. येथे उतरावे. शक्यतो इथून राधानगरीपर्यंत चालत जावे. कारण दुतर्फा झाडी असलेला हा रस्ता पायी चालायला फार चांगला आहे. अंतर फार नाही. एक तासात आपण राधानगरी गावात पोचतो. गावात बाजार भरतो. चहा-फराळाची हॉटेल्स आहेत. बऱ्यापैकी जेवणही मिळू शकते. इथेच खाऊन घ्यावे कारण पुढे धरणाजवळ चहापाण्याची काही सोय नाही.

गावापासून धरण पाच किलोमीटर अंतरावर आहे. हा रस्ता सुध्दा

पायी चालायला फार छान आहे. दुतर्फा उंच झाडे आहेत. भर दुपारी सुध्दा रस्त्यावर सावली असते. वृक्षांवर नाना तऱ्हेचे पक्षी दिसतात. रमत गमत, गाणी म्हणत चालता चालता फेजिवडे गाव येते. इथून धरणाकडे जाणारा फाटा फुटतो. राधानगरी गावात न उतरता थेट धरणावर जाऊ इच्छिणारे लोक फेजिवडे फाट्यावर उतरतात. इथून रस्ता दोन वळणे घेऊन धरणाच्या भिंतीवर चढतो. भिंतीवर चढताच समोर अफाट पसरलेले पाणी दिसते आणि मन प्रसन्न होते. तलावाच्या मध्यभागी असणाऱ्या लहानशा बेटावर बे-नजर नावाची बंगली आहे. तिथे जाण्यासाठी तसेच तलावापलिकडच्या गावांशी संपर्क ठेवण्यासाठी लाँचची सोय केलेली आहे.

धरणाजवळ पाटबंधारे खात्याचे विश्रामधाम आहे. पर्यटकांच्या निवासासाठी तिथे चार ब्लॉक्स आहेत. सभोवती सुरेख फुलबाग आहे, झाडी आहे. हे स्थान थोडे उंचावर असल्याने लक्ष्मी तलावाचे आणि तलावाच्या परिसराचे दृश्य इथून विलोभनीय दिसते.

धरण पाहून झाल्यावर पुन्हा फेजिवडे फाट्यावर यावे आणि बसने दाजीपूरला जावे. हा एक तासाचा प्रवास तलावाचे सान्निध्य, झाडी आणि गार वाऱ्यामुळे फार सुखकर होतो. याच रस्त्याने दाजीपूरच्या पुढे दीड किलोमीटर अंतरावर फोंडा घाटाचा माथा लागतो. हा घाटमाथ्याचा पॉइंट म्हणजे सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याचे एक अप्रतिम स्थळ आहे. समुद्रसपाटीपासून या ठिकाणची उंची सहाशे मीटर्सपेक्षा थोडी जास्तच आहे. डोंगराच्या कडेने वळणावळणाने खाली जाणारा घाटरस्ता आणि पायथ्याशी पसरलेला कोकणप्रदेश बघून माणूस स्तिमित होतो. सूर्यास्ताचे दृश्य इथून खास बघण्यासारखे असते.

दाजीपूर येथे पर्यटक निवास बांधलेला आहे. वनखात्याचा बंगलाही आहे. चहाफराळासाठी रस्त्याकडेला दोन-तीन हॉटेल्स आहेत. खुद्द दाजीपूर गावात बघण्यासारखे काही नाही. जे बघण्यासारखे आहे ते

अभयारण्य येथून दूर आहे. ते एक दिवसात पायी फिरून बघता येत नाही. अभयारण्यात निवासाची तसेच खाण्यापिण्याची काही सोयही नाही. तेव्हा, अभयारण्यात हिंडायचे असेल तर स्वतःचे वाहन बरोबर हवे ही गोष्ट ध्यानात ठेवावी. ज्यांना शक्य असेल त्यांनी जीपने जावे. अभयारण्यात केलेला रस्ता एकवीस किलोमीटर लांबीचा आहे. पण हा रस्ता पक्का, डांबरी नाही; तो कच्चा, मातीचा आहे. तसेच, हे जंगल जरी गवा–अभयारण्य म्हणून प्रसिध्द असले तरी रस्त्याने जाताना इथे क्वचितच कुणाला गवे दिसतात. इतर जंगली जानवरेही क्वचितच दिसतात. म्हणून, अभयारण्यात फार मोठ्या अपेक्षेने जाऊ नये, निराशा होते. माफक अपेक्षा ठेवल्यास दाट झाडी, पाणवठे, निरीक्षण मनोरे, थंड हवा आणि जंगलातल्या निर्जन पाऊलवाटा एवढ्याने देखील माणूस संतुष्ट होतो.

अभयारण्याचे प्रवेशद्वार दाजीपूर पासून ३ किलोमीटर अंतरावर आहे. इथपर्यंत झाडी तुरळक आहे. प्रवेशद्वाराजवळ वळवण गावातली चार–पाच घरे आहेत. पुढे किटणवाडी लागते. नंतर रस्ता दाट झाडीतून वळणे घेत डोंगर चढू लागतो. चौदाव्या किलोमीटरवर एक शंकराचे देऊळ आणि साधूंचा मठ आहे. देवळाला महादेव–मळी म्हणतात. इथून जवळ पाण्याचा बारमाही झरा व धबधबा आहे. त्याला 'मरगज पाणी' म्हणतात. सतराव्या किलोमीटरपाशी एक निरीक्षण–मनोरा उभारलेला आहे. मनोऱ्यावरून दूरच्या प्रदेशापर्यंत दृष्टी पोचते. उत्तरेस गगनबावडा किल्ला दिसतो. नैऋत्येस शिवगड दिसतो. मनोऱ्याजवळ रस्त्यावर 'वाघाचे पाणी' अशी पाटी लावली आहे. हे वाघाचे पाणी उतारावर एका घळीत आहे. घळीतून वाहणाऱ्या झऱ्यास छोटासा बांध घालून हे पाणी अडवले आहे.

वाघाच्या पाण्यापासून दोन किलोमीटर पुढे गेल्यावर सांबरकोंडीकडे जाणारा फाटा फुटतो. हा फाटा एक किलोमीटर अंतरावरच्या बंधाऱ्यापर्यंत जातो. एका ओढ्यावर हा बांध घातलेला आहे. इथे बारा महिने स्वच्छ

पाणी असते. रात्री ह्या पाणवठ्यावर वन्य पशू येत असावेत. ह्याच स्थळाला सांबरकोंड हे नाव आहे. स्नान करण्यासाठी आणि वनभोजनासाठी हे ठिकाण उत्तम आहे. इथे सर्वत्र दाट झाडी आहे.



निरीक्षण मनोरा

सांबरकोंड बघून मूळ रस्त्यावर परत येऊन अर्धा किलोमीटर पुढे गेल्यावर 'सापळा' नावाचे ठिकाण आहे. इथे एका लांबलचक चिंचोळ्या चरासारख्या घळीत एका टोकास लोखंडी सापळा बसवलेला दिसतो. ही

शाहू महाराजांची शिकारीची जागा होती.

सापळ्यापासून अर्धा किलोमीटर अंतरावर, विसाव्या किलोमीटरच्या दगडाजवळ कोकणदर्शन पॉइंट आहे. ह्या पॉइंटवरून डोंगराचे लांबलेले पदर आणि त्यांच्यामध्ये तयार झालेल्या खोल खोल दऱ्या दिसतात. पश्चिमेकडे कोकणभाग दिसतो. ह्या ठिकाणाची उंची समुद्रसपाटीपासून नऊशे मीटर आहे. म्हणजे दाजीपूरपेक्षा हे स्थळ तीनशे मीटर अधिक उंच आहे. उंच उंच डोंगरकड्यांचे रौद्रभीषण सौंदर्य इथे बघायला मिळते.

कोकणदर्शन पॉइंटनंतर एक किलोमीटर अंतरावर रस्ता संपतो. इथे डोंगरमाथ्यावर विस्तीर्ण पठार आहे. त्याला पूर्वी मोरजाईचे पठार किंवा पाट्याचा डंग म्हणत असत; आता बायसन पठार म्हणतात. पठारावर एक मोठा तलाव आहे. तो पावसाळ्यात भरतो पण हिवाळ्याअखेर कोरडा पडतो. इथे गवे चरण्यासाठी आणि पाणी पिण्यासाठी येत असावेत. इथेही एक निरीक्षण-मनोरा आहे. पण मनोऱ्यावरून आम्हाला गवे दिसले असे सांगणारी माणसे फार थोडी भेटतात. तेव्हा, राधानगरी-दाजीपूरची सहल उत्तम होते यात शंका नाही पण गव्यांची खात्री कोण देणार?

* * *

# २०. किल्ले धोडप

नाशिकहून बसने चांदडवला जात असता किंवा रेल्वेने मनमाडला जात असता उत्तरेकडे दिसणारा एक डोंगर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे प्रवाशांचे लक्ष वेधून घेतो. त्या डोंगराचा डावा भाग फळीसारखा आडवा दिसतो आणि उजवा भाग शिवपिंडीसारखा उभट दिसतो. फळीसारख्या आडव्या भागात, दंतपंक्तीत पडणाऱ्या फटीप्रमाणे एक अरुंद खिंडार पडलेले दिसते. आजूबाजूच्या डोंगरांपेक्षा वेगळा उठून दिसणारा हा डोंगर म्हणजे किल्ले धोडप होय.

धोडप हा एक नमुनेदार किल्ला आहे. बुरुज, तटबंदी, माची, दरवाजे, पाण्याची टाकी, शिलालेख अशी किल्ल्यांची सारी लक्षणे त्याच्या ठायी एकवटली आहेत. त्याशिवाय गडावर एक मोठी गुंफा असून त्या गुंफेत देवीचे स्थान आहे. तसेच, गडाखालच्या धोडंबा गावात एक प्राचीन मंदिर आहे. या सर्व प्रेक्षणीय गोष्टींमुळे धोडप किल्ल्यावर काढलेली सहल स्मरणीय होते. नाशिक, निफाड, मनमाड व चांदवड भागातल्या शाळा खाजगी बसने ही सहल एक दिवसात करू शकतात.

धोडपकडे जाण्यासाठी प्रथम राष्ट्रीय मार्ग क्र. ३ वरील म्हणजे आग्रारोडवरील वडाळीभोई नावाच्या ठिकाणी जावे लागते. हे ठिकाण नाशिकपासून ४८ किलोमीटर आणि चांदवडपासून १६ किलोमीटर अंतरावर हमरस्त्यावर आहे. वडाळीभोईपासून ७ किलोमीटर दूर धोडंबा गाव आहे. धोडंबा हे धोडप किल्ल्याच्या घेऱ्यात असणाऱ्या गावांपैकी एक मोठे गाव आहे. नाशिक, चांदवड, मनमाड आणि लासलगावहून धोडंब्यासाठी बसेस सुटतात. सप्तशृंगीच्या देवीमुळे प्रसिध्द असलेल्या वणी

गावापासून घोडंबा १९ किलोमीटर दूर आहे. वणी ते वडाळीभोई हा रस्ता घोडंब्यावरून जातो. वडाळीभोईहून घोडंब्याला जाण्यासाठी जीप, टेंपो तसेच मेटॅडोर ही वाहने नेहमी मिळतात.

घोडंबा गावात हेमाडपंती बांधणीचे वटेश्वराचे अतिशय सुरेख देऊळ आहे. त्याच्या शेजारी त्याच्याइतकेच अप्रतिम पण आकाराने लहान असे विष्णुमंदिर आहे. दोन्ही मंदिरांतील कोरीव काम, शिल्पे, छतावरील कमळे, कळस, प्रवेशद्वार, खांब, भिंती इत्यादी सगळ्या गोष्टी प्रेक्षणीय आहेत. मंदिराला नुसती बाहेरून प्रदक्षिणा घातली तरी त्याचे शिल्पसौंदर्य डोळ्यात भरते; मग आतून-बाहेरून दोन्ही देवळे व्यवस्थित बघण्यासाठी किती वेळ लागत असेल? दत्तजयंतीच्या दिवशी येथे जत्रा असते. जत्रेस खूप माणसे लोटतात. एरवीसुध्दा घोडंबा हे बाजाराचे गाव असल्याने येथे बरीच वर्दळ असते.

घोडंब्यापासून धोडपचा पायथा ६ किलोमीटर दूर आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी 'हट्टी' नावाचे गाव आहे. नाशिकहून थेट हट्टीपर्यंत एक बस आहे. ती नाशिकहून संध्याकाळी पाच वाजता सुटते व सात वाजता हट्टीस पोचते. रात्री बसचा मुक्काम हट्टी गावातच असतो. बस दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता हट्टीतून निघते व दहा वाजता नाशिकला पोचते. ज्यांना दोन दिवस वेळ काढणे शक्य आहे त्या लोकांना ही बस सोयीची ठरते. त्यांनी ह्या बसने नाशिकहून येऊन रात्री हट्टी गावात मुक्काम करावा आणि दुसऱ्या दिवशी पहाटे थंड वेळी गड चढून जावा. हट्टी हे परदेशी ऊर्फ राजपूत लोकांचे गाव आहे. ते खव्यासाठी प्रसिध्द आहे. इथला खवा चांगला तसेच स्वस्त असतो.

घोडंब्याहून हट्टीकडे जात असता धोडपचा किल्ला सतत समोर दिसतो. धोडपच्या उजवीकडे उंच सुळका असलेला डोंगर आहे. त्याला 'विखाऱ्या' म्हणतात. विखाऱ्या डोंगराच्या सपाटीवर, सुळक्याच्या

पायथ्याशी कानिफनाथाचे देऊळ आहे. धोडप आणि विखाऱ्या हे दोन्ही डोंगर त्यांच्या उंचीमुळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आकारामुळे फोटोसाठी उत्कृष्ट ऑब्जेक्ट ठरतात. त्यांच्या डावी-उजवीकडे लांबलेल्या डोंगररांगेत अनेक किल्ले आहेत. ह्या उंच आणि लांबलचक गिरिमालेस सातमाळा किंवा चांदवडचे डोंगर असे नाव आहे. पूर्व-पश्चिम पसरलेली ही गिरिमाला नाशिक जिल्ह्यास दुभागते. तिच्यात पश्चिमेकडून पूर्वेकडे हातगड, अचला, अहिवंत, सप्तशृंगी, मार्कंडेय, रावळ्या, जावळया, धोडप, कांचना, मंचना, कोळधेर, राजधेर, इंद्राई, चांदवड, अणकाई व टणकाई असे १६ किल्ले आहेत. यापैकी बहुतेक किल्ल्यांचे माथे समुद्रसपाटीपासून चार हजार फुटांपेक्षा (तेराशे मीटर) जास्त उंचावर आहेत. धोडंब्याहून हट्टीकडे जाताना यापैकी सात-आठ किल्ले नजरेस पडतात. धोडपचे स्थान सातमाळा रांगेच्या मध्यावर आहे. स्थान, उंची आणि आकार यांमुळे धोडप हा सातमाळ्याच्या सोळा किल्ल्यांचा अधिपती शोभतो.

पायथ्याच्या हट्टी गावापासून धोडपच्या पठारावर, धोडपच्या बगलेत वसलेल्या 'माची धोडप' गावापर्यंत चढण्यास सव्वा ते दीड तास लागतो. माचीपासून किल्ल्यावरील देवीच्या गुंफेपर्यंत जाण्यास आणखी एक तास लागतो. धोडपच्या डोंगरात उगम पावणाऱ्या नेत्रावती नदीवर, हट्टी गावाबाहेर एक छोटा बंधारा घातलेला आहे. त्यामुळे लहानसा तलाव निर्माण झाला आहे. हट्टीपासून धोडपकडे जाणारी वाट ह्या तलावास वळसा घालून डोंगराला भिडते. जिथे डोंगराची चढण सुरू होते तिथे मारुती स्थापन केलेला आढळतो. येथून माचीवरचे शंकराचे देऊळ दिसते. ते देऊळ हेच आपले पहिले उद्दिष्ट होय.

मारुतीपासून माचीपर्यंत पाऊलवाट वळणावळणाने चढत जाते. चढण तशी दमछाक करणारी आहे. वाटेवर विश्रांतीसाठी योग्य असा एकही टप्पा अथवा वृक्ष नाही. त्यामुळे चालता चालताच थोडे थांबून दम खावा

लागतो. चढणीच्या शेवटी एक पाण्याचे टाके आहे. तिथे पाणी पिऊन श्रमपरिहार करावा. थोडे पुढे गेल्यावर तीन वाटा फुटतात. उजवीकडची वाट माचीवरील सोनारांच्या वस्तीकडे जाते. डावीकडची वाट पेशवेकालीन गणपती आणि शंकराच्या देवळांकडे जाते. समोरची वाट वर किल्ल्याकडे चढते. या तिठ्याजवळ जमिनीत खणलेली एक जुनी पायऱ्यांची विहीर आहे. तिची दगडी बांधणी, चौकोनी आकार आणि कमानींची रचना बघण्यासारखी आहे.

उजवीकडच्या वाटेवर जवळच सात–आठ घरांची वस्ती आहे. इथले लोक खवा करतात. पूर्वी, पेशवाईत माचीवर बरीच मोठी वस्ती होती. त्या वस्तीच्या खाणा–खुणा व जीर्णावशेष माचीवर सर्वत्र विखुरलेले दिसतात. इथून एक वाट विखाऱ्या डोंगरावरच्या कानिफनाथाच्या देवळाकडे जाते. दुसरी वाट डावीकडे वळत किल्ल्याला वळसा घालून उत्तरेकडच्या पायथ्याशी असणाऱ्या ओतूर गावाकडे जाते.

माचीतून पश्चिमेकडे जाणाऱ्या वाटेवर प्रथम एक गणेशमंदिर आणि एक पडके देऊळ लागते. तिथे स्वच्छ पाण्याची दोन कुंडे दिसतात. पुढे गेल्यावर एक शंकराचे देऊळ लागते. हट्टी गावातून डोंगराच्या मध्यावर दिसणारे देऊळ ते हेच होय. या देवळाजवळ एक चौकोनी विहीर आहे. तिला पायऱ्या आहेत. तिथून पुढे पाऊलवाटेने दहा मिनिटे चालल्यावर आपण गडाच्या पश्चिमेकडच्या वेशीपाशी पोचतो. वेशीचा कमानीचा दरवाजा आजही सुस्थितीत उभा आहे. वेशीबाहेर पाच–सहा घरांची वस्ती लागते. तिला गवळवाडी म्हणतात.

गवळवाडीपासून माघारी फिरून पुन्हा मूळ तिठ्यापाशी यावे व तिथून किल्ल्यावर चढणारी पाऊलवाट धरावी. ही वाट लवकरच डोंगराच्या उभ्या कड्यास भिडते. काही ठिकाणी वाट अवघड आहे पण धोकादायक नाही. ठिकठिकाणी पायऱ्या आहेत. गडाचा मुख्य दरवाजा कुठूनही दिसणार

नाही अशा गुप्त ठिकाणी दडवलेला आहे. तिथे पोचल्यावर प्रथम पाण्याचे मोठे टाके दिसते. टाक्याच्या वरच्या बाजूस कातळात खोदलेला जिना लागतो. जिन्याच्या शेवटी एक वळण घेताच दरवाजा दिसतो. दरवाजापाशी उर्दू भाषेत कोरलेले दोन शिलालेख दिसतात. दरवाजा व त्याजवळच्या पहारेकऱ्यांच्या कोठ्या खडकात कोरून काढलेल्या आहेत. पुढे दुसरा दरवाजा लागतो. वरच्या सपाटीवर येताच उजवीकडे हवालदाराचा पडका वाडा उर्फ सदर दिसते आणि डावीकडे पाण्याची दोन मोठी टाकी दिसतात. थोडे पुढे गेल्यावर आपण पिंडीसारख्या सुळक्याच्या पायथ्याशी पोचतो. हा सुळका सव्वाशे मीटर उंच आहे. त्याच्या माथ्याची समुद्रसपाटीपासून उंची १४४५ मीटर भरते.


सुळका उजव्या हातास ठेवून आपण त्याच्या पायथ्याजवळून पश्चिमेकडे जाऊ लागलो की कड्याच्या पोटात अनेक गुहा दृष्टीस पडतात. त्यात पूर्वी दारुगोळा, धान्य, तूप, वगैरे जिन्नस साठवीत असत. एका मोठ्या गुंफेत देवीचे देऊळ आहे. त्या गुंफेत सध्या एका साधूचे वास्तव्य असते. देवीच्या स्थानाखाली स्वच्छ पाण्याचे एक खोल टाके आहे. हे पाणी पिण्यासाठी वापरतात. येथे नवरात्रात उत्सव असतो व आजूबाजूच्या खेड्यांमधले गावकरी येथे भजनासाठी जमून एक रात्र मुक्काम करतात.

देवीच्या गुंफेपासून तसेच पुढे गेल्यावर आपण धोडपच्या त्या प्रसिध्द भिंतीवर पोचतो. भिंतीचा अरुंद पण लांबलचक माथा अगदी सुरीने कापल्यासारखा सपाट आहे. भिंतीचे उभे तासल्यासारखे दिसणारे दोन्हीकडचे कडे पाऊणशे मीटर उंच आहेत. भिंतीच्या मध्यावर पडक्या दातासारखे खिंडार आहे. ते खिंडार नैसर्गिक आहे की मानवनिर्मित आहे; आणि ते कसे तयार झाले किंवा कुणी कशासाठी खोदले असेल याचा अचंबा वाटल्यावाचून राहात नाही. खिंडारापाशी एका मशिदीचे भग्नावशेष

दिसतात. ही जागा म्हणजे सगळ्या बाजूंस दूरवर पसरलेल्या प्रदेशाचे निरीक्षण करण्यासाठी एक उत्तम स्थळ आहे.

रघुनाथराव पेशव्यांनी आपल्या कारस्थानांसाठी घोडप किल्ल्याचा आश्रय घेतला होता परंतु इथून त्यांना पकडून पुण्यास नेण्यात आले असे इतिहास सांगतो.

* * *



धोडपच्या वाटेवर


# २१. केळवे–माहीम आणि भवनगड

ठाणे जिल्ह्यात पालघरजवळ केळवे–माहीम हे समुद्रकिनारी वसलेले एक रमणीय गाव आहे. गाव झाडीत लपले आहे. वस्ती तुरळक आहे. रस्ते मोकळे असतात. रस्त्याच्या बाजूस हिरवेगार पानमळे दिसतात. किनाऱ्यालगत सुरूचे बन आहे. ती जागा वनभोजनासाठी उत्तम आहे. वातावरण शांत आणि थंड असते. भरतीच्या लाटा किनाऱ्यावर फुटतात त्यांचाच काय तो आवाज होतो. भोजनानंतर प्रौढांनी सुरूच्या झाडांच्या सावलीत मस्त आराम करावा किंवा पत्त्यांचा डाव टाकावा आणि बालांनी झाडा–झाडांमधून धावत पकडा–पकडीचा किंवा लंपडावाचा खेळ खेळावा. सहलीचा आनंद मनमुराद लुटावा.

केळवे–माहीम हे वस्तुतः एक गाव नाही; ते जोडगाव आहे. केळवे आणि माहीम या दोन गावांमध्ये एक लहानशी खाडी आहे. खाडीवर पूल बांधलेला आहे. दोन गावांत पाच किलोमीटर अंतर आहे. सकाळच्या किंवा सायंकाळच्या थंड वेळी केळव्याहून रस्त्यावरून रमत गमत माहीमपर्यंत चालत जायला फार बरे वाटते.

माहीम हे गाव पश्चिम रेल्वेवरील पालघर स्थानकापासून आठ किलोमीटर अंतरावर आहे. केळवे गाव केळवे–रोड रेल्वे–स्थानकापासून नऊ किलोमीटर दूर आहे. पालघर, केळवे–रोड आणि सफाळा ह्या तिन्ही रेल्वे–स्थानकांपासून केळवे–माहीमसाठी बसेस सुटतात. मुंबईपासून डहाणूपर्यंतच्या भागातील शाळांसाठी केळवे–माहीम ही एक दिवसाची सहल आहे. विरार–डहाणू मार्गावर शटल गाड्या धावतात. विरारहून सकाळी साडेसात वाजता सुटणारी शटल सव्वाआठपूर्वी पालघरला पोचते. डहाणूहून

पालघरला जाण्यासाठी सकाळी पावणेसात वाजता बलसाड एक्स्प्रेस आणि पावणेनऊ वाजता शटल मिळते. त्या गाड्या पालघरला अर्ध्या तासात पोचतात. सहल संपल्यावर परतीच्या प्रवासासाठी पालघरहून सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास एक एक्स्प्रेस गाडी तसेच एक शटल मुंबईकडे जाते. डहाणूकडे जाण्यासाठी पालघरला सायंकाळी सहा वाजता शटल, साडेसहा वाजता सौराष्ट्र जनता आणि पावणेआठ वाजता बलसाड एक्स्प्रेस ह्या गाड्या आहेत.




केळवे–माहीमच्या सहलीत शितळादेवी, जंजिरा आणि भवनगड ही तीन ठिकाणे पहावीत. शितळादेवीचे मंदीर खुद्द केळवे गावातच आहे. जंजिरा ऊर्फ पाणकोट हा समुद्रातल्या एका खडकावर बांधलेला छोटा किल्ला आहे. भवनगड हा एका लहानशा टेकडीवर बांधलेला किल्ला आहे. तो केळव्याच्या खाडीपलिकडे खटाळी गावाजवळ आहे. जंजिऱ्याचे बांधकाम पोर्तुगिजांनी केले तर भवनगड चिमाजी अप्पाने बांधला असे म्हणतात. केळव्याच्या किनाऱ्यावरून ओहोटीच्या वेळी जंजिऱ्यापर्यंत चालत

जाता येते; मात्र भवनगडाकडे जाण्यासाठी होडीतून खाडीपार व्हावे लागते. ह्या अडचणींमुळे जंजिऱ्यावर तसेच भवनगडावर फारसे कुणी जात नाही. बहुतेक लोक केळवेमाहीमला जातात ते शितळादेवीच्या दर्शनासाठी व समुद्रकिनाऱ्यावर मौज लुटण्यासाठी.

शितळादेवीचे मंदिर हे जीर्णोध्दार झालेले, नवे रूप धारण केलेले, प्रशस्त आणि स्वच्छ देऊळ आहे. जीर्णोध्दार १९८६ साली झाला. आतून-बाहेरून देऊळ सुंदर दिसते. देवीचे रूप फारच प्रसन्न आहे. देवी शिळारूप आहे; घडीव मूर्ती नाही. हिरवी साडी आणि तांबडा मुखवटा तिला फार खुलून दिसतो. याच देवळात दुसऱ्या गाभाऱ्यात वाळकेश्वराचे शिवलिंग आहे. देवळासमोर तलाव आहे. त्याला पायऱ्यांचा घाट आहे. पाण्याच्या मध्यभागी एक उंच खांब रोवलेला आहे. तलावात खूप मासे आहेत. पाण्यात चुरमुरे टाकले असता ते खाण्यासाठी छोट्या-मोठ्या माशांच्या झुंडीच्या झुंडी लोटतात. त्यांना देवाचे मासे म्हणतात.

रविवारी तसेच मंगळवार आणि शुक्रवार ह्या देवीच्या वारी मंदिरात जास्त गर्दी असते. देवीची यात्रा चैत्री पौर्णिमेस भरते. भक्तांच्या निवासासाठी मंदिरामागे लहानसे विश्रामधाम बांधलेले आहे. तेथे दोन कुटुंबे राहू शकतात.

गावातले दुसरे प्रेक्षणीय देऊळ म्हणजे काळबादेवीचे मंदिर होय. ते शितळादेवीपासून एक किलोमीटर दूर आहे. तिथे फारशी वर्दळ नसते. त्यामुळे भाविकांस ते अधिकच भावते. तिथे महिषासुरमर्दिनीची अतिशय लावण्यवती मूर्ती आहे. ती छान रंगवलेली आहे. देवळाबाहेर दीपमाळ असून त्या दीपमाळेखाली एक जुना शिलालेख आढळतो. शितळादेवीप्रमाणे या काळबादेवीच्या मंदिराजवळही पाण्याचा तलाव आहे.

केळव्याच्या दक्षिण टोकास लहानसे बंदर आणि मच्छिमारांची वस्ती आहे. त्या भागास बंदरपाखाडी म्हणतात. तिथून जंजिऱ्याकडे जाण्यासाठी

वाट आहे. ती ओहोटीच्या वेळी उघडी पडते. भरतीच्या वेळी किल्ला पाण्याने पूर्ण वेढला जातो. भरतीच्या वेळी केळव्याच्या खाडीत पाणी फार जोराने घुसते आणि ओहोटीच्या वेळी तसेच वेगाने ओसरते. प्रवाहात माणूस सहज वाहून जातो. म्हणून जंजिरा पाण्यात असताना त्याच्याकडे जाणे–येणे अत्यंत धोक्याचे ठरते. खुद्द जंजिऱ्यात पहाण्यासारखे काही नाही. आतले बांधकाम ढासळले आहे. पाण्याचा हौद कोरडा पडला आहे. काही जागी तटबंदी दुहेरी आहे. तटबंदीत अनेक खिडक्या आहेत पण एकही दरवाजा नाही. त्यामुळे तटाच्या दगडांवरून कौशल्याने चढून जाऊन एका खिडकीतून आत प्रवेश करावा लागतो. किल्ल्याचे एकंदर बांधकाम पोर्तुगीज धाटणीचे आहे.

पोर्तुगिजांची एक लहानशी गढी किंवा वखार केळवे किनाऱ्याच्या उत्तर टोकास आहे. किनाऱ्यावरचे सुरूचे बन पूर्णपणे पार केल्यावर ती वखार नजरेस पडते. तिला बुरुज-तटबंदी केलेली आहे. अशीच आणखी एक गढी माहीम गावाबाहेर जिथे नवे हाऊसिंग कॉम्प्लेक्स् उभारले जात आहे तिथे दिसते. अशा गढ्या तारापूर पासून वसईपर्यंत तसेच थळ, चौल-रेवदंडा वगैरे किनाऱ्यांवरसुध्दा जागोजाग आढळतात.

केळव्याच्या दक्षिणेस, खाडीपलिकडे दांडा नावाचे मुस्लीम लोकवस्तीचे गाव आहे. तेही एक छोटे मच्छिमार–बंदर आहे. सफाळा रेल्वेस्थानकापासून दांडा गावापर्यंत बस असते. या मार्गावर दहिसर आणि खटाळी ह्या दोन गावांच्या दरम्यान भवनगड नावाचा लहानसा किल्ला आहे. त्या किल्ल्यावर काजूची बरीच झाडे आहेत. किल्ल्याच्या पश्चिमेकडच्या पायथ्याशी आंबवली गाव आहे तर दक्षिण पायथ्याशी 'भवनगड पाडा' नावाची वस्ती आहे. दक्षिणेकडून गडावर चढताना बाहेरची पहिली तटबंदी ओलांडल्यावर आत एक शिवमंदिर लागते. ते चिमाजी अप्पाने बांधल्याचे सांगतात. मंदीर सुस्थितीत आहे. त्याला रंग दिलेला

आहे. मंदिराला गाभारा व सभामंडप आहे. मुख्य देवळाशेजारी स्थळदेवतेची वेगळी घुमटी आहे.

मंदिरानंतर थोडीशी चढण चढून गेल्यावर किल्ल्याच्या पायऱ्या लागतात. दोन बुरुजांमध्ये गडाचा मुख्य दरवाजा दिसतो. दरवाज्यापाशी पहारेकऱ्याची कोठी आहे. तिथून एक वळण घेऊन पुढे गेल्यावर दुसऱ्या दरवाज्याची जागा आहे. मात्र तो दरवाजा आता शिल्लक नाही. तिथून पुढे गेल्यावर उजवीकडे पाण्याची विहीर लागते. डावीकडे बुरूज आहे. त्या बुरुजावर उभे राहिल्यावर पश्चिमेकडे किनाऱ्यापर्यंत मोकळी, सपाट, छोटी झुडपे असलेली खार जमीन दिसते. वायव्य दिशेस खाडीच्या मुखाशी केळव्याचा जंजिरा दिसतो. पूर्व दिशेस तांदूळवाडीची डोंगररांग दिसते. गडाच्या उत्तर–पूर्व बाजूस उतरणाऱ्या वाटेवर एका विवराचे तोंड दिसते. त्या तोंडातून आत प्रवेश केल्यावर एकात एक अशा दोन कोठ्या लागतात. पुढली वाट उतरून गेल्यावर आपण बसच्या रस्त्यावर पोचतो. भवनगड चढण्या–उतरण्यास प्रत्येकी पंधरा मिनिटे लागतात. हा काही उंच किल्ला नाही. त्याची पायथ्यापासून उंची जेमतेम साठ–सत्तर मीटर भरेल. गडाची लांबी–रुंदीही अगदी कमी आहे. सगळा गड बघण्यास पंधरा–वीस मिनिटे पुरतात.

केळव्याचा जंजिरा आणि भवनगड यांनी पोर्तुगीज–मराठा युध्दात थोडी–बहुत कामगिरी बजावली असावी. चिमाजी अप्पाने काढलेल्या वसईच्या मोहिमेत मराठा सैन्य तारापूरहून पोर्तुगीज ठाणी जिंकत वसईकडे जात असता केळव्याजवळ रणाखोल येथे लढाई झडली व त्यात बेचाळीस मराठा वीर कामास आले. चिमाजी अप्पाच्या बखरीत याची हकिगत आहे.

महिकावतीच्या बखरीत या भागाचा प्राचीन इतिहास आहे. माहीम म्हणजे पूर्वीची महिकावती नगरी होय. ही बिंब कुळातल्या राजांची राजधानी होती. अलिकडच्या काळात केळवे–माहीमचा भाग पानमळ्यांसाठी प्रसिध्द

झाला. इथून विड्याची पाने मोठ्या प्रमाणावर दूर दूर रवाना होतात. हा भाग मिठागरांसाठीही प्रसिध्द आहे. केळवे-रोड स्थानकावरून केळव्याकडे जाताना रस्त्याच्या डाव्या-उजव्या बाजूस बरीच मिठागरे आहेत.

केळव्याचा किनारा सुरूच्या विस्तृत बनासाठी प्रसिध्द आहे. येथल्या वाळूत आणि शंख-शिंपल्यांत मात्र काहीही खासियत नाही. परंतु एक चमत्कारिक जीव येथल्या किनाऱ्यावर, विशेषत: खाडीच्या मुखाशी आढळतो. त्याला जराव म्हणतात. हा जेली-फिशचा एक प्रकार आहे. मोठ्या परातीच्या आकाराचे व पांढऱ्या सांडग्यासारखे दिसणारे हे लिबलिबीत सागरी जीव बंदरपाखाडीच्या किनाऱ्यावर निष्प्राण अवस्थेत पडलेले आढळतात. कुणीही त्यांना स्पर्श करीत नाही. त्यांचा स्पर्श झाल्यास अंगास तीव्र खाज सुटते असे म्हणतात.

* * *

# २२. यवतेश्वर, कास तलाव आणि बामणोली

सातारा जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगराळ आहे. त्यात सह्याद्रीची मुख्य पर्वतराजी दक्षिणोत्तर पसरली असून तिचे काही फाटे पूर्वेकडे लांबले आहेत. मुख्य रांगेत कोयना (शिव-सागर) तलावाच्या पश्चिमेस सह्याद्रीचा घाटमाथा (पश्चिमघाट) आणि पूर्वेस बामणोलीची डोंगररांग आहे. बामणोली रांगेच्या एका फाट्यास यवतेश्वराचा डोंगर म्हणतात. हा डोंगर सातारा शहरापर्यंत लांबला असून साताऱ्याचे भूषण असणारा अजिंक्यतारा किल्ला याच डोंगरशाखेच्या पूर्व टोकावर आहे. सातारा शहरास पाणी पुरविणारा कास तलाव यवतेश्वराच्याच डोंगरावर आहे. यवतेश्वर-कास-बामणोली भागात अजून पुष्कळ झाडी टिकून आहे. दाट झाडी, थंड हवा, यवतेश्वरासारखे देवस्थान, कास तलावाचा निसर्गरम्य परिसर आणि बामणोलीहून शिवसागराचे होणारे विराट दर्शन ह्या वैशिष्ट्यांमुळे या भागात काढलेली सहल लहान-थोर सर्वांनाच अतिशय आवडते.

ही सहल वाई, सातारा तसेच कराडपासून एक दिवसात होऊ शकते. सातारा शहर वाईपासून ३३ किलोमीटर आणि कराडपासून ५१ किलोमीटर दूर आहे. साताऱ्यापासून बामणोली गाव ४१ किलोमीटर अंतरावर आहे. साताऱ्याहून बामणोलीस जाणाऱ्या रस्त्यावर प्रथम यवतेश्वराचे मंदीर आणि नंतर कासचा तलाव लागतो. जर स्वत:चे वाहन अथवा खाजगी बसने जायचे असेल तर प्रथम यवतेश्वराचे दर्शन, नंतर बामणोली गाव आणि शेवटी कास तलावाकाठी भोजन व विश्रांती असा बेत आखावा. परंतु जर एस.टी.च्या बसेसवर अवलंबून राहायचे असेल तर

प्रथम बामणोलीला जावे. कारण थेट बामणोलीपर्यंत जाणाऱ्या बसेसची संख्या कमी आहे. साताऱ्याच्या बस–स्थानकावरून सकाळी साडेआठ वाजता कास–बामणोलीसाठी सुटणारी बस घ्यावी. ती दीड–पावणेदोन तासात बामणोलीस पोचते. बामणोलीस चहा–फराळ उरकावा, तलावाकाठी बसून लाँचमध्ये चढणाऱ्या उतरणाऱ्या प्रवाशांची गंमत बघावी आणि कास तलावाकडे चालत जाण्यास निघावे. बामणोली ते कास हा अकरा किलोमीटर लांबीचा घाटरस्ता पदभ्रमणासाठी अत्यंत योग्य आहे. चालत चालत आपण दुपारी दोन वाजता कासला पोहोचतो. तेथे जेवण उरकून दोन तास करमणुकीचे कार्यक्रम करावेत अथवा विश्रांती घ्यावी. संध्याकाळी पावणेपाच वाजता कासहून साताऱ्याची बस सुटते. त्या बसमधून वाटेत यवतेश्वरला उतरावे. देवदर्शन घेऊन, चहा घेऊन तासभराने निघावे व पाऊलवाटेने डोंगर उतरून साताऱ्यास जावे. किंवा संध्याकाळी सहा वाजता यवतेश्वरहून सुटणाऱ्या बसने साताऱ्यास परतावे.

यवतेश्वराचे देऊळ जुने, दगडी बांधकामाचे आहे. त्यावर उंच कळस आहे. देवळाचे आवार मोठे आहे. सभोवती तट आहे. प्रवेशद्वार उंच आणि भक्कम आहे. देवळामागे मोठा, चौकोनी तलाव बांधलेला आहे. देवळाची दुरुस्ती आणि नूतनीकरण करताना गाभाऱ्यात टाईल्स बसविल्या असून तेथे ट्यूबलाईट लावला आहे. प्रशस्त, दगडी सभामंडपात भर दुपारी देखील गारवा असतो. मुख्य देवळाभोवती मंगळाई देवीचे मंदिर आणि अन्य देवतांच्या लहान देवळ्या आहेत.

अजिंक्यतारा किल्ला आणि यवतेश्वराचा डोंगर यांच्या मधल्या खिंडीतील बोगद्यापासून यवतेश्वराचा घाट सुरू होतो. घाट चढून पठारावर आल्यावर खाली विस्तारलेले संपूर्ण सातारा शहर एका दृष्टीत मावते. शहरापलिकडे दूर जरंडेश्वराचा डोंगर दिसतो. उत्तरेस मेरुलिंगाचा डोंगर दिसतो. साताऱ्याच्या बसस्थानकापासून मोटाररस्त्याने यवतेश्वर मंदीर जरी

१० किलोमीटर दूर असले तरी डोंगरातल्या पाऊलवाटेने ते पुष्कळच जवळ आहे. ह्या वाटेवर जागोजाग दगडी पायऱ्या आहेत. पायऱ्यांच्या पायथ्याशी आणि माथ्यावर कोनाड्यात बसविलेल्या देवतामूर्ती दिसतात. या मार्गास यवतेश्वराची घाटी म्हणतात. घाटी चढता–उतरताना आजूबाजूच्या दाट वृक्षराजीमुळे उन्हाचा त्रास बिलकुल होत नाही. पुष्कळ लोक यवतेश्वरास जाताना बसने जातात व परतताना घाटी उतरून येतात. घाटी उतरून मंगळवार तळ्यापर्यंत जायला फक्त पाऊण तास लागतो. मंगळवार तळ्यापासून पुढे गावात जाण्यासाठी बस मिळते.

यवतेश्वरहून कास तलाव वीस किलोमीटर दूर आहे. यवतेश्वरहून कासला जाणारी बस बराच वेळ अगदी डोंगरमाथ्यावरून प्रवास करीत असल्याने प्रवाशांना डाव्या उजव्या बाजूंस दूरदूरचा प्रदेश दिसतो. डावीकडे म्हणजे दक्षिण दिशेस उरमोडी नदीच्या खोऱ्यापलिकडे समर्थ रामदासांचा सज्जनगड दिसतो. उजवीकडच्या म्हणजे उत्तरेकडच्या खोऱ्यात वेण्णा नदीचा प्रवाह, नदीवर बांधलेले धरण आणि धरणामागे अडलेला विस्तृत जलाशय दिसतो. साताऱ्याहून महाबळेश्वरास जाणारा रस्ता वेण्णा नदीच्या काठाकाठाने गेलेला दिसतो. नदीपलिकडे मेरुलिंग डोंगररांग दिसते. हे सगळे सृष्टिसौंदर्य बघताना वेळ कसा निघून जातो ते कळत नाही. रस्ता झाडीत शिरतो आणि अचानक कास तलाव दृष्टीस पडतो.

इंग्रजांच्या अमदानीत साताऱ्यास पाणीपुरवठा करण्यासाठी कास तलाव बांधण्यात आला. हा तलाव उरमोडी नदीच्या उगमापाशी आहे. तलावाजवळ विश्रामधाम बांधलेले आहे. जवळच कास नावाचे लहानसे गाव आहे. हे ठिकाण इतके निसर्गरम्य आहे की इथून परत जाण्यासाठी पाऊल उचलवत नाही.

कासपासून बामणोली ११ किलोमीटर दूर आहे. हा रस्ता उताराचा आहे. तो डोंगरउतारावरच्या झाडीतून नागमोडी वळणावळणांनी

खाली उतरतो. अधून-मधून, जिथे झाडी विरळ असेल तिथून कोयनेच्या विस्तीर्ण जलाशयाचे मनोहर दर्शन घडते. पाण्यापलिकडे, दूर वासोटा किल्ला दिसतो. वासोट्यावर जाण्यासाठी लाँचमधून शिवसागर पार करावा लागतो. ती एक स्वतंत्र सहल आहे. लाँच बामणोलीहून दुपारी तीन वाजता सुटते आणि तलावाकाठची गावे घेत घेत कांदाटी नदीच्या उगमाकडे जाते. तिकडे चकदेव आणि पर्वत नावांच्या डोंगरांवर दोन प्रेक्षणीय मंदिरे आहेत. तिकडून दुसऱ्या दिवशी सकाळी लाँच परत निघते व बामणोलीस साडेदहा वाजता येते. जलप्रवासाची हौस असेल पण जास्त वेळ जर देता येत नसेल तर बामणोलीहून साडेदहाच्या लाँचने जवळच्या तापोळ्यास जावे व तेथे थोडावेळ हिंडून त्याच लाँचने दुपारी तीन वाजता बामणोलीस परतावे. स्वतःचे वाहन असेल तरच हा प्रयोग करा.. कारण संध्याकाळी बामणोलीहून साताऱ्यास परतण्यासाठी बस नाही.

* * *

N42



यवतेश्वर

# २ ३. वैजनाथ, भिवपुरी आणि कुसुरघाट

वैजनाथचे शिवमंदिर, भिवपुरीचे वीजनिर्मिती केंद्र आणि कुसूरचा घाट ही तीन प्रेक्षणीय स्थळे रायगड जिल्ह्यात कर्जत तालुक्यात एकमेकांजवळ वसली आहेत. वैजनाथ हे धार्मिक स्थळ आहे, भिवपुरी येथे जलशक्तीचे रूपांतर विद्युत्‌शक्तीत करणारे वीजकेंद्र आहे, तर कुसुरघाटात माणसाने डोंगराळ भागात सुध्दा वाहतुकीचे मार्ग फार पूर्वी कसे पाडले त्याचे दर्शन घडते. कुसूरच्या डोंगरात पेज नदी उगम पावते. ही नदी पुढे उल्हास नदीस मिळते. पेज नदी पावसाळा संपल्यावर कोरडी पडते. त्यामुळे पूर्वी या भागात फक्त पावसाळी शेती होत असे. परंतु भिवपुरीच्या वीजघरातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा बारमाही उपयोग करून घेण्यासाठी 'राजानाला योजना' कार्यान्वित झाली आणि आता ह्या परिसरात उन्हाळ्यात सुध्दा भातशेती केली जाते. तेव्हा सृष्टीचे सौंदर्य आणि माणसाचे कर्तृत्व ह्या दोन्ही गोष्टी बघण्यासाठी वैजनाथ–भिवपुरी–कुसुरघाट अशी सहल काढावी.

ही सहल मुंबईहून अथवा पुण्याहून एक दिवसात होऊ शकते. मुंबईहून सकाळच्या डेक्कन एक्स्प्रेसने किंवा पुण्याहून सकाळच्या सिंहगड एक्स्प्रेसने कर्जतला जावे. कर्जतहून सकाळी नऊ वाजता भिवपुरीसाठी बस सुटते. ती दहा वाजता भिवपुरीला पोचते. कर्जत ते भिवपुरी हे अंतर २३ किलोमीटर आहे. कर्जत–मुरबाड रस्त्यावर कडाव गावानंतर भिवपुरीचा फाटा फुटतो. कडाव गावात एक गणेशमंदिर आहे. ते तिथल्या परिसरात प्रसिध्द आहे. टाटा वीजकंपनीचे कर्मचारी कडावहून रेल–कारने भिवपुरीच्या विद्युत्‌केंद्रात जातात. ती छोटीशी रेलकार रुळांवरून धावताना पाहून गंमत

वाटते. विद्युत्केंद्र उभारताना टाटांनी ग्म्य रेल्वेवरील भिवपुरी-रोड स्थानकापासून कडावमार्गे भिवपुरीपर्यंत १३ किलोमीटर लांबीचा खाजगी लोहमार्ग टाकला होता. त्यापैकी भिवपुरी-रोड ते कडाव हा लोहमार्ग आज वापरात नाही. परंतु त्यावरून नुसते चालत जायलाही मजा येते. विशेषतः पौर्णिमेच्या रात्री ही रुळांवरची पाच किलोमीटर वाटचाल चांदण्यात सुखद वाटते. वाटेत उल्हास नदीवर पूल बांधलेला आहे. पावसाळ्यात नदीला पूर आलेला असता त्या रेल्वेपुलावर उभे राहून खालून रोंरावत वाहणाऱ्या उल्हासचे दर्शन मोठे चित्तथरारक असते.

कडाव-भिवपुरी रस्त्यावर, भिवपुरीच्या अलिकडे, पेज नदीवरील पुलाजवळ वैजनाथ गावात शिरणारा रस्ता फुटतो. वैजनाथ हे लहानसे गाव आहे. परंतु तिथले शंकराचे देऊळ, नदीचे सान्निध्य आणि सभोवती पडलेला डोंगरांचा फेरा अशा आकर्षक गोष्टींमुळे अलिकडे वैजनाथकडे पर्यटकांचे लक्ष जाऊ लागले आहे. गावात चहा-फराळाची दोन लहान हॉटेल्स आहेत. त्याशिवाय एका ठिकाणी भोजनाची व निवासाची सोयही केली जाते. देवळाची धर्मशाळा मोठी आहे. भक्त आणि यात्रेकरू धर्मशाळेत उतरतात. दरवर्षी माघ महिन्यात बरेच भक्तजन वैजनाथला उत्सवासाठी जमतात. हा उत्सव सद्गुरू वामन महाराज यांच्या पुण्यतिथीचा असतो. वामन महाराज हे सत्पुरुष वैजनाथ येथे सुमारे शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले. मूळचे ते कोकणातले पण परमार्थ साधनेसाठी ठिकठिकाणी प्रवास व तीर्थयात्रा केल्यावर उत्तरायुष्यात वास्तव्यासाठी त्यांनी वैजनाथ हे ठिकाण निवडले. त्यांच्या शिष्यांनी त्यांना देवळाच्या सान्निध्यात मठ बांधून दिला. महाराज निवर्तल्यावर त्यांची समाधी बांधण्यात आली व दरवर्षी पुण्यतिथी उत्सव करण्याची प्रथा सुरू झाली. हा उत्सव माघ शुध्द त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत तीन दिवस असतो. मुळातले मंदिर आणि मठ लहान होते पण आता जीर्णोध्दारानंतर इमारती मोठ्या बांधल्या आहेत.

देवळात सर्वत्र फरशी बसवली आहे, विजेचे दिवे आणि नळाचे पाणी आहे.

देवळामागे एक जुनी, दगडी बांधणीची, पायऱ्यांची प्रशस्त चौकोनी विहीर आहे. विहिरीपलिकडे नदी वाहते. देवळापासून नदीपर्यंत दगडी पायऱ्यांचा घाट बांधलेला आहे. नदीच्या पलिकडून पाण्याचा कालवा जातो. कालव्यात पाणी सोडण्यासाठी गावाबाहेर थोड्या अंतरावर नदीला छोटा बंधारा घातलेला आहे. बंधाऱ्यामुळे तिथे छोटा तलाव निर्माण झाला आहे. तो तलाव, पंपिंग स्टेशन आणि जवळची आमराई ही स्थळे बघण्यासारखी आहेत.


वैजनाथपासून तीन किलोमीटर अंतरावर भिवपुरी गाव आहे. त्या गावातला पेशवेकालीन, प्रशस्त, अष्टकोनी तलाव प्रेक्षणीय आहे. तलावाकाठी सुरेख देऊळ आहे. तलावात उतरण्यासाठी तीन-चार जागी पायऱ्या केलेल्या आहेत. तलावाला सर्व बाजूंनी पक्का, दगडी, रुंद कठडा बांधलेला आहे. सायंकाळच्या वेळी त्या कठड्यावर बसून, पूर्वेकडे दिसणारे सह्याद्रीचे धूसर कडे आणि पश्चिमेकडच्या आकाशातली रंगांची उधळण बघताना मन कमालीचे शांत बनते.

भिवपुरी गावापासून थोड्या अंतरावर 'आंद्रा व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी' ऊर्फ टाटा कंपनीचे पॉवर हाऊस आहे. ते बघण्यासाठी पूर्वपरवानगीची आवश्यकता असते. येथून नजरेत भरणारे दृश्य म्हणजे डोंगरावरून खाली येणारे सहा मोठे नळ. त्या नळांतून घाटमाथ्यावरच्या आंद्रा तलावाचे पाणी घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या वीजघरात येते. वीजघरातील विद्युतजनित्रांची पाती पाण्याच्या वेगवान धारेमुळे चक्कीसारखी जोरात फिरतात. चक्कीच्या दांड्यावर बसवलेली तांब्याच्या तारांची भेंडोळी एका मोठ्या लोहचुंबकाच्या चुंबकीय क्षेत्रात वेगाने फिरतात व त्यामुळे तारांमधून वीज वाहू लागते.

भिवपुरीचे संपूर्ण वीजकेंद्र आणि डोंगरातून येणारे पाण्याचे नळ यांचे

विहंगम दृश्य कुसुरघाटातून छान दिसते. कुसुरघाटाची चढण भिवपुरी गावाबाहेरून सुरू होते. हा जुना घाट माणसांच्या व जनावरांच्या रहदारीसाठी आहे; तो वाहनांसाठी नाही. प्रवाशांची तहान भागविण्यासाठी घाटाच्या मध्यावर पाण्याची पाच कुंडे खोदलेली आहेत. त्यांना पंचकुंडे म्हणतात. घाटाच्या माथ्यावर कुसूर नावाचे गाव आहे. ते आंद्रा तलावाकाठी वसले आहे. भिवपुरीहून घाट चढून कुसूरला जाण्यास दोन तास लागतात. परंतु थेट कुसूरपर्यंत जाण्याची आवश्यकता नाही. घाटवाट कशी असते ते समजून घेण्यासाठी त्या वाटेवर पंधरा–वीस मिनिटे चढणे पुरेसे असते. आपले पाय न वापरता डोंगरावर जायचे असेल तर टाटा कंपनीत परवानगी घेऊन त्यांच्या 'हॉइस्ट' मधून म्हणजे रूळांवरुन डोंगर चढणाऱ्या इलेक्ट्रिक ट्रॉलीत बसून जावे. ट्रॉलीचा मार्ग पाण्याच्या नळांशेजारून जातो. वीजघरापासून ट्रॉलीने डोंगरावर जाण्याचा हा अनुभव अविस्मरणीय असतो.

कर्जतला परतण्यासाठी भिवपुरी तसेच वैजनाथहून सायंकाळी चार ते साडेपाच वाजण्या दरम्यान दोन बसेस आहेत. कर्जतहून पुण्याला जाण्यासाठी पावणेआठ वाजता महालक्ष्मी एक्सप्रेस मिळते. मुंबईला जाण्यासाठी लोकलगाड्या आहेत.




* * *

# २४. वांद्री धरण आणि सातिवलीची उन्हेरी


वांद्री ही ठाणे जिल्ह्यातली एक लहानशी नदी आहे अन् तिच्या काठच्या सातिवली गावाजवळ उन्हेरी म्हणजे गरम पाण्याचे झरे आहेत. वांद्री नदीवर ढेकाळे गावाजवळ अलिकडेच एक धरण बांधण्यात आले आहे. हा भाग मुंबईपासून फक्त ८० किलोमीटर अंतरावर असल्याने एक दिवसाच्या छोट्या सहलीसाठी योग्य आहे. ठाणे, भिवंडी, वाडा आणि पालघर भागातल्या शाळांसाठी ही एक चांगली सहल आहे.

वांद्री नदी पालघर तालुक्यातून वाहते. तिचा उगम तानसा नदीच्या उत्तरेला असणाऱ्या टकमकच्या डोंगरात होतो. ती वायव्य दिशेकडे वाहात जाऊन वैतरणा नदीस मिळते. वांद्री आणि वैतरणा यांचा संगम मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील मनोर गावाच्या दहा किलोमीटर दक्षिणेस होतो. संगमाजवळच्या हळोली गावापाशी गरम पाण्याचे आणखी काही झरे आहेत.

मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय मार्ग शिरसाडजवळ तानसा नदी ओलांडतो आणि मनोरजवळ वैतरणा नदी ओलांडतो. शिरसाड आणि मनोर यांच्या दरम्यान ढेकाळे गावाजवळ वांद्री नदीवरचा पूल आहे. ढेकाळ्याजवळ 'वांद्री मध्यम पाटबंधारे प्रकल्प' असे लिहिलेली मोठी कमान उभारलेली आहे. कमानीपासून धरणापर्यंत तीन किलोमीटर लांबीचा पक्का रस्ता केलेला आहे. धरणाच्या भिंतीवर उभे राहिल्यावर समोर पूर्वेकडे दूरवर पसरलेले पाणी, उजव्या हातास टकमक किल्ला, डाव्या हातास दूर कोहोजचा किल्ला आणि मागे पश्चिमेकडे गंजा गावची वस्ती असे दृश्य दिसते.

मुंबई–अहमदाबाद रस्ता ढेकाळ्याअगोदर काही वेळ डावी–उजवीकडच्या डोंगरांमधून मार्ग काढीत जातो. इथे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दाट झाडीचा प्रदेश आहे. बसेस आणि ट्रक्सच्या आवाजांचे प्रतिध्वनी डोंगरामध्ये घुमत राहतात. हवेत गारवा असतो. इथल्या निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी वाहनातून जरुर पायउतार व्हावे आणि रस्त्याने अर्धा–पाऊणतास पायी चालावे.

ढेकाळ्याच्या पुढे २ किलोमीटरवर सातिवली गाव आहे. तिथे गरम पाण्याची सात कुंडे आहेत. कुंडातले पाणी इतके कढत असते की आत उतरून स्नान करवत नाही. बादलीने पाणी बाहेर काढून अंगावर घ्यावे लागते. थंडीच्या दिवसात या गरम पाण्याचे इतके सुख वाटते की कितीही वेळ पाणी अंगावर घेत राहिले तरी आंघोळ करतच राहावे; थांबू नये, असे वाटते. कुंडांजवळ देवळे, धर्मशाळा आणि आश्रम आहे. आश्रमात एक बाबा वास्तव्य करतात.



वांद्री–सातिवलीला जाण्यासाठी पश्चिम रेल्वेवरील विरार, सफाळा आणि पालघर स्थानकांवरून बसेस मिळतात. सफाळ्याहून सातिवलीला जाताना वाटेत पारगावजवळ वैतारणा नदीवर मोठा पूल लागतो. सव्वातीनशे मीटर लांबीचा, आधुनिक बांधणीचा हा पूल पाहण्यासारखा आहे. पालघर–अर्नाळा, वसई–पालघर, अर्नाळा–वाडा आणि सफाळा–भिवंडी या मार्गांवरील बसेस सातिवली आणि ढेकाळे येथे थांबतात.

* * *

# २५. आंबोली

आंबोली हे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वसलेले एक निसर्गरम्य स्थळ आहे. अलिकडे, एक थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरान–महाबळेश्वरच्या बरोबरीने त्याचे नाव घेतले जाते. महाराष्ट्राच्या पर्यटन–नकाशावर आंबोलीला आता महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. तेथे सरकारने मोठा पर्यटक–निवास बांधला आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मुंबई, पणजी व कोल्हापूर येथील कार्यालयांमध्ये आंबोलीच्या पर्यटक निवासाचे आरक्षण मिळते.

आंबोली मुंबईपासून साडेपाचशे किलोमीटर, पुण्याहून चारशे किलोमीटर, पणजीहून शंभर किलोमीटर आणि कोल्हापूरहून सव्वाशे किलोमीटर दूर आहे. मुंबई–पुण्यासारख्या दूरच्या शहरांतून येणारे पर्यटक साहजिकच आंबोलीला चार दिवस मुक्काम करतात. चार दिवस राहून आजूबाजूला बघण्यासारखी स्थळे येथे पुष्कळ आहेत. मात्र, बेळगाव–सावंतवाडीसारख्या जवळच्या भागातून येणारे लोक तसेच शाळकरी विद्यार्थी आंबोलीला केवळ एक दिवसासाठी येतात. बेळगाव–सावंतवाडी हमरस्त्यावर बेळगावपासून आंबोली साठ किलोमीटर तर सावंतवाडीपासून फक्त चौतीस किलोमीटर अंतरावर आहे. सावंतवाडीहून आंबोलीस जाताना बस आंबोलीघाटातून वर चढते. सावंतवाडीजवळच्या मालवण–वेंगुर्ले भागातील शाळांनी केवळ आंबोली घाटातील सृष्टिसौंदर्य बघण्यासाठी आंबोलीची एक दिवसाची सहल ठरवावी.

आंबोलीघाटाच्या पायथ्याशी दानोली नावाचे गाव आहे. त्या गावाची समुद्रसपाटीपासून उंची फक्त पाऊणशे मीटर आहे. दानोलीपासून

पंधरा किलोमीटर लांबीचा घाटरस्ता वळणावळणाने डोंगरावर चढतो. आपली बस चढण संपवून घाटमाथ्यावर पोचते तिथे समुद्रसपाटीपासून आपण सव्वासातशे मीटर उंचीवर असतो. घाटमाथ्यावर 'सनसेट पॉईंट' आहे. तिथून सूर्यास्ताचे दृश्य फार सुरेख दिसते. पायथ्याशी पसरलेल्या प्रदेशावरून आपल्या किरणांच्या मायेचे वस्त्र काढून घेऊन सूर्य अस्तास जातो. हे दृश्य बघण्यासाठी आंबोलीतील पर्यटक संध्याकाळी मुद्दाम सनसेट पॉईंटवर जमा होतात. पर्यटक-निवासापासून चालत घाटमाथ्यावर पोचण्यास अवघी दहा-बारा मिनिटे लागतात.

सामान्यत: देशावरचा जिल्हा आणि कोकणातला जिल्हा यांच्यामधली सीमा सह्याद्रीचा घाटमाथा हीच असते. आंबोली हे घाटावरचे गाव आहे. त्यामुळे त्याचा समावेश घाटावरच्या कोल्हापूर जिल्ह्यात असायला हवा; पण तसे नाही. आंबोली गाव घाटाखालच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात समाविष्ट आहे. याचे कारण भौगोलिक नसून ऐतिहासिक आहे. फार पूर्वीपासून आंबोलीभोवतालचा थोडा प्रदेश वाडीकर सावंतांच्या ताब्यात होता. आंबोली आणि जवळची काही गावे सावंतवाडी संस्थानात होती. त्यामुळे संस्थाने विलीन झाल्यावरही आंबोली सावंतवाडी तालुक्यात राहिले.

आंबोलीत सावंतवाडीकरांचा बंगला होता. आजही तो पडक्या अवस्थेत आहे. तो घाटमाथ्यावर उंच जागी बांधलेला आहे. बंगल्यापाशी उभे राहिल्यावर कुडाळ, सावंतवाडी व फोंडा हे संस्थानचे तिन्ही तालुके नजरेच्या टप्प्यात येतात. बंगल्यात हेलियोग्राफ नावाचे यंत्र बसविले होते. त्याच्या सहाय्याने येथून थेट सावंतवाडीच्या राजवाड्याशी संपर्क साधला जाई. यंत्रात एक मोठा आरसा होता. त्या आरशावरून सूर्यकिरण सावंतवाडीकडे परावर्तित केले जात. मोर्स कोड वापरून तारायंत्राद्वारे जसा संदेश पाठविता येतो तसा आरशाच्या झाकणाची विशिष्ट पध्दतीने उघडझाप

करून आंबोलीहून सावंतवाडीस निरोप पाठविला जाई. आता हे यंत्र अस्तित्वात नाही; पण बंगला बघण्यासारखा आहे. त्यावर ब्रिटिश अमदानीची छाप आहे.

इंग्रज आणि मराठ्यांची आंबोलीपाशी लढाई झाली होती. आंबोलीजवळचा महादेवगड किल्ला हस्तगत करण्यासाठी आलेल्या मुंबईकर टोपीवाल्यांच्या चौदाव्या रेजिमेंटमधील एन्शन विलमॉट नावाचा सोल्जर त्या लढाईत कामास आला. त्याच्या थडग्यावर असा मजकूर इंग्रजीत कोरलेला आहे. पर्यटक निवासासमोरच्या रस्त्यापलिकडे हे थडगे दिसते. थडग्यावर कोरलेला १५ डिसेंबर १८३२ हा मृत्युदिनही वाचता येतो. तेथे दुसरेही थडगे आहे. त्यावरील मजकूर वाचून कळते की कर्नल हेन्री लोथरनट यांची पत्नी एलिनॉर ऑक्टाव्हिया ही २ एप्रिल १८९३ पासून येथे चिरविश्रांती घेत आहे.

महादेवगड आंबोलीपासून सहा किलोमीटर दूर आहे. हा किल्ला डोंगराच्या एका लांबलेल्या पदरावर बांधला होता. आता त्यावर किल्ल्याचे कोणतेही अवशेष शिल्लक नाहीत. तरीही तिथून दिसणाऱ्या विहंगम दृश्यासाठी जरूर तेथे जावे. गडाकडे नेणारा मार्गही फार सुरेख आहे. गच्च झाडीतून बैलगाडीवाट जाते. वाहता वारा झाडाझाडांमधून घुसला की अलगुजासारखे विविध स्वर उमटतात. सकाळच्या वेळी पक्षी बोलत असतात. रस्ता अगदी निर्मनुष्य असतो पण कसलेही भय वाटत नाही. तासभर वाटचाल केल्यावर वाट डावीकडे वळून एका अरुंद पण लांबलेल्या पठारावर संपते. पठाराच्या दोहो बाजूने खोल दऱ्या आहेत. उजव्या बाजूस एकामागे दुसरी, त्यामागे तिसरी अशा पाच डोंगराच्या सोंडा दिसतात. झाडीच्या आच्छादनामुळे डोंगर हिरवे दिसतात. खालच्या कोकणातून उंच उठलेल्या एका डोंगरावर वैशिष्ट्यपूर्ण आकाराचे जुळे किल्ले आहेत. जणू दोन भिंती अरुंद फट मध्ये ठेवून एकमेकीशेजारी रचाव्या तसे ते किल्ले

दिसतात. त्यांना मनोहरगड आणि मनसंतोषगड अशी नावे आहेत. पठाराच्या डावीकडे म्हणजे दक्षिणेस घोड्याच्या नालासारखी किंवा चंद्रकोरीसारखी अंतर्वक्र दरी आहे. दरीपलिकडच्या डोंगराच्या पोटावर आंबोलीघाटाच्या रस्त्याची उतरती तिरकी रेघ ब्राह्मणाच्या जानव्यासारखी दिसते. पठाराच्या टोकाशी डोंगराचा चिंचोळा कणा दिसतो; तोच महादेवगड. त्याच्यावर पाऊलवाट जाते पण दोन्हीकडच्या दऱ्यांचे रौद्रभीषण दृश्य बघून डोळे फिरतात. वारा एवढा तुफान असतो की आपण पाचोळ्यासारखे उडून जाऊ असे वाटते.

महादेवगडाप्रमाणे आपल्या अंगावर थरार उत्पन्न करणारे दुसरे स्थळ म्हणजे नांगरतासचा धबधबा. हा धबधबा आंबोली-बेळगाव रस्त्यावर आंबोलीपासून १० किलोमीटर दूर आहे. तेथे एक डोंगरी झरा रस्त्याला समांतर वाहतो. झऱ्याच्या मार्गात तीस मीटर खोल नैसर्गिक घळ आहे. इतक्या उंचावरून झऱ्याचे पाणी स्वतःला बिनदिक्कत घळीत लोटून देते. पाणी जिथून उडी घेते तिथपर्यंत उतरण्यासाठी रस्त्यापासून काही पायऱ्या केल्या आहेत व सुरक्षिततेसाठी तिथे कठडा बांधला आहे. कठड्यापाशी उभे राहून दिसणारे दृश्य तर थरारक आहेच पण त्यापेक्षाही जास्त थरार अनुभवायचा असेल तर झरा ओलांडून पलिकडे जावे व थोडे धाडस करून झाडांच्या व वेलींच्या आधाराने घळीत अर्ध्यावर थोडीशी सपाट जागा आहे तिथे उतरावे. तिथे आपण धबधब्यास अगदी सामोरे होतो. निम्मा धबधबा वर आणि निम्मा खाली दिसतो.

आंबोलीजवळ हिरण्यकेशी नदी उगम पावते. ती एका मोठ्या गुहेतून बाहेर येते. तेथे हिरण्यकेशी मातेचे लहानसे देऊळ, पाण्याची दोन कुंडे आणि एका साधूचा आश्रम आहे. स्थळ बघण्यासारखे आहे. तेथे कच्चा रस्ता झाला आहे. त्यावरून बैलगाड्या, ट्रक किंवा जीप जाऊ शकते. हा रस्ता आंबोली-बेळगाव रस्त्यावर आंबोलीपासून तीन

किलोमीटर अंतरावर हिरण्यकेशी नदीवर जो पूल आहे त्या पुलापासून निघतो. तेथे जवळच आंबोली गावाची मुख्य वस्ती आहे. पर्यटक-निवासाजवळ जी वस्ती झालेली आहे तिला 'बाजार' म्हणतात. किराणामालाची दुकाने, पोस्ट ऑफिस, बँक, हॉटेले, बस-स्थानक वगैरे गोष्टी बाजारभागात आहेत. गावभाग नदीकाठी आहे. गावात माऊली देवीचे मोठे देऊळ आहे. देवळाचा सभामंडप प्रशस्त आहे. सभामंडपाच्या भिंतींवर पौराणिक प्रसंगांची सुरेख चित्रे रंगवलेली दिसतात आणि खांबांवर तसबिरी लावलेल्या दिसतात. गावातल्या या सुंदर मंदिराकडे सहसा कुणी पर्यटक फिरकत नाही. बहुतेकजण आंबोलीच्या बाजारालाच गाव समजतात व तिथेच जवळपास भटकतात. बाजारातही दोन चांगली देवळे आहेत. एक रामाचे व दुसरे हनुमानाचे आहे. दोन्ही देवळे समोरासमोर पण रस्त्याच्या डावी-उजवीकडे आहेत.

बाजार, पर्यटक-निवास, आंबोली गाव आणि परिसर हा सगळा भाग हिरण्यकेशीच्या उगमाकडे जाताना चढाव्या लागणाऱ्या डोंगरावरून व्यवस्थित दिसतो. नदीचा उगम डोंगरात दिडशे मीटर उंचीवर एका अरुंद घळीमध्ये आहे. मुख्य रस्त्यापासून फुटलेला चार किलोमीटर लांबीचा कच्चा रस्ता हळू हळू डोंगरात चढतो. त्याच्या चढणीवरून खाली पाहिले असता पायथ्याशी गावाजवळ नदीचा प्रवाह असा कुठेच नजरेस पडत नाही. मात्र हिरव्यागार शेतांच्या ओळीवरून नदीचा वहाळ समजतो. इकडच्या भागात नदीच्या वहाळातच पायरी-पायरीने बांध घालून शेती करण्याची पध्दत दिसते.

पर्यटक-निवासापासून दीड तास वाटचाल केल्यावर आपण हिरण्यकेशीच्या उगमापाशी पोचतो. ज्या गुहेतून नदी अवतीर्ण होते त्या गुहेचे तोंड मोठे आहे. माणूस ताठ उभा राहून गुहेच्या आत सात-आठ पावले टाकू शकतो. नंतर गुहा ठेंगणी होत जाते. आत दाट काळोख

असल्यामुळे आणखी पुढे जाण्याचे धाडस होत नाही; पण गुहा खूप खोलवर गेलेली आहे असे म्हणतात. गुहेत काय दडले आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न काही धाडसी तरुणांनी पूर्वी केलेला आहे. गुहेबद्दल पुष्कळ दंतकथा आहेत. माणसाला नेहमीच गुहेबद्दल गूढ आकर्षण वाटते.

हिरण्यकेशी नदीस आजरा गावाजवळ चित्री नावाची नदी येऊन मिळते. या चित्री नदीच्या उगमाजवळ माधवगिरी नावाचे रम्य स्थळ आहे. आंबोली आणि नांगरतास यांच्या दरम्यान आजऱ्याचा फाटा फुटतो. कोल्हापूरला जाणाऱ्या बसेस या फाट्यावर वळतात. फाट्यापासून पाच किलोमीटर अंतरावर माधवगिरीचा बसथांबा आहे. आंबोलीला जसा सावंतवाडीकरांचा बंगला होता तसा माधवगिरीला इचलकरंजीकरांचा बंगला होता. त्या स्थळी पाण्याचा झरा आणि पुष्करणी आहे. आजरा रस्त्यावर माधवगिरी ज्या बाजूस आहे त्याच्या विरुध्द बाजूस गिळे नावाचे गाव आहे. त्या गावापाशी प्रेक्षणीय दरी आहे. तिला कावळेसातची दरी म्हणतात.

आंबोलीहून एक रस्ता रामघाटाकडे जातो. बस त्या रस्त्याने चौकूळ गावापर्यंत जाते. रस्ता दाट झाडीचा आहे. त्यावर शिरगावकर पॉईंट नावाचे ठिकाण आहे. त्या पॉईंटवरून आंबोलीघाटाचे व पश्चिमेकडील दऱ्याखोऱ्यांचे छान दर्शन होते. इथून चौकूळच्या रस्त्यावर आणखी थोडे पुढे गेल्यावर रस्ता एक खिंडीत वळतो. वळणापाशी एक व्ह्यू-पॉईंट आहे. इथूनही पश्चिमेकडील कोकणप्रदेशाचे व मावळत्या सूर्याचे चांगले दर्शन होते. मात्र सूर्यास्तापर्यंत थांबल्यास त्या रस्त्याने परतताना जंगलाची व अंधाराची भीती वाटल्याखेरीज राहात नाही. मागे जराही न बघता मुले चटचट पावले उचलतात.

अगदी मोठ्या माणसानाही भीती वाटावी असे खरेखुरे जंगल पर्यटक-निवासाच्या मागे आहे. पण ते आधी लक्षात येत नाही. पर्यटक-निवासाच्या मागे सुरेख बाग आहे आणि बागेपलिकडे थोड्या

अंतरावर जंगल सुरू होते. माणसे सहज म्हणून बागेत शिरतात. तेथे कारंजी आहेत, तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे आहेत, झोपाळे व घसरगुंड्या आहेत, पिंजऱ्यात हरणे व ससे आहेत. ही सारी गंमत बघून आपण पलिकडच्या फाटकाबाहेर पडतो, तर एक पाऊलवाट झाडीत शिरताना दिसते. कुतुहलापोटी त्या वाटेवर चार पावले जावे तर झाडी अधिकच गर्द होते. पायाखाली पाचोळ्याचा जाड थर गालिचासारखा वाटतो. आतापर्यंत कधी न पाहिलेल्या प्रकारचे आणि खूप वय झालेले जीर्ण वृक्ष चारी बाजूस दिसू लागतात. अज्ञाताच्या ओढीने आपण अधिकाधिक पुढे खेचले जातो. मनात वाटणाऱ्या भीतीचीही गंमत वाटू लागते. अचानक झाडी थोडी विरळ होते आणि तिथे उभा केलेला निरीक्षण–मनोरा दिसतो. मनोऱ्याच्या लोखंडी शिडीवरून चढून गेल्यावर वरून परिसराचे जे दर्शन होते त्यामुळे आपल्या धाडसाला बक्षीस मिळाल्यासारखे वाटते. ही वाट दाट जंगलातून तशीच आणखी पुढे जाऊन डोंगरावर चढते. डोंगराच्या माथ्यावर दुसरा निरीक्षण–मनोरा आहे. हे आंबोलीतले सर्वात उंच ठिकाण होय.

राहण्या–जेवण्याची सोय आणि चांगला वाहतुकीचा रस्ता यामुळे आंबोलीकडे यापुढे अधिक पर्यटक आकर्षिले जातील यात शंका नाही.



चौकूळच्या खिंडीत

* * *

# सहलीनंतर

सहल संपवून घरी आल्यावर करावयाचे पहिले काम म्हणजे गरम पाण्याने आंघोळ करणे हे होय. सहलीत आपण कोणत्याही ठिकाणी ऊठबस केलेली असते. कपडे मळलेले असतात. अंगावर चारदा घाम येऊन तसाच वाळलेला असतो. पायांवर मातीची पुटे चढलेली असतात. अंग शिणलेले असते. अशावेळी स्वच्छतेच्या व आरोग्याच्या दृष्टीने स्नान करणे जरुरीचे असते. म्हणून आपण कितीही भुकेलेले असलो अन् दमलेले असलो तरी स्नान केल्याशिवाय जेवू अगर झोपू नये. नेहमी जरी थंड पाण्याने आंघोळ करायची सवय असली तरी सहलीनंतर गरम पाण्यानेच आंघोळ करावी. आखडलेल्या व आंबलेल्या स्नायूंना गरम पाण्याचा शेक आवश्यक असतो. दुसऱ्या दिवशी आंघोळीपूर्वी अंगाला तेलाने मालीश करावे म्हणजे स्नायू लवकर मोकळे होतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर प्रथम आपली पाठपिशवी संपूर्ण रिकामी करून सगळ्या वस्तू घरात जेथल्या तेथे ठेवाव्यात. खाण्याचा डबा घासायला टाकावा. कपडे धुवायला द्यावेत. बूट आणि मोजे स्वतः धुवावेत. पाठपिशवी स्वच्छ धुवून उन्हात वाळवावी. या कामात आळस केल्यास सहलीनंतर कित्येक दिवसपर्यंत मळलेल्या वस्तू कोपऱ्यात तशाच पडल्याचे बेशिस्त दृश्य दिसते.

सहलीच्या दुसऱ्या दिवशी विश्रांतीची नितांत आवश्यकता असते. सहलीत उत्साहाच्या भरात आपण शरीरास वाटेल तसे ताबडलेले असते. घसा खरडून गाणी म्हटलेली असतात पाठीवर ओझे वाहिलेले असते. भरपूर पायपीट केलेली असते. वाटेल तिथले पाणी प्यायलेले असते. वारा

आणि ऊन सोसलेले असते. शरीरास या गोष्टींची सवय नसते. या गोष्टी पचवून पुन्हा पूर्वपदावर येण्यासाठी त्याच्यापरीने शरीराचे प्रयत्न चालू असतात. त्या प्रयत्नांना मदत म्हणून आपण शरीरास पूर्ण विश्रांती दिली पाहिजे. तसे न करता, 'मला काही होत नाही' अशा अहंकाराने आपण कामावर गेलो, रजा घेतली नाही, तर पुढे कधीतरी आजारी पडण्याची शक्यता असते. त्यावेळी रजा घ्यावी लागते. शरीर त्याची विश्रांती हक्काने वसूल करते.

वेगळ्या ठिकाणचे पाणी प्याल्याने पोटात जंत होण्याची शक्यता असते. काही दिवसांनी तशी शंका आल्यास जंतावरचे औषध घेऊन टाकावे.

सहलीनंतर दोन–चार दिवसातच सहलीतील अनुभव लिहून काढावेत. दैनंदिनी लिहिण्याची सवय असल्यास सहलीचे वर्णन दैनंदिनीत लिहावे. काही वर्षांनंतर हे वर्णन फारच रोचक वाटते आणि पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. सहलीच्या वेळी आपण जरी नोंदवहीत नोंदी केलेल्या असल्या तरी त्या अपुऱ्या असतात. काही काळानंतर स्मृति पुसट होते. तेव्हा सहलीनंतर शक्य तितक्या लवकर नोंदवहीतील नोंदींच्या सहाय्याने सविस्तर प्रवासवर्णन लिहून ठेवावे. त्यात स्थलवर्णनाबरोबर रेल्वे आणि बसच्या वेळा, प्रवासभाडे, भेटलेल्या माणसांची नावे या गोष्टीही लिहून ठेवाव्यात. त्यांचा उपयोग पुढे दुसऱ्या माणसांना सहल ठरविताना होतो.

अनेक वर्षे जपून ठेवलेल्या दैनंदिनी आणि छायाचित्रांमुळेच प्रस्तुत पुस्तक होऊ शकले.

REFBK 0026466
REFBK-0026466

* * *



श्री. व सौ. परांजपे

## लेखक परिचय

श्री. सुरेश परांजपे यांना पर्यटनाचा दीर्घ अनुभव आहे. त्यांनी पश्चिम महाराष्ट्रात, विशेषतः सह्याद्री पर्वतात भरपूर पदभ्रमण केले आहे. सतत नवी स्थळे हुडकण्याचा त्यांना नाद आहे. त्यांचे प्रवासवर्णनपर लेख आतापर्यंत महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, लोकप्रभा, एकता, किर्लोस्कर, धर्मभास्कर, पर्यटन वगैरे वर्तमानपत्रांतून आणि नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. ते सहलीस जाऊ इच्छिणाऱ्या लोकांस नकाशे काढून देऊन आणि वेळापत्रक आखून देऊन मार्गदर्शन करतात.

श्री. सुरेश परांजपे
५/६६, विष्णुप्रसाद,
विलेपार्ले (पूर्व),
फोन : ६३७ १२ २७

कव्हर : बॉम्बे सर्वोदय प्रेस मुंबई १६.